म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
|---|---|---|
| संग्रहालय क्रमांक 229 | पुस्तकाचें नांव | |

229

६३

चरित्र

आनंद महादेव लिमये
पुस्तकनंबर ........
भिवंडी.
भारती पुस्तकालय.

229

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ३२
ता. ........
ठाणे

पोतदारांची पुराणोक्त कथासार पुस्तकमाला.

नंबर १९.

# चांगदेव चरित्र.

( सरळ गोष्टीच्या रूपानें. )

हें पुस्तक

दत्तात्रय वासुदेव जोगळेकर

यांनीं लिहिलें.

वासुदेव मोरेश्वर पोतदार

यांनीं

मुंबईमध्यें,

"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापविलें.

सन १८९४.

किंमत ४॥ आणे.

( हें पुस्तक सन १८६७च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व प्रकारचे
व सर्व काळचे हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

सर्व प्रकारच्या कर्मणुकीसंबंधाच्या व्यवसायांत वाचनाचा व्यवसाय श्रेष्ठ प्रतीच्या व्यवसायांत गणला आहे. त्यासंबंधानें आतां कोणी कांहीं लिहावें असें राहिलें नाहीं. वाचनापासून अनेक प्रकारांनीं लाभ होण्याचा संभव, म्हणून कर्मणुकीकरितां कांहीं तरी वाचीत बसावें, असें पुष्कळांच्या मनांत येतें. ती लोकांची मनीषा पूर्ण करावी ह्मणून फार पुरातन काळापासून कर्म-क होईल अशीं पुस्तकें तयार करण्याचा प्रचार आहे. त्यास अनुसरूनच लीकडे मराठी भाषेच्या उद्धारार्थ म्हणून अनेक लोक अनेक प्रकारचीं तकें लिहीत आहेत आणि तीं लोकांनीं उपयोगांत आणावीं ह्मणून छापू-ही तयार करून त्यांच्या हजारों प्रती बाजारांत विकावयास ठेवीत आहेत.

परंतु फारच दिलगिरीची गोष्ट! खरोखर ज्यांच्यापासून लाभच होईल, ीं पुस्तकें तयार होऊन व तीं छापून बाजारांत विक्रीस येणें कठीण पडतें; ही गोष्ट सुविचारी व मर्मज्ञवाचक आहेत त्यांस कळतेच आहे. बरें, लाभ नच झाला, तरी निदान त्या वाचनापासून हानि तरी होऊं नये, अशीं पुस्तकें तरी तयार होत असतील? असें कोणी म्हणेल, तर कर्मणुकीच्या पुस्तकांत तशा पुस्तकांचाही भरणा मोठा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. तरी एवढें मात्र खरें आहे कीं, अलीकडे बहुत लोक पुस्तकें तयार करून तीं प्रसिद्ध करण्याच्या कामास लागलेले असल्या कारणानें कित्येक पुस्तकें तशीं तयार होत असतील, असें अनुमान करण्यास चिंता नाहीं. असो.

मनाची कर्मणुक होईल अशा प्रकारचें वाचन आणि त्यांत उपयोगास येतील अशा पुस्तकांच्यासंबंधानें वर जे दोन परिच्छेद लिहिले, तो प्रकार जरी उघडच आहे, तरी आलीकडे कर्मणुक होण्यासारख्या पुस्तकांत अनेक लोक अनेक प्रकारच्या चरित्र–पुस्तकांची भरती करीत आहेत, त्यांसच

आपणही अनुसरावें म्हणून आम्हीं ही एक चरित्र–माला तयार करीत आहों; त्या मालिकेंत गुंफण्यास योग्य असे पुरातन साधु चांगदेव–अर्थात् चांगा-वटेश्वर आणि चांगाकेशवदास या नांवांनीं प्रसिद्ध. ज्याचा श्रीज्ञानेश्वर महा-राजांनीं उद्धार केला. त्याचें चरित्र अत्यंत पवित्र असून खरोखर मनोरम, असें आढळल्यावरून तें मुद्दाम सरळ गोष्टीच्या रूपानें तयार केलें आहे. हें लोकप्रिय होणें व त्यापासून लाभ होणें हें पुस्तककर्ता आणि त्यास प्रकाशित करणारा यांच्या पुण्याईवर अवलंबून आहे हें उघडच आहे. म्हणून जगन्नियामक जो अनाद्यनंत परमात्मा, त्याचें अनन्य भावानें स्मरण करून आमचें हें कृत्य लोकादरास पात्र होवो असें इच्छितों; आणि पुढें लिहिलेल्या चांगदेव–चरित्राच्या संबंधाचा हा प्रास्ताविक भाग येथेंच पूर्ण करितों.

पुस्तककर्त्ता व प्रकाशक.



# चांगदेव चरित्र.

### श्लोक.

नमन करुनि आधीं देवदेवा दयाळा ॥
सुकृतद सुजनांला गुंफितों भक्तमाला ॥
प्रथम सुमन चांगा भूवरी सिद्ध झाला ॥
विमल चरित लोकीं होय तें गावयाला ॥ १ ॥

कोणे एके काळीं स्वर्गलोकीं अमरावतींत देवांचा राजा इंद्र मरुद्गणांसह बसला असतां त्या राजा इंद्रानें जवळ असलेल्या मरुद्गणास कांहीं काम करून येण्याची आज्ञा केली; पण त्यावेळीं तो असावध असल्याकारणानें मरुद्गणानें ती आज्ञा श्रवण केली नाहीं. त्यायोगानें राजा इंद्रास बहुत कोप आला व त्यानें त्या मरुद्गणास असा शाप दिला कीं, "रे उन्मत्ता, तूं स्वामिकार्याविषयीं प्रमाद करणारा व स्वामीची आज्ञा न ऐकणारा आहेस; तर तुझें मृत्युलोकीं पतन होवो आणि तुला नरजन्माची प्राप्ति असो!" याप्रमाणें त्या सहस्राक्ष, अखंडल राजा इंद्रानें त्याला शाप देतांच त्या मरुद्गणास मोठें भय वाटलें, अनुताप झाला आणि तो दीन होत्साता हात जोडून त्या राजा इंद्राची स्तुति करूं लागला. तो म्हणाला:-"हे शचीवरा, तूं सर्व देवांचा मुगुटमणि आहेस. तुझ्या आज्ञेनेंच मेघ वसुंधरेला शांत करितो, तुझ्या संकटसमयीं भगवान् वामनानें बळीस पाताळीं दडपून तुझें हें महास्थान संभाळलें, तर असा जो तूं श्रेष्ठ देवांचाही देव आहेस तो आपल्या दासांवरही कृपा करशील असा भरंवसा जाणून प्रार्थना करितों कीं, हे अमरा, मजकडे कृपादृष्टीनें अवलोकन कर आणि ज्या योगानें त्या नरजन्मांतून व मृत्युलोकांतून माझा

उद्धार होईल, असा वर दे आणि कांहीं उपाय असेल तर तोही सांग." याप्रमाणें त्या इंद्र राजानें आपलें स्तवन ऐकिलें व त्याचें दीन वदन पाहिलें, तेव्हां त्यास त्या मरुद्गणाची करुणा आली. ज्याप्रमाणें जननी बालकावर प्रथम कोप करिते आणि क्षणभरानें कृपार्द्र होऊन त्याचें कल्याण व्हावें असा उपाय योजते. किंवा एकादें अज्ञान मूल कुलगुरुसन्निध असतां चुकलें ह्मणजे तो त्यास शिक्षा करितो; पण एका क्षणांत दयावंत होऊन त्यास यथार्थ उपदेश करितो; त्याप्रमाणें तो अमरपति जरी प्रथम कोपला होता, तरी एका क्षणांत शांत झाला व त्या मरुद्गणास त्यानें असा उःशाप दिला कीं, "जेव्हां जगदोद्धार करण्यासाठीं प्रत्यक्ष ब्रह्मदेव, विष्णु व महेश हे कलियुगीं अंशरूपानें अवतार घेतील; मृडानीपति महादेव निवृत्तिराज नामेंकरून प्रसिद्ध होतील; प्रत्यक्ष महाविष्णु ज्ञानराज ह्मणवितील; ब्रह्मदेव सोपाननाम धारण करील आणि आदिमाया मुक्तरूपानेंच मुक्ताबाई नामेंकरून अवतरेल. नंतर त्यांची अद्भुत कीर्ति श्रवण करून तूं त्यांस शरण जाशील. सत्समागमामुळें अज्ञान टाकून अध्यात्म विद्येंत निपुण होशील आणि सर्व जग ब्रह्मरूपानें पाहशील. तुझें द्वैत निरसन होईल, तेव्हां सद्गुरूच्या कृपेनें तुला साक्षात्कार होईल. साक्षात्परब्रह्म मूर्त्ति भीमातीरीं श्रीपांडुरंग नामेंकरून वसत आहे, तिची उपासना तूं करूं लागशील व तो श्रीहरि तुझ्या संकटसमयीं तुला पावेल. तूं गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून संतति उत्पन्न करशील आणि मृत्युलोकीं आपला वंश ठेवून मग समाधिसुख अनुभवशील, अर्थात् मुक्त होशील, तेव्हां पुनरपि तुला हें स्वर्गस्थान प्राप्त होईल."

याप्रमाणें त्या राजा इंद्रानें उःशाप सांगतांच त्या मरुद्गणास परमानंद झाला व राजा इंद्रास नमस्कार करून तो मूर्तिमंत तारकरूपानें (नक्षत्राच्या रूपानें) या कर्मभूमीवर उतरला. त्यावेळेस आकाशांत जो प्रकाश पडला, त्यामुळें क्षणभर चंद्रही लोपून राहिला. तो प्रत्यक्ष उपदेव मरुद्गण कर्मभूमीवर आला खरा; पण त्याचें पुण्य थोर, त्यामुळें त्याचें अंग फार तेजस्वी दिसत

असे. ज्या प्राण्याच्या पदरीं सात्विक पुण्य असतें, तो चौऱ्यायशी लक्ष योनि हिंडत असला तरी त्याला उत्तम शरीर लाभतें. त्याच्या सुकृतामुळें तो नाना प्रकारचे विषयभोग उपभोगितो, त्याची बुद्धि स्थिर असल्यामुळें तो निश्चयवंत असतो व कधींही त्याचा मनोभंग होत नाहीं. पुण्यवान् जें करूं ह्मणेल तें प्रत्यक्ष नारायण साह्य होऊन करीत असतो. पुण्याईचे योगानें पुण्य वाढतें, त्याचीच जगांत कीर्ति होते व अंतीं मोक्षपद-प्राप्तिही त्यासच होते. असो.

इंद्रानें शाप दिल्याकारणानें तो मरुद्गण मृत्युलोकीं तप्ती-पयोष्णी ( तापी व पयोष्णी नदी ) च्या तीरावर एक कर्दळी-वन होतें, त्या वनांत उतरला. त्या वनांत इतरही कित्येक फलवृक्ष उत्तम फलभारानें नम्र झालेले असून जाई, जुई, पारिजातक, पाडळी, चंपक, शेवती, बटमोगरा, सोनचाफा, बकुळी, इत्यादिक सुवासिक फुलझाडें फुललेलीं असल्यामुळें चोहोंकडे सुगंध सुटलेला होता; फुलझाडांवरून भ्रमर गुंजारव करीत असत व नानाप्रकारचे वनपक्षी मधुर शब्द उच्चारून परमेश्वराची अगाध लीला गात आहेत असें वाटत असे. अशा त्या वनांत ( हें स्थान खान देशांत तापी व पयोष्णी नदीच्या कांठीं प्रसिद्ध आहे.) तो मरुद्गण मूर्तिमंत योगिरूपानेंच उतरला आणि स्नान करून व डोळे झांकून अनुष्ठान करीत बसला. तो कोणाजवळही बोलत नसे व नेत्र उघडीत नसे, त्यामुळें सर्व लोकांस तो अंध आहे असें वाटत असे त्यास पाहतां पाहतां लोक परस्परांत असें बोलूं लागले कीं, तप्तीपयोष्णी-संगमावरील कर्दळी-वनांत कोणी अंधऋषि येऊन तपश्चर्या करीत बसला आहे; पण तो कोणीकडून आला आहे तें कांहीं कळत नाहीं. त्याचें शरीर फारच सुंदर आहे. मुखावर तेज इतकें आहे कीं, तें तेथें मावत नाहीं. पाहणाराचे डोळे दिपतात. असा या मृत्युलोकावर दुसरा मनुष्य दृष्टीस पडणें दुर्लभ होय, असें जो त्यास पाहतो तो म्हणत असतो. त्या ऋषीचें स्वरूप फार चांगलें दिसत असे, ह्मणूनच सर्व लोक त्यास चांगदेव ह्मणूं लागले

आणि गांवोगांवीं कीर्ति वाढत चालल्यामुळें सहस्रावधि लोक त्याच्या दर्शनास येत असत.

खानदेशांत वरणगांव नांवाचें एक गांव आहे, त्या वरणगांवचे दोघे ब्राह्मण, उभयतां सहोदर बंधु चांगदेवाची कीर्ति ऐकून व मनांत कांहीं कल्पना धरून एकमेकांच्या विचारानें तो तापसी जेथें अनुष्ठान करीत बसला होता, त्या ठिकाणीं आले. त्यांनीं येतांच बरोबर तुळशी, फुलें, बुका, उदबत्त्या, खजूर, इत्यादिक साहित्य आणलें होतें, तें काढून त्या ऋषीचें पूजन केलें आणि सद्भावनेनें हात जोडून त्याच्यापुढें उभे राहिले. त्याचें तें अत्युत्तम स्वरूप पाहतांच ते दोघेही मनांत तटस्थ झाले आणि आपल्याशींच ह्मणूं लागले :—"हा प्रत्यक्ष देव स्वर्गलोकांतून या भूमीवर उतरला आहे असें वाटतें. याला मनुष्य ह्मणतां येत नाहीं. सर्व लोक चांगदेव म्हणतात तेंच अक्षरशः खरें आहे. आमचे नेत्र धन्य! कांहीं पूर्वपुण्य पदरीं होतें ह्मणून आज या महात्म्याचें दर्शन घेत आहों. या बत्तीसलक्षणी पुतळयास पाहतांच चित्तवृत्ति गुंत झाली. खरोखर, जगाचा उद्धार करावा ह्मणून हा परमेश्वरच येथें येऊन बसला आहे. अशा संताचें यथार्थ भाषण ऐकतांच मनांतील सर्व संशय नाहींसे होतील. जेथें संतांचे चरण लागतात, तें स्थान पवित्र होतें. त्यांच्या चरणधूलीनें कोट्यावधि पातकी कुळें उद्धरून जातील."

याप्रमाणें त्याची वारंवार स्तुति करीत ते उभयबंधु त्या चांगदेवाची सेवा करीत त्याच ठिकाणीं राहिले. त्यास पूजनार्चनादिकांचें साहित्य तयार करून द्यावें, भक्ष्यभोज्यादि प्रकार तो इच्छील तर तेही प्रयत्नें करून आणावे व त्यास अर्पण करावे. तो शौचास गेला तर मृज्जलादिकांची तयारी करून ठेवावी. कधीं घरीं जाण्याची तळमळ नाहीं, असे ते बंधु, चांगदेव रात्रीं निजला म्हणजे त्यांनीं त्यांची चरणसेवा करावी, याप्रकारें करून एक महिना लोटला. नंतर योग्य संधि साधून त्यांनीं स्वामींच्या जवळ अशी प्रार्थना केली, कीं, "आतां कृपा करून स्वामींनीं आमच्यावर अनुग्रह करावा आणि

आमचा संसार सफळ होईल व जन्म घेतल्याचें सार्थक होईल असा उपदेश करावा." असें सांगून ते जेव्हां फारच आग्रह करूं लागले, तेव्हां चांगदेव त्यांस ह्मणाले:–"अरे बाबांनो, अनुग्रह कसा करावा हें मला कळत नाहीं. मी एकटा आंधळा ब्राह्मण या वनांत निर्वेधपणें अनुष्ठान करीत बसलों आहें. मला मंत्र, तंत्र इत्यादिकांचें ज्ञान नाहीं. माझा ठावठिकाण काय? व माता-पिता कोण? हेंही मी जाणत नाहीं, गृह, धन, कलत्र (स्त्री), पुत्र, इत्यादि कांहीं नसल्याकारणानें आमच्या सारख्यांस या जगांत मान्यताही नाहीं, तर अशाच्या नादीं लागण्यांत काय लाभ आहे? तुह्मी एकादा कीर्तिवंत सत्पुरुष शोधून काढा आणि त्याला शरण जा, म्हणजे तुमच्या सर्व मनकामना पूर्ण होतील. आह्माला ही उपाधि आवडत नाहीं व कांहीं येतही नाहीं."

याप्रमाणें चांगदेवानें त्या दोघांस जरी निक्षून सांगितलें, तरी ते लोभी ब्राह्मण अत्यंत विनय वाणीनें त्यांस म्हणाले:–"महाराज, आपली निर्मळ कीर्ति ऐकून येथपर्यंत धांवत आलों व ही तेजःपुंज मूर्ति पाहतांच जन्माचें सार्थक झालें असें मानून आपल्याच चरणीं निष्ठा ठेवून सेवा करूं लागलों; तर आतां प्राण जावो किंवा राहो, भक्तींत व्यभिचार होणार नाहीं. स्वामींनीं कृपा करून अनुग्रह दिलाच पाहिजे." याप्रमाणें त्यांची निष्ठायुक्त भाषणें ऐकून चांगदेवानें त्यांस भगवन्नाम–मंत्रोपदेश केला व त्या उभयतांसही नाम-स्मरणभुक्तीस लाविलें.

या गोष्टीला सात महिने लोटल्यावर एके वेळीं संधि पाहून ते चांगदेवास ह्मणाले:–"महाराज, आह्मी या संसारांत पडल्यापासून जरी कामधंदा करितों तरी सदा आपदा आमच्या पाठीस लागलेली आहे. कधीं पोटभर अन्न मिळालें असें झालेंच नाहीं. तेव्हां कंटाळा आला, त्रासलों आणि शेवटीं स्वामींचे चरण धरून बसलों. तर आतां आपणच कृपाळू होऊन कांहीं योग्य मार्ग दाखवाल तर तो दिसणार आहे. दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं." याप्रमाणें त्यांचा आशय ऐकतांच चांगदेवास त्यांची दया

आली व त्यांनीं त्यांस विचारलें:-"तुम्ही कोणता उद्योग करीत असतां?" ते ह्मणाले:-महाराज, भांडवल कर्ज काढून चाटेपणा ( कापड खरेदी करून विकण्याचा ) धंदा करीत असतों; पण त्यांत कधींही बर्कत येत नाहीं." असें ऐकतांच चांगदेवानें त्यांना सांगितलें:-"आतां तुम्ही जेव्हां बाजारास जाल, तेव्हां आह्मांला बरोबर घेऊन जा." असें ऐकतांच त्यांनीं चांगदेवाचे पाय धरले आणि पुन: सांगितलें:-"महाराज, आठा दिवशीं सोमवारीं संगमावर बाजार भरत असतो, तेथेंच आह्मी निरंतर जातों, पण पोटाला कांहीं उरत नाहीं. घरीं कुटुंब उपाशीं मरत आहे." असें ऐकतांच चांगदेवास त्यांची अधिकच करुणा आली. पुढें सोमवार आला, तेव्हां त्यांनीं स्वामींस घोड्यावर बसवून कापडाचें दिंड खांद्यावर घेऊन बाजारांत नेलें आणि पाली ठोकून व दुकान मांडून स्वामींला आसनावर बसविलें. स्वामींच्या बरोबर रिद्धिसिद्धि असल्यामुळें ते जेथें जाऊन बसतील तेथून दु:ख व दरिद्र नाहींसें होईल यांत काय आश्चर्य? चांगदेव दुकानावर येऊन बसतांक्षणीं त्या दिवशीं सर्व ग्राहकें त्या ब्राह्मणांच्या दुकानावरच येऊं लागलीं व ते सांगतील तें मोल देऊन त्यांच्याजवळ असलेला माल विकत नेऊं लागलीं. त्यांनीं जितकें कापड आणलें होतें, तितकें हां हां ह्मणतां विकलें आणि हिशेब करून पाहतां त्या दिवशीं त्यांस दुप्पट नफा राहिला. याप्रमाणें प्रत्यक्ष प्रत्यय येतांच त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें आणि आतां मात्र ऊर्जित काळ आला खरा, असें मनांत आणून ते स्वामींस म्हणाले:-"महाराज, आज आपण कृपा केल्यामुळें आह्मांस चांगला नफा राहिला व त्यामुळें आनंद होत आहे." असें ऐकतांच चांगदेव म्हणाले:-"अरे, तुमची शुद्ध भक्ति पाहून तो गिरिजावर शंकर तुमच्यावर प्रसन्न झाला, आमच्या हातीं काय आहे? त्या भगवंताच्या कृपेवांचून कांहीं होईल असें मनांतही आणूं नका." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच त्यांची खात्री झाली कीं, या साधूच्या अंगीं पराक्रम असून अहंतेचा लेशही वसत नाहीं. आपण करून तें भगवंतानें केलें असें जे मानतात,

तेच खरोखर संत होत. सर्वसिद्धि पायांशीं लोळत असतां आपणापाशीं कांहीं नाहीं असें जो मानील व अहंब्रह्म हें ज्याच्या मनांत असलें तरी बाह्योपचारीं दाखविणार नाहीं, तोच सर्वात्मक संत ठरेल. कित्येक योगबळानें आसनें उडवून दाखवितात, नानाप्रकारें सिद्धीचे सोहाळे दाखवून विषयलोलुपता अंगीं जागृत ठेवतात, त्यांस विश्रांतिसुख कधींही प्राप्त होत नाहीं. आम्ही ब्रह्मनिष्ठ आहों असें आपल्याच तोंडानें जो लोकांला सांगतो आणि चित्तांत परदोष व गुण चिंतन करीत राहतो, त्यास साधु संज्ञा न देतां केवळ अज्ञान असें म्हणावें. चांगदेवाचा प्रकार असा नव्हता, त्याला सर्व सिद्धि अनकूळ असतां शिष्यांस सर्व भगवंताच्या कृपेनेंच होतें, असें तो सांगत असे. असो. त्या चांगदेवाच्या शिष्यांनीं बाजारांतील दुकान आनंदानें आटपलें व स्वामींस आपल्या घरीं आणून उत्तम प्रकारें पाकनिष्पत्ति केली. चांगदेवानें मृत्तिकेचें शिवलिंग करून त्याचें पूजन केलें आणि धूप, दीप, नैवेद्यादि सर्व उपचार समर्पण करून त्या कैलासपतीची स्तुति करून त्यास आनंदित केलें.

नंतर उभयतां बंधूंनीं पात्रें सिद्ध केलीं आणि आनंदानें चांगदेवाच्या पंक्तीस बसून भोजनें केलीं. मुख व कर शुद्धि, आचमन, हीं कर्में झाल्यावर स्वामींस त्रयोदशगुणि तांबूल देऊन मृदुशय्या सिद्ध केली व तीवर स्वामींस निजवून उभयतां प्रेमानें चरणसंवाहन करीत बसले. याप्रकारें करून रात्रक्रमण केल्यावर सूर्योदय होतांच चांगदेव उठून कर्दळी–वनांत आपल्या स्थानाप्रत निघून गेले. ते व्यवसायीही स्वामींस त्यांच्या ठिकाणीं पोंचवून आपल्या घरीं गेले. तरी स्वामींच्या सेवेंत कांहीं ते अंतर पडूं देत नसत.

दुसरा बाजारचा दिवस येतांच त्यांनीं स्वामींची विनंति करून त्यांस पुनः बाजारांत नेलें आणि दुकानावर बसविलें. त्यामुळें पहिल्या बाजाराप्रमाणेंच त्यांच्या दुकानाची विक्री चांगल्या प्रकारानें झाली व अतोनात नफा दृष्टीस पडला. याप्रकारें करून एक वर्ष ते चांगदेवास आपल्या बरोबर बाजारांत

नेऊन दुकानावर बसवीत असत. त्या एका वर्षांत ते लक्षाधीश सावकार बनले. त्यांनीं पुष्कळ द्रव्य खर्चून स्वत: रहावयाचें घर चांगलें बांधलें, घरांतील बायका व मुलांच्या अंगावर चांगले चांगले दागिने करून घातले. याप्रकारें करून संपत्ति साध्य होतांच त्यांचा इष्टमित्रादिकेंकरून परिवार बहुत वाढला आणि जें चित्त स्वामिसेवेंत होतें, तें संसारांत रममाण होऊं लागलें. अर्थात् बुद्धीस भ्रंश पडल्याकारणानें प्रथमत: स्वामिसेवेची जी आर्त होती, ती जागच्या जागीं राहिली आणि दोघांपैकीं एकजण नित्य एकवेळ येऊन समाचार घेऊन जाऊं लागला.

चांगदेव महाज्ञानी, त्यांची ती पालटलेली वृत्ति चांगदेवाच्या चांगली ध्यानांत आली आणि धनसंपत्तीच्या मदामुळें हे आपल्याला विसरत चालले आहेत असें त्यांनीं मनांत आणलें व तेही निस्पृहपणानें वागूं लागले. जगांत जो साधक उत्पन्न होतो, त्यास कनक व कांता हीं दोन विघ्नें नडत असतात, त्यांची प्राप्ति झाली, म्हणजे त्या साधकास दुसरें कांहीं सुचेनासें होतें. ज्याप्रमाणें मातेपासून उत्पन्न झालेला कुपुत्र तरुण कांतेचें ऐकून विषयासक्त होत्साता तिच्या आज्ञेप्रमाणें वागतो व मातेचा उपमर्द करितो, त्याप्रमाणेंच त्या कुशिष्यांस स्वामीच्या कृपेनें संपत्तीचा लाभ होतांच ते चांगदेवास विसरत चालले. अग्नीपासून निपजणारें जीवन त्यास विझविण्यास साधन होतें. त्याचप्रमाणें कुशिष्योपदेश गुरूच्या उपहासास कारण होतो. जे पहिल्यानें दरिद्री होते, ते सद्गुरूच्या महासिद्धि-प्रसादामुळें संपत्तिवान् झाले आणि मंद बुद्धि मग त्या गुरूसच विसरत चालले. अशा शिष्यांच्या सहवासानें वारंवार संतापवृद्धि मात्र होते; म्हणून साधु निस्पृह होत्साते एकांत वनीं एकटे जाऊन बसतात व उपाधिरहित होऊन आत्मसाधन करितात. अनेकांच्या अनेक प्रकृति कधीं एक चित्त होणें नाहीं, हें प्रमेय जाणून साधु कोठेंही आसक्त होत नाहींत. ज्याला परमार्थ साधन करणें आहे, त्यानें एकांतवासच अवश्य केला पाहिजे. असो.

एके दिवशीं चांगदेव शिष्यांस पार्थिवासाठीं मृत्तिका आणावयाची आज्ञा करून ध्यानस्थ बसले. त्यावेळेस या संसारी शिष्याचें चित्त व्यग्र असल्या-कारणानें तो माती आणावयाचें विसरला आणि आयत्या वेळीं जेव्हां स्वामी माती मागूं लागले, तेव्हां घाबरला व भयाभीतही झाला. तरी कृत्रिम करावें असें मनांत आणून संगमावर गेला आणि वाळूची शाळुंखा करून तिच्यावर वाटी पालथी घालून स्वामींच्या जवळ आला, तों दुसराही ब्राह्मण तेथें आला होता. पहिल्यानें आपला प्रमाद दुसऱ्याजवळ सांगितला आणि शेवटीं म्हणाला:–"आपले स्वामी तर अंध आहेत, तर हें स्थावर शिवलिंग या ठिकाणीं आहे असें सांगून आजचा दिवस त्यांजकडून या वाटीचीच पूजा करवावी आणि उद्यां आपली वाटी काढून न्यावी." असा विचार करून त्यांनीं स्वामीजवळ येऊन सांगितलें:–"स्वामिमहाराज, नित्य शिव-लिंगासाठीं माती शोधून आणावी लागते. ती एकादे वेळीं चांगली मिळते, एकादे वेळीं वाईट मिळते किंवा समयीं मिळतही नाहीं. आज आह्मी संगमावर जाऊन एक अक्षय स्थावर शिवलिंग पाहून आलों आहों; तर स्वामींनीं कृपा करून त्याच शिवलिंगाचें नित्य पूजन करावें आणि परत आश्रमांत यावें असें आम्हांस वाटतें." याप्रमाणें त्यांचें भाषण ऐकतांच स्वामींनीं त्यांचें अंतर जाणलें आणि ह्मणाले:–"ही सर्व पृथ्वी लिंगाकारच आहे. तो पार्वतीवर आपल्या भक्तांचें अंतर जाणून लहान थोर रूप धरीत असतो. त्या विराटरूप भगवंताचा अंत कोणासही लागला नाहीं व लागणार नाहीं. तर तें स्थावर लिंग कोठें आहे तें मला दाखवा, म्हणजे मी त्याची पूजा करीन. व्यर्थ विलंब लावूं नका."

याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच त्यांनीं सर्व पूजासाहित्य बरोबर घेतलें आणि चांगदेवाचा हात धरून त्याला संगमावर घेऊन आले. नंतर वाळूवर वाटी पालथी घातली होती, ती त्यांनीं हातानें चांगदेवास दाखविली. तेव्हां "हरहर" शब्दोच्चार करून चांगदेवानें शंकराचें आराधन केलें. "त्या-

बरोबर साक्षात् शंकर त्या ठिकाणीं प्रगट झाले व त्यानें तें शिवलिंग अक्षय करून घेतलें.

इकडे ते दोघे शिष्य कर्दळी-वनांतील स्वामींच्या आश्रमांत आले व आपल्या हातानें पाकनिष्पत्ति करून चांगदेवाचें शिवार्चन होत आहे तों नैवेद्याचें पात्र वाढून तें त्या ठिकाणीं घेऊन आले. तेव्हां अत्यानंदें करून चांगदेवानें शिवास नैवेद्य समर्पण केला आणि पूजा संपवून व प्रार्थना करून तो सिद्ध चांगदेव शिष्याचा हात धरून आपल्या आश्रमीं आला. नंतर जेव्हां भोजन करण्यासाठीं सर्वांचीं पात्रें वाढलीं, तेव्हां चांगदेवानें शिष्यांला सांगितलें:—"आमची रोजची तूप घेण्याची वाटी कोठें आहे ती लौकर घेऊन या." तें ऐकतांच ज्यानें वाळूवर वाटी पालथी घातली होती व चांगदेवाला फसविलें होतें, तो घाबरला आणि वाटी काढून आणावयासाठीं धांवत धांवत संगमावर आला व वाळूवर पालथी घातलेली वाटी काढूं लागला, तों ती वज्रलेप होऊन राहिली! कांहीं केल्या जाग्यावरून हालेना. तेव्हां उकरून काढण्याचा प्रयत्न करूं लागला; पण मुळींच अंत लागेना. तेव्हां मात्र तो चांगलाच घाबरला. त्याला असें वाटलें कीं, ज्याच्या हातानें वाटी लिंगाकार होत्साती अक्षय स्थापित होऊन राहिली, त्यास जर आम्हीं केलेलें हें कृत्रिम कळलें, तर तो कोप करील व मग कुलक्षय केल्यावांचून राहणार नाहीं. शेंपटावर पाय देऊन भुजंगास जागृत करावें तशांतलाच हा प्रकार झालेला आहे. तथापि त्याला दुसरा कांहीं उपाय नाहीं. त्यांच्यापाशीं जाऊन जो प्रकार घडून आला तो यांना खऱ्या प्रकारानें सांगितला पाहिजे. असें मनांत आणून ते म्लान वदन करून परत चांगदेवाजवळ आले आणि जो अपराध त्यांच्या हातून झाला होता, तो सांगून व चरणांवर मस्तक ठेवून दीनपणानें रुदन करूं लागले. तें वर्तमान ऐकतांच चांगदेव आपल्या मनांत विस्मित झाला आणि "तो भगवान् कैलासनाथ कोणत्या गुणानें त्या कृत्रिम शिवलिंगाचे ठायीं प्रगट झाला हें कळत नाहीं." असें बोलून त्यानें सद्गदचित्तानें प्रथम

शंकराचें स्तवन केलें. नंतर ह्मणाला:-"हे भगवंता शंकरा, या पृथ्वीवर तुझीं अनंत लिंगें आहेत, असें असतां या भक्ताच्या भावनेस्तव वाटींतही प्रगट असा वटेश्वर होऊन राहिलास, मी अंधवृत्ति स्वीकारून राहिलों नसतों तर अशा कृत्रिमानें वंचित झालों नसतों. तर हे देवाधिदेवा आतां ही लिंगमय सृष्टि अवलोकन करण्याची शक्ति कृपा करून मला दे, इतकीच या दासानुदासाची प्रार्थना आहे." असें बोलून त्यानें आपले सतेज व दिव्य नेत्र उघडले. तो प्रकार पाहतांच त्याचे ते दोघेही शिष्य विस्मित झाले.

नंतर चांगदेवानें त्या दोघांही शिष्यांस "आतां या ठिकाणीं राहूं नका. आपल्या घरीं चालते व्हा" असें सांगितलें. इतर तामसी साधु कोणाचा किंचित् अपराध पाहतांच शाप देतात व आपल्या सुकृताची हानि करून घेतात. पण चांगदेवाचा प्रकार तसा नव्हता. त्यानें त्यांस क्षमाच केली व जा म्हणून मात्र सांगितलें. तेव्हां "मोठें दुर्घट संकट टळलें" असें समजून ते आपल्या घरीं आले. चांगदेवाच्या भक्तीस्तव भगवान् धूर्जटी वाटींत प्रगट झाला, ही कीर्ति चोहोंमुलखीं जातांच त्या वटेश्वराच्या दर्शनासाठीं तेथें नित्य यात्रा जमूं लागली. मोठमोठाले राजेरजवाडे, अमीरउमराव आणि सावकार भावार्थानें येऊन त्या वटेश्वर महादेवाचें पूजन करूं लागले. कित्येक आपापल्या मनकामना पूर्ण होण्यासाठीं त्या वटेश्वरास नवस करून काम झाल्यावर मोठ्या थाटानें येऊन ते नवस फेडीत व आनंदानें चांगदेवाचें व त्या महादेव वटेश्वराचें दर्शन घेऊन कृतार्थ होत. कित्येक सावकारांनीं द्रव्य खर्चून त्या वटेश्वर महादेवाचें देवालय आणि चांगदेवाचा मठ हीं उत्तम प्रकारें बांधून दिलीं. कित्येकांनीं त्या ठिकाणीं प्रशस्त धर्मशाळा बांधल्या. कित्येकांनीं अन्नसत्रें व नंदादीप चालू केले. सारांश, जेथें देव आणि भक्त वास करितात तेथें अष्टमहासिद्धि व नवनिधि मूर्तिमंत नांदूं लागतात; मग त्या ठिकाणीं काय कमी पडणार आहे? असो. या प्रकारें करून चांगदेवाचें

व त्यानें स्थापिलेल्या वटेश्वराचें माहात्म्य वाढतांच, सर्व साधारण लोक चांगदेवास चांगावटेश्वर या नांवानें ओळखूं लागले.

नंतर चांगदेवानें आपल्या मनांत विचार केला कीं, चौदा विद्या व चौसष्ट कला यांचा अभ्यास करून त्यांत काय चमत्कार आहे तो पहावा. याप्रमाणें मनांत येतांच तो अभ्यास करूं लागला. तरी तो योगी असल्याकारणानें त्याला विशेष श्रम पडले नाहींत. पुस्तक पुढें घेऊन एक वेळ तें वाचलें कीं त्यास मुखोद्गत व्हावें. कां न व्हावें? स्वर्गवासी योगभ्रष्ट शाप झाल्यामुळें कर्मभूमीवर उतरला; तरी त्याचें पूर्वपुण्य त्याच्या फळास आलें. त्यानें प्रथम सुभाष्ययुक्त वेदश्रुतींचा अभ्यास केला. बृहस्पतीप्रमाणें चारी वेद मुखोद्गत झाल्यावर न्याय, व्याकरण आदिकरून सहा शास्त्रांचा अभ्यास त्यानें केला. नंतर भूगोल, खगोल, ज्योतिष—भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळांत त्रैलोक्यांत काय झालें, काय चाललें आहे व काय होईल हें यथातथ्य सांगण्याचें ज्ञान, चौथी विद्या रसक्रिया—धन्वंतरीप्रमाणें महारोगपरिहारक ज्ञान, पांचवें नाडिज्ञान, ज्यामुळें रोगाचें ज्ञान व शरीरस्थ धातु पुष्ट आहे कीं क्षीण झाली आहे हें सहज समजणे, सहावी धनुर्विद्या—शस्त्रास्त्रपरिज्ञान, सातवी अस्त्रानेंच अस्त्रनिवारण, आठवी विद्या कामशास्त्र, ज्याचा अनुभव बहुधा कोणाला नाहीं असें नाहीं. नृत्यकला, संगीत, वादन, गायन, सहा राग, छत्तीस रागिण्या, एकवीस मूर्छना यांचा यथाशास्त्र अभ्यास केला. नंतर भूमीवर चालण्याप्रमाणें उदकावरून चालण्याची जी दमविद्या, तीही त्यानें अवगत करून घेतली. वस्तुमात्राची परीक्षा करून त्याविषयीं सत्यपरिज्ञान व दुसऱ्याच्या मनांत काय चाललें किंवा आलें आहे हें जाणणें, परकायाप्रवेश, गुप्त प्रगट होणें, वायुमार्गानें जाणें इत्यादि सर्व प्रकारचा अभ्यास करून प्रत्येकांत काय चमत्कार आहे हें चांगदेवानें पाहून घेतलें. परोपकार करण्याविषयीं दक्षता आणि प्रसंगीं लोकोत्तर चमत्कार दाखविणें या कृत्यांमुळें लोकांत त्याची विशेष प्रशंसा झाली. चौदावी विद्या योगा-

भ्यास–वज्रासनीं बसून एकाग्र चित्तानें षट्चक्रांचा भेद करणें इत्यादिक सर्व प्रकारचे दृढाभ्यास होत चालल्यामुळें अष्टमहासिद्धि त्याच्या दासी होऊन राहिल्या. सारांश, तो सर्व विद्या, कला व कुशलता यांत प्रवीण होत्साता लोकांत कीर्ति वाढवीत राहिला.

वाचकहो, चौदा विद्या व चौसष्ठ कला अवगत असोत; त्रिकाल ज्ञानी ह्मणून कीर्ति होवो; पण चित्तांत जर एक प्रेमकला नसेल तर कला त्याच अवकला आहेत असें समजावें. अभ्यासेंकरून औषधीज्ञान व प्रेतमुखांत अमृततुषार पाडून त्यास जिवंत करण्याची विद्याही साधेल; पण त्याहून भगवद्भक्तीची सत्यासक्ति व सत्यप्रेमा वरिष्ठ आहे. चांगदेवानें सर्व विद्या साध्य करून योगाभ्यासही केला; तरी त्यास आत्मविद्या प्राप्त झाली नव्हती; त्यामुळें त्याच्या सर्व विद्या कलाहीन होत्या असें ह्मटलें तरी चालेल. पुढें त्यास जेव्हां ज्ञानदेवाचें दर्शन झालें, तेव्हां आत्मपरिज्ञान होऊन त्यास कृतार्थता प्राप्त झाली. असो. तो प्रकार यथायोग्य स्थलीं सांगण्यांत येईल.

सिद्धाईची ख्याति होतांच चांगदेवाची प्रख्याति चोहों मुलखीं झाली आणि नित्य सहस्रावधि यात्रेकरी त्या चांगावटेश्वराच्या दर्शनास येऊं लागले. ज्याच्या भक्तीस्तव भगवान् गौरीनाथ वाटींत प्रगट झाला, तो चांगावटेश्वर प्रत्यक्ष शिवावतार होय, असें सर्वांमुखीं झाल्याकारणानें व त्याच्या सिद्धपणामुळें जो जी मनकामना धरून येई, ती त्याच्या केवळ दर्शनानेंच पूर्ण होऊं लागली. त्यानें अंधांस नेत्र व बधिरांस कर्ण देऊन कित्येकांचे गलित कुष्टादिक रोगही बरे केले. त्याचप्रमाणें कित्येक वांझा होत्या त्यांस पुत्र दिले. त्या वटेश्वराचें दर्शन घेतलें म्हणजे अगदीं दुर्बळ असेल त्यानें सावकार बनावें, त्यामुळें सर्व प्रकारेंकरून जगांत चांगदेवाप्रमाणें दुसरा कोणी नाहीं, अशी कीर्ति वाढली. भाविक लोक त्याच्या नांवाचा जप व भजन करूं लागले व त्याच्या नांवानें समंधही पळूं लागले. सिद्ध पुरुष चांगावटेश्वर जगांत प्रगट झाल्यावर त्याच्या सभोंवती नित्य यात्रा भरूं लागली. कित्येक महा-

सिद्ध, योगी, तापसी, ऋषि, मुनि, हेही येऊन परमादरानें त्याचें दर्शन घेऊं लागले. मोठमोठाले क्षत्रिय राजे, सावकार, अमीर, उमराव, हे तर नित्य सेवेस पडलेले असत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि इतर अठरा वर्ण त्याचें दर्शन घेऊन कृतार्थ होऊं लागले. तो प्रकार विस्तारेंकरून किती सांगावा? कित्येक राजे केवळ त्याचें कौतुक पाहण्यासाठींच सर्व साहित्य घेऊन येत असत व त्या ठिकाणीं कामनिक महिमा पाहून आश्चर्यचकित होऊन रहात असत. कित्येक विषयी जन नित्य नेमानें आपल्या कामासाठींच त्याच्या भजनीं लागत. कित्येक टाळ, विणे व मृदंगादिक घेऊन कीर्तनें करीत असत व नादब्रह्म मूर्तिमंत दाखवीत असत.

याप्रकारेंकरून कीर्ति वाढतां वाढतां शंभर वर्षे परिपूर्ण झालीं आणि देहावसान ( मरण ) काल सन्निध आला, असें योगाभ्यासामुळें चांगदेवास कळलें. तेव्हां त्याच्या जवळ जे कित्येक चांगल्या विश्वासाचे शिष्य होते, त्यांस त्यानें आपलें शरीर कांहीं दिवसपर्यंत सुरक्षित ठेवण्याबद्दल सांगून सर्व लोक पहात असतां आत्मा ब्रह्मांडीं नेला आणि शरीर काष्ठवत् अचेतन करून ठेविलें. नवद्वारांचें उल्लंघन करून प्राणवायु दशमद्वारीं नेऊन स्थिर केला. तेव्हां श्वासोच्छ्वासही बंद झाल्याप्रमाणें सर्वत्रांस दिसून आलें. यात्रा तर लोटलेली होतीच व शिष्य-सांप्रदायी लोक "स्वामी पुनः सचेतन होतील," असा भरंवसा ठेवून नऊ दिवस व नऊ रात्री लोकांस धीर देत राहिले. "काळाची वेळ अगदीं निघून गेली," असें जेव्हां चांगदेवानें पाहिलें, तेव्हां तो हळू हळू समाधि उतरूं लागला आणि त्याचा श्वासोच्छ्वास पुनः चालूं लागला. तेव्हां त्याच्या शिष्यवर्गास आनंद झाला. त्यांनीं आनंदाची बातमी दिल्यावरून सर्व लोक जयजयकार करूं लागले! तों एखादा प्राणी जसा निद्रेंतून जागृत होतो, तसा महा सिद्ध योगी चांगावटेश्वर जागृत झाला आणि देहावर येऊन चळवळ करूं लागला. पुनः पूर्ववत् सिद्धाईचे प्रकार चालू झाले, त्यामुळें सर्व जग आश्चर्य करूं लागलें. कलियुगांत मनुष्याचें आयुष्य शतवर्षें नियमित,

यास वेदवचनही प्रमाण आहे, तें असत्य न व्हावें म्हणूनच चांगावटेश्वर शत-वर्षांतीं दीर्घ समाधि लाऊन काळास वंचीत ( फसवीत ) असे; पण प्रत्येक शतकास आपलें ठिकाण बदलीत असे. पण तेथेंही यात्रा भरून लोक त्याच्या भजनीं लागत व आपापल्या इच्छा पूर्ण करून घेत असत. याप्रकारें-करून चौदाशें वर्षे चांगदेव पृथ्वीवर राहिला होता! चौदाशें वर्षांत प्रत्येक शतकांतीं एकेक वर्ष मात्र स्थलांतर करून तो वटेश्वराचे सेवेसाठीं पुन: तापी व पयोष्णीच्या तीरीं कर्दळी–वनांत येऊन रहात असे. नव्याण्णव वर्षे चांगदेव वटेश्वरीं राहतात व त्यांच्याजवळ अष्टमहासिद्धि व नवनिधि मूर्तिमंत वास करितात, असें सर्व जगांत चराचरांसही विदित झालें.

नंतर एक प्रतिष्ठान ( पैठण ) क्षेत्रांतील ब्राह्मण पंथ क्रमण करीत चालला असतां मार्गांत कित्येक यात्रेकरी भेटले; तेव्हां तो ब्राह्मण त्यांस "कोणी-कडून आलेत? व कोणीकडे जाणार आहां?" असें विचारूं लागला. तेव्हां ते यात्रेकरी त्यास वर्तमान सांगूं लागले व तोही प्रेमपुर:सर तें ऐकूं लागला:—

"तापीपयोष्णी–संगमावरील कर्दळी–वनांत चांगदेव नामक सिद्धपुरुष वास करीत आहे. त्यानें आपलें शरीर चौदाशें वर्षे संरक्षण करून ठेविलें आहे. त्याचें दर्शन घेतांच सर्व मनकामना पूर्ण होत असतात; असा त्याचा प्रत्यक्ष महिमा आहे."

याप्रमाणें त्या यात्रेकऱ्यांनीं सांगितलेलें वर्तमान ऐकतांच त्या ब्राह्मणास आनंद झाला व त्यानें चांगदेवाचें दर्शन घेण्याचा दृढनिश्चय करून तो त्या कर्दळी–वनाच्या मार्गास लागला. कांहीं दिवसांनीं तो ब्राह्मण तापी–संगमावर येऊन पाहतो तो लक्षावधि यात्रेकरी आपापल्या सोईप्रमाणें आसमंताद्भागीं उतरले आहेत व एकसारखा जयजयकार चाललेला आहे. तो प्रकार पाहतांच त्या ब्राह्मणास आश्चर्य वाटलें आणि त्यानें प्रथमत: जाऊन चांगावटेश्वराचें दर्शन घेतलें. नंतर तो त्याजकडे लक्ष्यपूर्वक पाहूं लागला; तों ही प्रत्यक्ष

शिवमूर्ति आहे असें त्यास वाटलें. सर्वांगीं विभूति चर्चन करून अंगावर रुद्राक्षांचीं भूषणें धारण केलीं आहेत. त्याचप्रमाणें व्याघ्रांबर (व्याघ्रचर्म) परिधान करून प्रत्यक्ष दुसरा शंकरच काय? असा तो योगेश्वर बसलेला आहे. कोणी झाला तरी ज्याची उपासना करितो, त्याप्रमाणें त्याची स्थिति होऊन राहते. चांगदेवाच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं वटेश्वर महादेव त्यास दिसत असे, ह्मणून जगास तो शिवरूपीच आहे असें भासत असे. त्यास पाहतांच संतोष पावलेला ब्राह्मण पुनः पुनः चांगदेवास नमस्कार करून चांगदेवाच्या जवळ परमादरानें बसला व त्याची स्तुति करीत म्हणालाः-"अहाहा! माझ्या साऱ्या आयुष्यांत हा आजचा दिवस धन्य आहे, ह्मणूनच या वेळेस स्वामींचें दर्शन व त्याबरोबर पाप, ताप, दैन्य, दोष इत्यादि दुर्गुणांचें निरसन झालें. हें केवळ पूर्वपुण्यच उदयास आलें व संताचें दर्शन झाल्यामुळें म्यां सर्व तीर्थांचें स्नान केलें, असा माझ्या मनाला भास होत आहे!"

याप्रमाणें त्या ब्राह्मणानें स्तुति करितांच चांगदेवास आनंद झाला, व त्यानें त्यास ह्मटलें, "महाराज, आपण कोण आहां? आपलें आगमन कोणीकडून झालें व कोणती इच्छा धरून कोणत्या स्थलीं जात आहां? हें सर्व सविस्तर कथन करावें. तुमचे देशांतील भूपति प्रजेचें पालन पुत्रवत् करीत आहे कीं नाहीं? त्याचप्रमाणें तुमच्या प्रदेशीं कांहीं अद्भुत चमत्कार झाला असेल, तर तोही कृपा करून आपण आम्हांस निवेदन करावा."

याप्रमाणें चांगदेवानें विचारतांच तो ब्राह्मण सांगूं लागलाः-"प्रतिष्ठान गंगातीर, ज्यास सर्व जग ब्रह्मक्षेत्र असें ह्मणत आहे, त्या क्षेत्रांत वास करीत असतों. कोणत्याही विद्येचा व्यासंग नसल्याकारणानें भिक्षाटन करावें आणि कुटुंबाचा निर्वाह करावा, अशी या अकिंचन व गरीब ब्राह्मणाची अवस्था आहे. आतां आपण "कांहीं अद्भुत घडलें असेल तर सांगावें," असें म्हटलें आहे, तर सांगतों ऐकावें.—आमच्या प्रतिष्ठान क्षेत्रीं या वर्षी सन्याशाचीं चार मुलें शुद्धिपत्र मागण्यासाठीं आलीं होतीं, त्यांनीं एके प्रसंगीं रेड्याच्या

मुखानें सांगोपांग ऋग्वेद वदविला! ही गोष्ट आह्मांस कोणी सांगितलेली नव्हे, तो अद्भुत चमत्कार प्रत्यक्ष पाहिला आहे."

याप्रमाणें ब्राह्मणानें सांगितलेलें वर्तमान ऐकतांच त्या चांगदेवास अत्यंत आश्चर्य वाटलें आणि तो हेतुपुरःसर पुनः त्या ब्राह्मणास विचारूं लागला:– "अहो द्विजवर्य, जो गृहस्थ पुत्रकलत्रादिकांचा त्याग करून व आशा, तृष्णा, ममता, इत्यादिक सर्व मनकामना सोडून राहिला, तो सन्यासी; त्याचीं मूलें म्हणजे काय? सन्याशाला मुलें झालीं कशीं? हें सविस्तर कथानक आम्हांस सांगावें."

असें ऐकतांच तो ब्राह्मण चांगदेवास ह्मणाला:–"महाराज, त्या निवृत्ति, ज्ञानराजादिकांचें जन्मचरित्र मीं एका ब्राह्मणाच्या मुखांतून ऐकिलें आहे तें सविस्तर आपणांस कथन करितों, ऐकावें."—

## निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांचें जन्मचरित्र.

प्रतिष्ठान–क्षेत्रस्थ ब्राह्मण चांगदेवास कथन करितो:–"गंगातीरावर आपेगांव नामक एक ग्राम आहे. तेथील वृत्तिवंत, पण पुण्यशील द्विजवर गोविंदपंत व निरूबाई नामक त्याची भार्या, हीं दोघेंही एक विचारांत आनंदानें आपल्या वृत्तीवर राहून कालक्रमण करीत असतां, त्या गोविंदपंतानें भार्येच्या अनुमोदनानें गैनीनाथ नामक महासिद्ध पुरुषाचा उपदेश घेतला. त्या कारणानें त्या स्त्रीपुरुषांत मूर्तिमंत वैराग्य व त्याबरोबर इतर सर्व सद्गुण वास करीत असत. पुढें कांहीं दिवसांनीं ती निरूबाई गर्भवती झाली, तेव्हां तेंच वैराग्य त्या साध्वीच्या उदरीं येणार असें, कित्येक तत्वज्ञ होते त्यांस वाटूं लागलें.

पुढें नवमास पूर्ण भरतांच ती निरूबाई प्रसूत झाली. गोविंदपंतानें यथाविधि पुत्राचें मुख पाहिलें, तेव्हां त्या उभयतांस संतोष वाटला. बाराव्या दिवशीं त्या पुत्राचें नांव विठोबा असें ठेविलें. नंतर जसा शुक्लपक्षांतील

चंद्रमा एकेका कलेनें नित्य वाढत जातो, तसा तो पुत्र वाढूं लागला आणि उत्तरोत्तर आपले सद्गुण दाखवूं लागला; तों तों त्याच्या त्या मातेस व पित्यास आनंद होऊं लागला. त्यांनीं त्यास आठवें वर्ष लागतांच त्याचा व्रतबंध केला आणि त्याच्या वेदशास्त्राध्ययनाचीही त्यांनीं व्यवस्था केली. तेव्हां थोडक्याच दिवसांत तो त्यांतही प्रवीण झाला.

नंतर मातापितरांची आज्ञा घेऊन तो विठोबा तीर्थाटनास निघाला, तो प्रत्येक क्षेत्रीं व तीर्थीं जाऊन अनुतापयुक्त होत्साता सचेल स्नानदानपूर्वक त्या त्या क्षेत्रतीर्थ–महिम्याप्रमाणें वागत असे. त्याच्या मुखानें सदा सर्व काळ प्रीतिपुरःसर राम, कृष्ण, नारायण, अच्युतानंत, गोविंद इत्यादिक भगवन्नामावलि चाललेलीच असे. त्यानें प्रथम द्वारकेस जाऊन गोमतीस्नान व श्रीद्वारकानाथाचें दर्शन घेतलें. तेथून निघाला तो पश्चिमेकडील सर्व पुराणप्रसिद्ध तीर्थें व क्षेत्रें पहात पहात तो भीमाशंकरास आला. त्यानें भीमानदीचें स्नान करून त्या ज्योतिर्लिंगाचें अर्थात् भीमाशंकराचें दर्शन घेतलें आणि तेथून इंद्रायणीचे तीरावर अलकापुरी ( आळंदी ) त तो विठोबा आला आणि त्या इंद्रायणींचें स्नान करून विष्णुपूजन करीत बसला.

अलकापुरींतील कुळकर्णी शिदोपंत त्याचवेळेस इंद्रायणीवर स्नान करण्यासाठीं आले होते, त्यांनीं स्नानसंध्यादि करून त्या विठोबास पाहतांच आपल्या घरीं नेलें व सुग्रास भोजन घालून संतोषविलें. नंतर सायंकालपर्यंत राहवून त्यांनीं त्यास त्याचें सर्व वर्तमान विचारलें. त्याप्रमाणें त्यानें तें सांगितलें. नंतर रात्र होतांच पुनश्च संध्यावंदनोत्तर त्यास उपाहारादिक देऊन त्यास निद्रा करावयास त्यांनीं आपल्या तुलशीच्या वृंदावनाशेजारीं जागा दाखविली.

त्याप्रमाणें तो विठोबा त्या वृंदावना शेजारीं जाऊन निजला आणि इकडे शिदोपंतही आपल्या बिछान्यावर जाऊन निजले. तों पहांटेस त्यास स्वप्न पडलें, त्यांत प्रत्यक्ष पंढरीनाथानें येऊन त्यांना सांगितलें:–"तुझी मुलगी उपवर

झाली आहे, ती त्या वृंदावना शेजारीं निजलेल्या ब्राह्मणास दे. म्हणजे त्याच्या व तिच्या उदरीं देवाचे चार अवतार होतील." याप्रमाणें पंढरीनाथानें सांगितल्यावर शिदोपंत जागृत झाले.

नंतर ज्योतिषी बोलावून त्यांस घटितार्थ विचारितां "सर्व गुण उत्तम येतात" असें तेही सांगूं लागले. शिदोपंतांनीं विठोबास तें वर्तमान सांगून त्याच्या अनुमोदनानें दोहोंकडून लग्नाची व्यवस्था केली आणि आनंदानें कन्यादान केलें. चार दिवसपर्यंत यथाविधि आनंदगजरांत लग्नसोहळा आटपला.

नंतर कांहीं दिवसांनीं ते शिदोपंत सहकुटुंब, त्या नवीन वधूवरांसह पंढरपुरास आले आणि त्यांनीं आपल्या त्या कन्येस व जामातास श्रीपांडुरंगाच्या पायांवर घातलें. चार दिवस उत्साह होत तों ते त्या क्षेत्रांतच राहिले; पण तो उत्साह आटपतांच त्यांनीं परत घरीं येण्याची तयारी केली. पण जामाताचे मनांत श्रीरामेश्वराचें दर्शन घेऊन यावें आणि मग घरीं जाण्याचा विचार पहावा असें होतें. याप्रमाणें त्याचें मनोगत समजतांच त्यांनीं त्यास यात्रेस जाण्याची आज्ञा दिली. तेव्हां त्या विठोबानें आनंदेंकरून दक्षिणेकडील सर्व तीर्थें व क्षेत्रें पाहिलीं व सासऱ्याजवळ कबूल केल्याप्रमाणें तो परत आळंदीस आला. शिदोपंताची व त्याची भेट होतांच शिदोपंतास आनंद झाला. नंतर विठोबानें तेथें कांहीं दिवस राहून आपल्या मातापितरांकडे जाऊन त्यांचें दर्शन घेण्याची आपली इच्छा त्यानें शिदोपंतास कळविली. तेव्हां त्याच्या इच्छेस्तव शिदोपंत स्वतः बरोबर जाऊन जामातासह कन्येस आपेगांवीं गंगातीरीं आणून पोंचविलें. व्याही गोविंदपंत आणि विहीण निरूबाई यांची भेट घेऊन शिदोपंतांनीं त्यांस वस्त्रें व भूषणें दिलीं आणि लग्नसंबंधानें साद्यंत सर्व वर्तमान त्यांना सांगितलें. तें ऐकतांच गोविंदपंतासही अत्याश्चर्य वाटलें. पुत्र व सून यांस पाहतांच निरूबाईस तर मनापासून अतिशय सुख वाटलें. नंतर त्या उभयतांची आज्ञा घेऊन शिदोपंत अलकापुरीस आले.

नंतर कांहीं दिवस लोटल्यावर त्या विठोबाची माता निरुबाई व पिता गोविंदपंत हीं उभयतां परलोकीं निघून गेलीं. हें वर्तमान कांहीं दिवसांनीं शिदोपंतास कळतांच जामातासह मुलीचा समाचार घ्यावा, असें मनांत आणून ते आपेगांवीं आले व पाहूं लागले तों विठोबा पूर्ण वैराग्य धारण करून संसारसंबंधाची सर्व चिंता सोडून बसला आहे. असें पाहतांच त्यांनीं त्या विरक्त जामाताची अनेक प्रकारांनीं समजूत करून त्यास आपल्या बरोबर आपल्या गांवीं अलकापुरींत आणून उभयतांचाही प्रतिपाळ करण्याचें मनावर घेतलें. तरी जामाताचे विरक्त विचार, चित्ताची चळवळ कांहीं केल्या कमी होईना. तेव्हां त्यांनीं त्यास एके दिवशीं बोलतां बोलतां तशा ओघावर गोष्ट आणून त्याला सांगितलें कीं, "तुह्मीं आपल्या स्त्रीस पुत्रसंतति होई तोंपर्यंत कांहीं चळवळ करून निघून जाल, तर अधर्म घडेल व पापाधिकारी व्हाल."

याप्रमाणें शिदोपंतांनीं वर्मावर धरून अडवितांच तो विठोबा निरुपाय होऊन केवळ क्षेत्रवासी राहतात त्याप्रमाणें राहिला व नियमानें पंढरीची आषाढीकार्तिकीची वारी करूं लागला. अहोरात्र विष्णुपूजन, हरिकीर्तन व नामस्मरण करीत तो जरी कित्येक वर्षें राहिला, तरी त्याला संतति होईना; तेव्हां कंटाळून एके दिवशीं तो आपल्या बायकोच्या जवळ सांगूं लागला:— "अगे, ऐकतेस; मला या संसाराचा अगदीं कंटाळा आला आहे. तूं जर आनंदानें मला सन्यास घेण्याची आज्ञा देशील, तर मी खरोखर संतोषित होईन." याप्रमाणें तिनें जरी त्याचें बोलणें ऐकलें, तरी त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं. तरी तें तिनें आपल्या आईजवळ व बापाजवळ मात्र सांगितलें. तेव्हां त्या उभयतांनींही तिला शिकवून ठेवलें कीं, "मला पुत्र झाल्यावांचून आपणांस सन्यास घेण्याची आज्ञा मजकडून मिळणार नाहीं. याप्रमाणें तो आज्ञा मागेल तर त्यावेळीं त्यास उत्तर देत जा." त्याप्रमाणें पुढें तिनें त्यास कित्येक वेळीं सांगून निरुत्तर केलें.

नंतर आणखी काळ लोटल्यावर एके रात्रीं त्या विठोबाची स्त्री रखुमाई बेसावध असतां त्या विरक्त विठोबानें "मी गंगास्नानास जातों, तुझी आज्ञा आहेना?" असें त्या भोळ्या स्त्रीस विचारिलें असतां, त्या विचारण्याचा खरा आशय न समजतां तिनें "जावें," असें सांगितलें. तें ऐकतांच तो रातोरात त्या आळंदींतून निघाला, तो वाराणशीस जाऊन अनुतापयुक्त होत्साता गंगास्नान करून श्रीविश्वेश्वराचे देवालयांत जाऊन पुराण ऐकत बसला. तेथें गीता–व्याख्यानांतील सन्यासमहिमा त्यावेळेस चालला होता. तो लक्ष्यपूर्वक ऐकतांच त्याच्या मनांत आलें कीं, "हा अनंत दुःखराशि दाखविणारा संसार आतां पुष्कळ झाला. आतां सर्वसंग–परित्याग करून सन्यास घ्यावा, तरच दुःखमुक्त होण्याचा संभव!" याप्रमाणें दृढनिश्चय होतांच तो तेथें रामाश्रमी सन्यासी होते, त्यास शरण गेला आणि "मला दीक्षा व अनुग्रह देऊन आपल्या सेवेस लावावें," असें त्यांस म्हणूं लागला. जेव्हां त्या स्वामींनीं त्यास त्याचे आप्तसंबंधी, स्त्री, पुत्र, बंधु इत्यादिकांविषयीं विचारलें, तेव्हां त्यानें त्यास खोटेंच सांगितलें कीं, "या जगांत मी एकटाच राहिलों आहें. गृह, धन, स्त्री, बंधु, आप्त यांपैकीं मला कोणीही नाहींत, ह्मणूनच या देहाचें तरी सार्थक करावें असें मनांत आलें आहे." याप्रमाणें त्याचें वर्तमान ऐकतांच तो सर्व प्रकारें सन्यास देण्यास योग्य आहे, असें मनांत आणून त्या स्वामींनीं त्यास सन्यासदीक्षा व उपदेश करून सर्व सन्यास-धर्मही त्यास चांगल्या प्रकारानें सांगितले. तेव्हां त्या उपदेशाप्रमाणेंच तो अत्यंत विरक्त होऊन वागूं लागला.

नंतर कांहीं दिवसांनीं आळंदीची यात्रा काशीस गेली होती व त्यांतील कित्येकांनीं विठोबास पाहून व ओळखून ठेवलें होतें. तें सर्व वर्तमान त्यांनीं आळंदींत आल्यावर शिदोपंतांजवळ सांगितलें, तेव्हां त्यास फार वाईट वाटलें. तें वर्तमान रखुमाईस कळल्यावर तीही अत्यंत दुःश्चित्त होऊन, केवळ देवसेवा करीत त्या भगवंतावरच सर्व भार ठेवून भावार्थानें त्याचें चिंतन करीत राहिली.

पुढें काय करावें हें तिला कांहीं सुचेना, ह्मणून तिनें शेवटीं सर्व सोडून अश्वत्थाची सेवा करण्याचा व त्यास प्रदक्षिणा घालण्याचा नेम केला.

भक्त संकटांत पडतांच ईश्वरास त्याची करुणा येते. रखुमाईनें मनोभावें करून अश्वत्थाची सेवा चालू केल्यावर कांहीं दिवसांनीं श्रीपादयति, सन्यासी त्याच पारावर येऊन बसले. तें नारायणस्वरूप पाहतांच रखुमाईनें शुद्ध भावनायुक्त होऊन त्यास नमस्कार केला. तेव्हां "पुत्रवतीभव" असा त्यांनीं तिला आशीर्वाद दिला. तो ऐकतांच तिनें हास्यवदन केलें. पण तें त्या यतीच्या ध्यानांत आलें आणि त्यानें "माते, मी आशीर्वाद देतांच तूं हास्यवदन कां केलेस हें मला सांग," असें अत्यंत आग्रहपूर्वक तिला विचारलें. तेव्हां तिनें हात जोडून त्यांना सांगितलें:–"महाराज, माझा भ्रतार वाराणशीस जाऊन सन्यास ग्रहण करून बसला आहे; तर आतां आपलें आशीर्वचन खरें कसें होणार? असें मनांत आल्यावरून हास्यवदन केलें; तरी त्याबद्दल आतां मी आपणाजवळ क्षमा मागतें. खरें पाहतां, घरीं तरुण स्त्री संतति विरहित असतां, त्यास ज्यानें संन्यास दिला आहे त्यास व त्या संन्यासदीक्षा घेणारास, दोघांसही शिक्षा असावी, ती तो ईश्वर कदाचित् देईल; पण मी तशी इच्छा करीत नाहीं. कारण, त्यांत माझ्या पतीस दुःख होईल."

याप्रमाणें तिचें भाषण व त्यांतल्या त्यांत पतीवर असलेलें प्रेम पाहून त्या श्रीपादयतीनें तिला तिच्या पतीच्या खाणाखुणा विचारल्या. त्या जेव्हां तिनें सर्व यथातथ्य सांगितल्या, तेव्हां तें सर्व आपल्यावरच येत आहे, असें त्या श्रीपादयतीच्या ध्यानांत आलें व त्यामुळें चित्तास फार वाईट वाटलें. तरी त्यांनीं तिला "येथें तुझीं कोणी आप्तसंबंधी, जनकजननी, इत्यादिकांतून कोणी हयात आहेत कीं नाहींत?" असें विचारलें व तिनें "सर्व आहेत" असें सांगितल्यावर "आपल्या पित्यास मजकडे घेऊन ये" असें सांगितलें. तें ऐकतांच तिनें घरीं जाऊन तें वर्तमान शिदोपंतास सांगितलें. तें ऐकतांच

त्यांनीं पारावर येऊन त्या श्रीपादयतीचें दर्शन घेतलें व सन्मानानें त्यास आपल्या घरीं नेऊन अर्घ्यपाद्यादिकेंकरून त्याची पूजा केली. नंतर ते श्रीपादयति शिदोपंतास म्हणाले:–"आमचा मठ श्रीकाशीक्षेत्रांत आहे. तेथून निघून श्रीरामेश्वराचें दर्शन घ्यावें अशा हेतूनें मार्गक्रमण करीत येथ-पर्यंत आलों. तुमच्या मुलीस सहज आशीर्वाद दिला असतां तिनें जें आपलें वर्तमान सांगितलें, तें सर्व आमच्या अंगासच चिकटत्त चाललें. हिच्या पतीस आम्हींच पूर्ण विचार न करितां सन्यास दिला आहे. पण हिच्या दोषेंकरून आमच्या सुकृताची नित्य हानि होत चालली आहे; यासाठीं परत वाराणशीस जाऊन हिचा पति हिच्या स्वाधीन करणें भाग आहे. यासाठीं केवळ आमच्या करितां तुम्ही सहकुटुंब या आपल्या मुलीस आपल्या बरोबर घेऊन आमच्यासह आनंदवनास चलावें, म्हणजे आपला जामात आपल्या स्वाधीन करून आम्हीं मोकळे होऊं." असें ऐकतांच शिदोपंतास आनंद झाला व ते सहकुटुंब त्या यतीबरोबर वाराणशीस आले.

श्रीपादयतींनीं विठोबाला सन्यासदीक्षा दिल्यावर त्याचें नांव चैतन्य ठेविलें होतें. ते श्रीपादयति जरी मठांत आले तरी त्यांनीं सहकुटुंब शिदोपंत व रखुमाई यांस आंत न आणतां बाहेरच बसवून ठेविलें होतें. असो. त्यांनीं मठांत येतांच पहिल्यानें चैतन्यास हाक मारिली आणि "तुझीं कोणीं मनुष्यें घरीं आहेत कीं नाहींत, हें सत्य सांग," असें त्यास मोठ्या रागानें विचारलें. तेव्हां अत्यंत विनयानें त्यानें त्यांचे चरण धरून सांगितलें:– "महाराज, घरीं तरुण स्त्रीचा मात्र त्याग करून आलों आहें, त्याबद्दल मला क्षमा करावी अशी प्रार्थना करितों." याप्रमाणें जरी तो बोलला, तरी त्या यतीनें रखुमाईस बोलाविलें व चैतन्यास "आतां हिचा अंगिकार कर," असें सांगितलें. अविधि कर्माचें भय मनांत न धरितां आमची आज्ञा प्रमाण मान; म्हणजे तो भगवान् हृषीकेश तुला साह्य करील व सर्व संकटांतून मुक्त करील. याबद्दल मनांत किंतु किंवा अविश्वास धरूं नको." याप्रमाणें

पुढें काय करावें हें तिला कांहीं सुचेना, ह्मणून तिनें शेवटीं सर्व सोडून अश्वत्थाची सेवा करण्याचा व त्यास प्रदक्षिणा घालण्याचा नेम केला.

भक्त संकटांत पडतांच ईश्वरास त्याची करुणा येते. रखुमाईनें मनोभावें करून अश्वत्थाची सेवा चालू केल्यावर कांहीं दिवसांनीं श्रीपादयति, सन्यासी त्याच पारावर येऊन बसले. तें नारायणस्वरूप पाहतांच रखुमाईनें शुद्ध भावनायुक्त होऊन त्यास नमस्कार केला. तेव्हां "पुत्रवतीभव" असा त्यांनीं तिला आशीर्वाद दिला. तो ऐकतांच तिनें हास्यवदन केलें. पण तें त्या यतीच्या ध्यानांत आलें आणि त्यानें "माते, मी आशीर्वाद देतांच तूं हास्यवदन कां केलेस हें मला सांग," असें अत्यंत आग्रहपूर्वक तिला विचारलें. तेव्हां तिनें हात जोडून त्यांना सांगितलें:-"महाराज, माझा भ्रतार वाराणशीस जाऊन सन्यास ग्रहण करून बसला आहे; तर आतां आपलें आशीर्वचन खरें कसें होणार? असें मनांत आल्यावरून हास्यवदन केलें; तरी त्याबद्दल आतां मी आपणाजवळ क्षमा मागतें. खरें पाहतां, घरीं तरुण स्त्री संतति विरहित असतां, त्यास ज्यानें संन्यास दिला आहे त्यास व त्या संन्यासदीक्षा घेणारास, दोघांसही शिक्षा असावी, ती तो ईश्वर कदाचित् देईल; पण मी तशी इच्छा करीत नाहीं. कारण, त्यांत माझ्या पतीस दुःख होईल."

याप्रमाणें तिचें भाषण व त्यांतल्या त्यांत पतीवर असलेलें प्रेम पाहून त्या श्रीपादयतीनें तिला तिच्या पतीच्या खाणाखुणा विचारल्या. त्या जेव्हां तिनें सर्व यथातथ्य सांगितल्या, तेव्हां तें सर्व आपल्यावरच येत आहे, असें त्या श्रीपादयतीच्या ध्यानांत आलें व त्यामुळें चित्तास फार वाईट वाटलें. तरी त्यांनीं तिला "येथें तुझीं कोणी आप्तसंबंधी, जनकजननी, इत्यादिकांतून कोणी हयात आहेत कीं नाहींत?" असें विचारलें व तिनें "सर्व आहेत" असें सांगितल्यावर "आपल्या पित्यास मजकडे घेऊन ये" असें सांगितलें. तें ऐकतांच तिनें घरीं जाऊन तें वर्तमान शिदोपंतास सांगितलें. तें ऐकतांच

त्यांनीं पारावर येऊन त्या श्रीपादयतीचें दर्शन घेतलें व सन्मानानें त्यास आपल्या घरीं नेऊन अर्घ्यपाद्यादिकेंकरून त्याची पूजा केली. नंतर ते श्रीपादयति शिदोपंतास म्हणाले:–"आमचा मठ श्रीकाशीक्षेत्रांत आहे. तेथून निघून श्रीरामेश्वराचें दर्शन घ्यावें अशा हेतूनें मार्गक्रमण करीत येथपर्यंत आलों. तुमच्या मुलीस सहज आशीर्वाद दिला असतां तिनें जें आपलें वर्तमान सांगितलें, तें सर्व आमच्या अंगासच चिकटत चाललें. हिच्या पतीस आम्हींच पूर्ण विचार न करितां सन्यास दिला आहे. पण हिच्या दोषेंकरून आमच्या सुकृताची नित्य हानि होत चालली आहे; यासाठीं परत वाराणशीस जाऊन हिचा पति हिच्या स्वाधीन करणें भाग आहे. यासाठीं केवळ आमच्या करितां तुम्ही सहकुटुंब या आपल्या मुलीस आपल्या बरोबर घेऊन आमच्यासह आनंदवनास चलावें, म्हणजे आपला जामात आपल्या स्वाधीन करून आम्हीं मोकळे होऊं." असें ऐकतांच शिदोपंतास आनंद झाला व ते सहकुटुंब त्या यतीबरोबर वाराणशीस आले.

श्रीपादयतींनीं विठोबाला सन्यासदीक्षा दिल्यावर त्याचें नांव चैतन्य ठेविलें होतें. ते श्रीपादयति जरी मठांत आले तरी त्यांनीं सहकुटुंब शिदोपंत व रखुमाई यांस आंत न आणतां बाहेरच बसवून ठेविलें होतें. असो. त्यांनीं मठांत येतांच पहिल्यानें चैतन्यास हाक मारिली आणि "तुझीं कोणीं मनुष्यें घरीं आहेत कीं नाहींत, हें सत्य सांग," असें त्यास मोठ्या रागानें विचारलें. तेव्हां अत्यंत विनयानें त्यानें त्यांचे चरण धरून सांगितलें:– "महाराज, घरीं तरुण स्त्रीचा मात्र त्याग करून आलों आहें, त्याबद्दल मला क्षमा करावी अशी प्रार्थना करितों." याप्रमाणें जरी तो बोलला, तरी त्या यतीनें रखुमाईस बोलाविलें व चैतन्यास "आतां हिचा अंगिकार कर," असें सांगितलें. अविधि कर्माचें भय मनांत न धरितां आमची आज्ञा प्रमाण मान; म्हणजे तो भगवान् हृषीकेश तुला साह्य करील व सर्व संकटांतून मुक्त करील. याबद्दल मनांत किंतु किंवा अविश्वास धरूं नको." याप्रमाणें

गुरूनें आज्ञा करितांच चैतन्यानें त्याच्या चरणीं मस्तक ठेवून आपल्या स्त्रीचा अंगिकार केला आणि सासऱ्यासह परत आळंदीस येऊन गृहस्थाश्रम-धर्माप्रमाणें वागूं लागला. पण त्याचे स्वज्ञाति ब्राह्मण निंदा करूं लागले व त्या सर्वांनीं मिळून त्यास वाळींत टाकलें. लोक जरी त्याची निंदा त्याच्या समोर करीत असत, तरी त्यानें पूर्ण शांति धरली आणि केवळ भिक्षाटन करू-नच आपला निर्वाह करण्याचा क्रम ठेविला. तो आपलें खोंपट गांवाच्या बाहेर एकांतीं अरण्यांत बांधून तेथें बारा वर्षें ईश्वरस्मरण करीत राहिला. त्या अवकाशांत त्यास तेजःपुंज तीन पुत्र व एक कन्या अशीं चार अपत्यें झालीं. प्रथम पुत्र झाला, तो मृडानीपति शिवाचा अवतार, त्याचें नांव निवृत्ति; दुसरा पुत्र झाला तो महाविष्णूचा अवतार, त्याचें नांव ज्ञानराज; तिसरा पुत्र झाला तो ब्रह्मदेवाचा अवतार, त्याचें नांव सोपानदेव ठेविलें. आणि कन्या झाली ती आदिमायेचा अवतार, तिचें नांव मुक्ताबाई. हीं चारी अपत्यें व त्यांची बाललीला पाहून रखुमाईच्या चित्तास अत्यानंद होत असे. असो.

नंतर कित्येक वर्षांत तीं चौघेंही मुलें मोठीं झालीं. तेव्हां ब्राह्मण-ज्ञातिधर्माप्रमाणें पाहतां मुलांच्या मुंजी, आणि मुलीचें लग्न करणें भाग. यावेळीं शिदोपंत व त्यांची स्त्री हीं निवर्तलीं होतीं. रखुमाबाईस भाऊ तर नव्हताच, ह्मणून तिनें एके वेळीं संधि पाहून भ्रताराजवळ गोष्ट काढली कीं, "महाराज, हीं चारी मुलें मोठीं होत चाललीं, ज्ञातिधर्माप्रमाणें यांचे संस्कार झाले पाहिजेत. यासाठीं प्रथम निवृत्ति व ज्ञानराज यांच्या व्रतबंधसंबंधानें ब्राह्मण बोलावून काय तो विचार करावा." असें ऐकतांच विठोबानें स्वतः मोठी खटपट करून ब्राह्मणांची सभा जमविली आणि त्या ब्रह्मसभेस लीन-पणानें साष्टांग नमस्कार घालून विनंति केली कीं, "महाराज, धर्मशास्त्र पाहून आह्मांस काय तो विचार सांगावा. तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आम्ही सद्‌गदीतपणें प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होऊं."

याप्रकारें करून विठोबानें त्या ब्राह्मणसभेस सविनय विनंति केली असतां ते ब्राम्हण त्यास म्हणाले:-"विठोबा, त्वां प्रथम विचार न करितां श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन व असत्य भाषण करून सन्यासग्रहण केलेंस आणि मग तुझी स्त्री आहे, तिचें अनुमोदन न घेतां तूं सन्यासग्रहण केलेंस हें तुझ्या गुरूस कळतांच त्यानें सांगितल्यावरून गृहस्थाश्रमाचा स्वीकार केलास आणि मग ही संतति उत्पन्न केलीस; पण तुझ्या संबंधानें प्रथमपासूनच धर्मशास्त्रास असंमत असा महान् अविधि झाला आहे. तर असा जो तूं त्या अविधीचा मूळ उत्पादक, त्या तुला देहांत प्रायश्चित्तच पाहिजे. दुसरा कांहीं विचार सांगतां येत नाहीं." याप्रमाणें त्या ब्राह्मणांचें वचन ऐकतांच त्यास फारच अनुताप झाला आणि स्त्रीपुत्र, गृह, धन, इत्यादि सर्वांचा त्याग करून तो आनंदवनास (काशीस) जाण्यासाठीं निघाला. तो निघतांच रखुमाबाईही सर्व माया, ममता व आशा सोडून त्याच्या मागून आनंदवनास निघून गेली. तेव्हां ते ब्राह्मण आपसांत ह्मणूं लागले कीं, "त्यास खरोखर अनुताप अथवा पश्चात्ताप झाला व त्याबरोबर त्यानें सर्वसंग-परित्याग केला. तर पश्चात्ताप हेंच थोर प्रायश्चित्त होय. गुरुकृपेनें तो प्रथमपासून शुद्धच होता असें ह्मटलें तरी कांहीं प्रत्यवाय नाहीं." असो.

माता व पिता हीं दोघेंही निघून गेल्यावर निवृत्तिनाथानें त्याच ब्राह्मणसभेस विनंति केली कीं, "महाराज, आपल्या वचनाबरोबर अनुतापयुक्त होत्साता आमचा पिता व पतिप्रीतीस्तव किंवा पातिव्रत्यास्तव माता हीं दोघेंही आम्हां अनाथांचा त्याग करून आपापल्या विचारानें निघून गेलीं; तर आतां आह्मां चवघांची काय गति व्हावी? आम्हीं काय करावें? हें सर्वांनीं यथायोग्य विचार करून आह्मांला सांगावें." याप्रमाणें निवृत्तिनाथानें विचारितांच त्या ब्राह्मणमंडळीनें त्या मुलांना सांगितलें:-"मुलांनो, तुम्ही देखतां देखत अज्ञान आहां. तुम्हीं होऊन कांहीं दोष केला आहे अशांतला प्रकार नाहीं. तरीही या प्रदेशीं सांप्रत मुख्य ब्रह्मक्षेत्र मानलेलें असें प्रतिष्ठान

क्षेत्र, गंगातीरावर आहे. त्या ठिकाणीं जाऊन तेथील ब्राह्मणांस तुम्हीं आपला सर्व विचार सांगावा, म्हणजे ते क्षेत्रस्थ ब्राम्हण जो न्याय करतील, तो आम्हां सर्वत्रांस मान्य होईल." असें ऐकतांच, तीं चारी भावंडें पैठणास जाण्यासाठीं तेथून निघालीं. त्यावेळीं त्यांच्याजवळच आळंदीकरांनीं पैठणकर ब्राह्मणांस देण्यासाठीं पत्र लिहून दिलें, त्यांतील आशय " हे सन्याशाच्या पोटचे पुत्र आहेत. तेव्हां शास्त्रविचार पाहून त्या अनुरोधानें जें योग्य दिसेल तें करावें आणि त्याप्रमाणें आम्हांस कळवावें." याप्रमाणें पत्र हातीं येतांच, निवृत्ति आदिकरून चौघांनीं मोठ्या प्रीतीनें त्या ब्राह्मणांस नमस्कार केला आणि तीं मुलें तेथून जीं निघालीं तीं कांहीं दिवसांनीं गोदातीरावर येऊन दाखल झालीं.

ती महागंगा दृष्टीस पडतांच सद्भावेंकरून चौघांनींही तिला साष्टांग नमस्कार केला. नंतर ती गंगा उतरून त्यांनीं स्नानें केलीं आणि त्या गंगेची प्रार्थना केली कीं, "माते, आम्ही दीन बालकें अज्ञान व पतित आहों असें सर्व म्हणतात; तर आमचा आतां तूंच जर उद्धार करशील व आह्मांस पावन करशील तर तुझ्या केवळ कृपाकटाक्षानेंच सर्व कांहीं होणार आहे. याप्रकारें स्नान करून अत्यंत शुचिर्भूत होऊन गंगास्तवन केल्यावर तीं मुलें प्रतिष्ठान क्षेत्रांत आलीं.

नंतर त्यांनीं त्या क्षेत्रांतील प्रत्येक ब्राह्मणाचे घरीं जाऊन नमस्कार करून त्यास आपलें सर्व वर्तमान सांगितलें आणि "कृपा करून सभा करावी आणि आह्मांला शुद्धिपत्र द्यावें," अशी त्यांची प्रार्थना केली. तेव्हां सर्व ब्राह्मण एकत्र जमले असतां, निवृत्ति राजानें त्यांस आळंदीकरांचें पत्र दिलें आणि आपल्या भावंडांसह नम्र होत्साता त्या ब्रह्मसभेपुढें हात जोडून उभा राहिला. तेव्हां कित्येक शास्त्रज्ञ ब्राह्मण शास्त्रें शोधून त्यांस देण्यासारखें कांहीं प्रायश्चित्त आहे कीं नाहीं हें पाहूं लागले. पण तसा प्रकार त्यांस कोठेंही आढळेना. शेवटीं सर्व ब्राह्मणांनीं विचार करून एकमतानें त्या चौघांसही सांगितलें

कीं, "मुलांनो, तुमच्या संबंधानें शास्त्रविचार पाहतां कोणतेंही प्रायश्चित्त आढळत नाहीं. आतां तुमचा तरणोपाय पाहतां हा एक विचार सुलभ दिसतो कीं, तुह्मी चौघांनींही त्या अनाद्यनंत भगवंतास शरण जाऊन तोच हें चराचर जगद्रूप धारण करून नटलेला आहे असें मानावें आणि गाय, खर, अजा, श्वान, पशु, पक्षी, मनुष्य, सर्व ईश्वररूप मानावें व भेदाभेद न मानितां सर्व चराचरास वंदन करीत रहावें. त्याचप्रमाणें मनांत अखंड भगवन्नाम ठेवून तदाकार वृत्तीनें असावें; तर मात्र खरोखर तुमचा उद्धार होईल."

याप्रमाणें त्या पैठणकर ब्राह्मणांनीं एक मत होऊन विचार सांगतांच निवृत्तीस अत्यानंद झाला. "स्वामींनीं उत्तम उपाय सांगितला!" असें ज्ञानराज व सोपानदेव हेही ह्मणूं लागले. इतक्यांत तेथें जमलेल्या ब्राह्मणांतून एकानें त्यांस "तुमचीं नांवें काय आहेत? सांगा," असें विचारलें. तेव्हां "निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई, अशीं आह्मां चौघांचीं चार नांवें आहेत," असें ज्ञानेश्वरानें त्या ब्राह्मणाजवळ सांगितलें. तेव्हां ते ब्राह्मण त्या मोठमोठाल्या नांवांवरूनच त्यांचा उपहास करूं लागले. फार काय सांगावें? एक उतावळा ब्राह्मण पुढें होऊन त्यास म्हणाला:–"अहो, तुमचें नांव ज्ञानराज हें काय पाहून ठेवलें बरें? तुम्हीं कांहीं श्रुतींचा अभ्यास केला आहे? किंवा पुराणव्युत्पत्ति शिकलां आहां? तर आपणास ज्ञानराज म्हणवितां? भलतेंच नामधारण करण्यांत काय लाभ आहे?" याप्रमाणें तो बोलत आहे, तों दुसरा एक ब्राह्मण त्यास म्हणाला:–"तुम्ही नांवावर काय जातां हो? त्यावर कांहीं प्रमाण नाहीं. तो पखाल पाठीवर घातलेला रेडा येत आहे, त्याचें नांव ज्ञानच आहे, त्यास काय तूं वेदाध्ययन केलें आहेस काय असें विचारणार? तर त्यांत काय अर्थ आहे?" याप्रमाणें त्या ब्राह्मणानें भाषण करितांच ज्ञानेश्वरानें सांगितलें:–"विप्र महाराज, त्या रेड्याचें नांव जर ज्ञान आहे; तर आत्मप्रतीतीनें विचार करून पाहतां त्याच्यांत" क.

आमच्यांत कांहीं भेद आहे असें नाहीं." असें ऐकतांच ब्राह्मण म्हणाला:- "जर तुमचा असा विचार आहे, तर कांहीं चमत्कार करून दाखवा. रेड्यांत व तुमच्यांत भेद नाहीं, असें जर तुमचें म्हणणें आहे, तर त्याज-कडून वेदश्रुति बोलवून दाखवा, म्हणजे सत्य- समजण्यास प्रतिबंध राहिला नाहीं."

याप्रमाणें त्या ब्राह्मणाचें वचन ऐकतांच, ज्ञानराजानें तो जो पाठीवर पखाल घातलेला रेडा चालला होता, तो त्यावरील पखाल उतरवून आपल्याजवळ व त्या ब्राह्मणाच्या समोर आणविला आणि त्याच्या मस्तकीं हात ठेवून त्यास आज्ञा केली कीं, हे ब्राह्मण तुझ्या मुखानें वेदवचनें ऐकण्याची इच्छा करीत आहेत, तर जन्मजन्मांतरीं त्वां जें वेदाध्ययन केलें आहे, तें या ब्रह्मसभेपुढें प्रकाशित कर, म्हणजे तुझा उद्धार होण्यास वेळ लागणार नाहीं." असें ऐक-तांच तो रेडा विधि, न्यास, उपन्यासपूर्वक सांगोपांग ऋग्वेदाचें अध्ययन करूं लागला. तो ऋग्वेद पूर्ण होतांच यजुर्वेद, नंतर साम व अथर्वण असे चारही वेद त्या पशूनें सर्वांस उत्तम प्रकारें ऐकविले. तेव्हां मात्र तेच ब्राह्मण आश्चर्ययुक्त होत्साते आपसांत म्हणूं लागले:-"अहो, आम्हीं सभाष्य वेदाध्ययन केलें; पण हें लोकोत्तर सामर्थ्य आमच्यांत नाहीं. हीं मुलें केवळ ईश्वराच्या विभूति आहेत; तर यांस प्रायश्चित्त देऊन शुद्ध करण्याचें सामर्थ्य या जगांत कोणास होणार आहे? हीं आपल्या प्रभावानेंच शुद्ध आहेत असें म्हणणें भाग आहे!" याप्रमाणें बोलून सर्व ब्राह्मण जेव्हां त्या ज्ञानराजास लोटांगणें घालूं लागले, तेव्हां त्यानें सद्भावेंकरून त्यांस नमस्कार केला आणि सांगितलें:-" महाराज, हा सर्व आपल्या चरण-कृपेचा महिमा आहे, आमच्याकडे कांहीं नाहीं, हें तो जगज्जनक सर्व जाणतच आहे."

वाचक हो, पैठणकर ब्राह्मण चांगावटेश्वरास याप्रकारें करून त्या निवृत्ति, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांच्या जन्मचरित्राची कथा सांगून

म्हणाला:-"महाराज, तो चमत्कार मीं आपल्या या नेत्रांनीं स्वतः पाहिला आहे. तोच आज या प्रसंगीं आपणांस विदित केला आहे."

## चांगावटेश्वराचें चरित्रः—( पुढें चालू )

ब्राह्मणानें ज्ञानराजादिकांचें जन्मचरित्र व त्यानें केलेला अघटित चमत्कार कथन करितांच चांगदेव आश्चर्यानें म्हणूं लागला:-" आम्हीं बहुत अभ्यास करून चौदा विद्या व चौसष्ठ कला अवगत करून घेतल्या; पण हें अघटित सामर्थ्य आमच्याजवळ नाहीं. कालवंचना करून चौदाशें वर्षें वांचलों आणि बहुत सिद्धपणा दाखविला; परंतु असें सामर्थ्य कांहीं आम्हांस प्राप्त झालें नाहीं." याप्रमाणें तो चांगावटेश्वर आपल्याशींच आश्चर्यचकित होऊन राहिला आहे तों तोच ब्राह्मण पुनः त्यास म्हणाला:-" महाराज, आणखी एक अघटित चमत्कार त्या ज्ञानराजानें पैठणांत असतां केला आहे, तो आपणांस सविस्तर कथन करितों. ऐकावा:-तो निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं चार मुलें पैठणांतच एका भाविक ब्राह्मणाच्या घरीं रहात असत. तो भावार्थी ब्राह्मण जात्या थोर, उदार व सत्वधीरही होता, त्यामुळें त्या मुलांस ईश्वरी अंश मानून त्यांचा आदरसत्कार करीत असे. त्या ब्राम्हणाचे घरीं नित्य भोजन करून त्या मुलांनीं रात्रौ प्रेमानें भगवद्भजन व हरिकीर्तन करावें व तें सर्व लोकांनीं सप्रेम चित्त होऊन ऐकावें. असा प्रकार कांहीं दिवस चालला असतां त्या ब्राह्मणाच्या घरीं पितृतिथि आली. त्यानें सर्व साहित्य तयार करून श्राद्धीय ब्राह्मणांस आमंत्रण देण्याच्या हेतूनें तो गांवांत उपाध्यायाच्या घरीं गेला व "उदयीक वडिलांची श्राद्धतिथि आहे; यासाठीं कृपा करून क्षणास व भोजनास यावें अशी प्रार्थना आहे," असें म्हणूं लागला. तेव्हां तो ग्रामोपाध्याय व इतर कर्मठ ब्राह्मण त्याचा निषेध करून त्यास ह्मणाले:-"त्वां देखतां देखत पतित सन्याशाचीं मुलें आपल्या घरीं नेऊन बाळगलीं आहेस. त्यांनीं नित्य

रात्रीं लोकांस हरिकीर्तनें ऐकविण्याचें दंभ माजवून सर्व कर्ममार्ग बुडवून टाकला. यास्तव आह्मी कोणीही तुझ्या घरीं भोजन करण्यास येणार नाहीं." याप्रमाणें ब्राह्मणांचें वचन ऐकतांच त्या गृहस्थास फार वाईट वाटलें आणि चिंतातुर होत्साता तो तसाच आपल्या घरीं आला व विशेष चिंता करीत बसला.

"ज्ञानराज तो ब्राह्मण बाहेर गेल्यापासून त्याची वृत्ति पहात होता, तो विशेष चिंतातुर होऊन बसला आहे, असें पाहतांक्षणीं त्यानें त्याच्याजवळ जाऊन "आज आपण असे चिंतातुर कां झालां आहां ?" असें त्यास विचारलें. तेव्हां त्या ब्राम्हणानें सर्व वर्तमान ज्ञानराजाजवळ उघड करून सांगितलें. तेव्हां तो सर्वांचें मनोगत जाणणारा प्रत्यक्ष विष्णूचा अवतार ज्ञानराज त्यास ह्मणाला:-"महाराज, आपण असे चिंतातूर होऊन बसूं नये. सद्गुरुनिवृत्ति-प्रसादेंकरून सांगतों हें सत्य मानून आपण प्रतिवार्षिक नियमाप्रमाणें पाक-निष्पत्ति करवावी. या क्षेत्रांतील ब्राह्मण जरी भोजनास न आले तरी भगवत्कृपेनें प्रत्यक्ष पितृदेवता भोजन करण्यासाठीं येतील व आपलें प्रति-वार्षिक श्राद्ध होऊन जाईल."

याप्रमाणें ज्ञानराजाचें वचन ऐकतांच त्या ब्राह्मणानें हर्षयुक्त होऊन स्वयं-पाक करविला आणि स्वत: तीळ, तांदूळ, दर्भ, तुळशी, फुलें, धूप, दीप इत्यादि पूजासाहित्य सिद्ध करून धोत्रजोडे व दक्षिणाद्रव्य जागच्या जागीं मांडून स्वत: स्नान करून शुचिर्भूत होत्साता पितृपूजनासाठीं येऊन आसनावर बसला! अपराण्हकाल होतांच ज्ञानराजानें पितृस्थानासन्निध येऊन "आगन्तम्" असें म्हणतांच अद्भुत चमत्कार झाला! पितरस्वरूपी जनार्दन आसनावर येऊन बसले. सर्व पितृदेवता आपापल्या नियमित आसनावर बसलेल्या पाहतांच आनंदयुक्त झालेल्या त्या ब्राह्मणानें वेदमंत्रोच्चारपूर्वक त्या सर्व पितृदेवतांचें पूजन केलें. वेदमंत्रांचा घोष होऊं लागतांच, क्षेत्रस्थ ब्राह्मण जे मार्गांत आटबाजूस उभे राहून चमत्कार पहात होते, त्यांच्या कानीं ती वेदध्वनि

जातांच ते आपापल्या ठिकाणीं आश्चर्यचकित होऊन राहिले. ज्ञानदेव प्रत्यक्ष ईश्वरावतार आहे, असें त्यांच्या प्रत्ययास आल्याकारणानें त्यांची सर्व अहंता नाहींशी झाली. प्रत्यक्ष पितर उतरून भोजन करूनच दक्षिणा घेऊन गेले असे पाहतांच ते ब्राह्मण कर्माभिमान सोडून शुद्ध चित्त होत्साते ज्ञानराजास आपसांत वाखाणूं लागले.

इकडे त्या गृहस्थानें यथाविधि पितृपूजन करून त्यांच्या रुचीप्रमाणें त्यांस भोजन वाढलें. सर्वांची तृप्ति झाल्यावर करशुध्यर्थ उदक अर्पण करून त्रयोदशगुणी तांबूल समर्पण केलें, त्याचप्रमाणें भोजनदक्षिणा दिल्यावर ज्ञानराजानें त्यांजकडे पाहून "स्वस्थाने वासः" असें म्हणतांच ते आपापल्या स्थानीं निघून गेले.

नंतर दोन महिनेपर्यंत पैठणक्षेत्रांत वास करून ज्ञानराजानें सर्वांस वेदांत-व्याख्यान कथन केलें. जो रेडा वेद बोलला होता, तो त्याच्या धन्यापासून त्यांनीं मागून घेतला आणि सर्वांचा निरोप घेऊन तीं चारी भावंडें आळंदीस निघून गेलीं. ब्राह्मण चांगदेवास म्हणाला:—"महाराज, या गोष्टीस एक महिना होऊन गेला. तो चमत्कार पाहूनच मी तेथून निघालों तो आपल्या भेटीस आलों." याप्रमाणें त्या ब्राह्मणानें ज्ञानराजाचा अद्भुत चमत्कार सांगतांच चांगदेव आपल्या मनांत विस्मित झाला. तो आपल्याशीं म्हणूं लागला:—"ईश्वराची करणी अघटित आहे. जगांत एकाहून एक समर्थ आहे! मीच एक गायक असा नारदास अभिमान होतांच श्रीकृष्णानें आस्व-लांकडून रागोद्धार करविला. माझें पात्र काय तें थोर, असा सागरास अभिमान होतांच अगस्त्य मुनीनें त्याला प्राशन करून आपल्या उदरांत सांठविलें. त्याप्रमाणेंच आम्हीं जरी चौदाशें वर्षें जगांत राहून अद्भुत सिद्धपणा दाखविला, तरी आमच्याहून तो ज्ञानराज श्रेष्ठ आहे यांत संशय नाहीं."

याप्रकारें करून तो मरुद्गणावतार चांगदेव जरी ज्ञानदेवानें केलेले अद्भुत चमत्कार ऐकतांच विस्मित झाला, तरी त्याच्या मनांत शंकाही राहिलीच.

तेव्हां ती दूर व्हावी अशा उद्देशानें त्यानें समाधि लावून ब्रह्मांडीं प्राण नेऊन सांप्रत देवतात्रय कोणीकडे आहे याचा शोध चालविला. तों तिन्ही देवांनीं आदिमायेसह अलकावती क्षेत्रांत अवतार घेतले आहेत, असें त्यास कळलें. नंतर प्रतिष्ठान क्षेत्रीं रेड्याच्या मुखानें वेद बोलविले आणि प्रत्यक्ष पितर जेवावयास बोलाविले, हेंही सर्व सत्य आहे असें त्यास योगबलामुळें समजून आलें आणि मग मात्र त्या संबंधानें त्याच्या जिवाची पूर्ण खात्री झाली.

नंतर चांगदेवाचे शिष्यसांप्रदायी लोक बहुत होते; त्याप्रमाणें यात्रेच्या संबंधानेंही बहुत लोक त्याच्या सभोंवती जमले होते; त्या सर्वांस एकत्र करून चांगदेवानें आपलें सर्व पूर्वचरित्र त्यांस वर्णन करून सांगितलें आणि शेवटीं बोलला कीं, " आम्हांस देवेंद्रानें उःशापही असाच दिला होता कीं, जेव्हां जगदोद्धार करण्याकरितां तिन्ही देव अवतार घेतील व त्यांची अद्भुत कीर्ति ऐकून तूं त्यांचें दर्शन घेशील, तेव्हां ते तुला उपदेश करून मुक्त करतील. तर आतां हा सर्व उपद्व्याप सोडून आम्हांस त्या ज्ञानराजाच्या दर्शनासाठीं अलकापुरीस गेलें पाहिजे." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच जे केवळ पोटार्थी, चांगदेवाजवळ राहिल्यामुळें उदरनिर्वाह चांगला होतो असें समजून, त्याला चिकटून राहिले होते त्यांस वाईट वाटलें आणि ते त्याच्या जाण्यास अडथळा करावा म्हणून त्यास म्हणाले:—" महाराज, जो महंत आहे, त्यानें एकाद्याची पूर्ण परीक्षा न करितां आपलें स्थान सोडून एकाएकीं जाऊं नये, असा लोकाचार आहे. त्यामुळें महत्वाची हानि होण्याचा संभव आहे. या जगांत अनेक प्रकारचे सिद्ध व त्यांच्या सिद्धपणाचे अनेक भिन्न भिन्न प्रकार आहेत. यासाठीं प्रथम आपण येथेंच राहून ज्ञानराजाकडे शिष्याच्या हातीं एक पत्र पाठवावें. त्याचें उत्तर आल्यानंतर त्यांतील आशय वाचून व तारतम्य भाव पाहून मग मनास योग्य वाटेल तर दर्शनास जावें." याप्रमाणें शिष्याचें वचन ऐकतांच तें त्या योगेश्वरास मानवलें आणि दौत, लेखणी

व कागद आणून तो पत्र लिहिण्याच्या उद्देशानें मनन करीत बसून राहिला. तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला:—"आतां त्यास श्रेष्ठपणा देऊन जर लिहावें, तर त्याचें बालवय आहे, हें उघड दिसत आहे. बरें, लहान समजून जर तसें लिहावें तर जनांत अद्भुतकरणी दाखविल्याबद्दल कीर्ति गाजत आहे. अग्निस्फुलिंग जरी लहान दिसलें तरी इंधनाचा संयोग होतांच ते थोर दिसणार हें ठरलें आहे." याप्रमाणें अनेक प्रकार मनांत आणून ते चार घटका विचार करीत बसले. शेवटीं कसें व काय लिहून पाठवावें, हें ध्यानांत येईना; म्हणून त्यांनीं तो कोराच कागद गुंडाळला आणि दोघां शिष्यांस बोलावून तो त्यांच्या हवालीं केला व तोंडानें त्यांना सांगितलें:—"तुम्ही आळंदीस जाऊन आमचें हें पत्र निवृत्तिज्ञानराजादिक तेथें प्रसिद्ध आहेत, त्यांस द्यावें आणि ते काय बोलतील तें ध्यानांत ठेवून त्यांची उपासना कोणती आहे? तीं मुलें कोणत्या दैवताची भक्ति करितात? इत्यादि सर्व प्रकार तारतम्यानें जाणून आमच्याकडे येऊन त्यांजकडील सविस्तर वर्तमान निवेदन करावें. त्यांची विद्या काय? लीला कशी करितात? त्यांच्या सिद्धीचा सोहळा काय आहे? हें सर्व पाहून व चांगलें ध्यानांत ठेवून परत या. निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं चार मुलें जरी दिसलीं तरी ब्रह्मा, विष्णु, महेश व आदिमाया यांचे ते अवतार आहेत. यास्तव त्यांस आमचें प्रेमपूर्वक नमन कथन करण्यास विसरूं नका." याप्रमाणें मनांत आलेलें सर्व सांगून चांगदेवानें त्या शिष्यांच्या मस्तकावर हात ठेवितांच त्यास नमन करून ते दोघेही आळंदीच्या मार्गास लागले. ते दोघेही चांगदेवाचे महा भक्त अहोरात्र त्याचें नामस्मरण करून राहणारे असल्याकारणानें, त्यावर निष्ठा ठेवून चालूं लागतांच, चांगदेवानें आपल्या सिद्धिसामर्थ्यानें त्यांचे मार्गश्रम नाहींसे करून जाग्यावरून निघाल्यापासून दोन घटका चालताहेत तों त्यांस आळंदीक्षेत्राच्या सन्निध नेऊन पोंचविलें. तरी हीच आळंदी असें त्यांस ओळखतां आलें नाहीं.

चांगदेवाचे ते दोघे शिष्य आळंदीच्या जवळ येऊन मार्गांत भेटणाऱ्या लोकांस "या गांवाचें नांव काय?" असें विचारूं लागले; तेव्हां त्या लोकांनीं ही आळंदी आहे असें त्यांना सांगितलें. तें ऐकतांच, आपल्या गुरूच्या अद्भुत सामर्थ्याबद्दल त्यांस फारच आश्चर्य वाटलें. नंतर आपलें ठिकाण येथून किती दूर आहे या बद्दलही त्यांनीं चौकशी केली, तों तें अडतीस योजनें लांब आहे असें त्यांस कळलें. तेव्हां मात्र त्यांस अत्यंत आश्चर्य वाटलें. ते जरी इतके दूर आले होते, तरी चांगदेवाची कीर्ति ऐकतच होते व त्यामुळें त्या आपल्या गुरूवर ते विशेष भाव ठेवीत होते. असो. आळंदींत येतांच त्यांनीं इंद्रायणीचें स्नान केलें. संध्यावंदनादि नित्य कर्मही आटपून घेतलें आणि निवांतपणें ज्ञानेश्वराचें दर्शन घेण्यासाठीं चौकशी करीत निघाले. तों एक विष्णुस्वरूपी ब्राह्मण त्यांस मार्गांतच भेटला व त्यानें ज्ञानेश्वराच्या राहण्याच्या जागेच्या सर्व खाणाखुणा त्यांना सांगून बोलत बोलत त्यांस त्या ठिकाणाजवळच आणून पोंचविलें आणि मग तो आपल्या कामास निघून गेला.

ज्ञानेश्वरानें जेव्हां त्या चांगदेवाच्या दोघां शिष्यांस आपल्याकडे येतांना पाहिलें, तेव्हां निवृत्तिनाथास हाक मारली व त्यांच्याजवळ म्हणूं लागले:— "आपण ज्याच्यासाठीं या भूमीवर अवतार घेतले, त्या चांगदेवाचें दर्शन आपणांस अगदीं अल्पकाळांत होईल असें वाटतें आहे. तो चांगावटेश्वर महासिद्ध पुरुष आहे, त्याचे हे दोघे शिष्य आपल्याकडे त्यानें दिलेलें पत्र घेऊन येत आहेत; पण त्यानें पाठविलेलें पत्र कोरेंच आहे, त्याबद्दल मात्र माझ्या मनाला आश्चर्य वाटत आहे." याप्रमाणें ज्ञानेश्वर बोलत आहे तों ते दोघे त्याच्याजवळ आले आणि साष्टांग नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. तों ज्ञानदेव त्यांस म्हणाले:—"आपण तप्तिसंगमावरून आलां आहांना? चांगावटेश्वरानें आम्हांस कोरेंच पत्र पाठविलें आहेना?" असें ऐकतांक्षणीं ते दोघेही आपल्या मनांत विस्मित झाले व त्यांस म्हणाले:— "महाराज, आपण जगच्चित्त परीक्षक केवळ परब्रह्मपुतळे आहां. आमच्या-

सारख्या पामरांनीं आपल्या लोकोत्तर प्रभावाचें वर्णन काय करावें? ज्या-प्रमाणे कीर्ति ऐकिली त्याप्रमाणें स्थिति प्रत्यक्ष अवलोकनांतही आली. आज या नेत्रांची धन्यता काय व किती वर्णन करावी? जे आपल्यासारख्या महात्म्यांचें चरणावलोकन करीत आहेत, ते हे नेत्र आज पूर्ण सफल झाले, असें आम्ही मानीत आहों." असें बोलून त्यांनीं चांगदेवानें दिलेला कोरा कागद ज्ञानराजाच्या पुढें ठेवला, तो उलगडून पाहतां, कोरा आहे असें प्रत्यक्ष अवलोकन करून ज्ञानराज निवृत्तिनाथास म्हणाले:—"चांगावटेश्वरानें हा कागद कोराच कां पाठविला असावा?" असें ऐकतांच निवृत्तिनाथ त्यास सांगू लागले:—"तो मरुद्गणावतार चांगावटेश्वर कर्मभूमीवर उतरून चतुर्दश विद्या व चतुष्षष्ठि कला प्रवीण होत्साता, अष्टांग योगसाधन करून चौदाशें वर्षें कालवंचना करीत व आपला सिद्धपणा जगाला दाखवीत राहिला आहे. अष्टमहासिद्धि त्यानें वश करून ठेविल्या आहेत. त्या चांगदेवाचा पार या जगांत कोणासही लागणार नाहीं. जीवमात्राचें अंतर व स्वर्गांतील चमत्कार जाणण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं आहे. त्यामुळें सिद्धपणाचा ताठा व अहंकार त्याच्या अंगीं पूर्ण भरला आहे. सर्व आहे खरें; पण एक आत्मज्ञानकला साधलेली नाहीं, त्यामुळें त्याच्या ज्या कला त्या सर्व विफला झालेल्या आहेत. त्यानें जेव्हां तुमची कीर्ति ऐकिली, तेव्हां त्याच्या जिवाला चटपट लागली. तुह्मांला पत्र लिहून पाठवावें असेंही त्याच्या मनांत आलें, तरी श्रेष्ठकनिष्ठाचा निवाडा होईना. कारण, आत्मज्ञानाशिवाय तो कोरा असल्याकारणानें त्याच्या-कडून हा कोराच कागद आलेला आहे. तर ज्ञानराजा, तूं त्या वटेश्वरास असें पत्र लिहून पाठीव कीं, तें वाचतांच त्याच्या अंतःकरणास बोध होईल."

निवृत्तिनाथाचें भाषण ऐकतांच ज्ञानराजानें त्यास नमस्कार केला आणि चांगदेवास पत्रोत्तर म्हणून एक लहानसाच पण ज्याचा अर्थ खोल व अत्यंत गहन असा एक 'लिखित पासष्टी' या नांवाचा ग्रंथ तिकडे पाठविण्यासाठीं त्यांनीं आपल्या हातानें लिहिला. त्याचा अर्थ म्हणजे आत्मसिद्धांत ज्ञानाची

ओळख होणें आहे. अर्थात् अर्थ अति गहन, गंभीर व खोल असा प्रकार जरी आहे, तरी त्याचा संकलितार्थ असा आहे कीं:—

"स्वस्ति श्रीचांगावटेश्वर यांस:-जगच्चालक परब्रह्मचराचर व्यापून राहिलें असल्याकारणानें या जगांत द्वैत पाहतां मुळींच नाहीं. तरीही हें शरीर कोणाचें आहे? यांत वास्तव्य करणारा कोण आहे? व त्याची स्थिति काय आहे? हें प्रत्येक देहधारीयानें आपल्याशींच विचार करून जाणण्यासारखें आहे. योगाभ्यासेंकरून रिद्धिसिद्धि अखंडऐश्वर्य जरी प्राप्त झालें, तरी त्या सच्चिद्घनाच्या सत्यज्ञानाविरहित ते सर्व प्रकार अंतीं कष्टप्रद भासणार यांत संशय नाहीं. दशेंद्रियांहून अति चंचळ असें जें मन तें आवरून आत्मविचारांत जो स्थिर होऊन राहिला, तो द्वैतत्यागामुळें भगवच्चरणारविंदीं स्थिर झाला असें जाणावें." या प्रकारेंकरून त्या लिखित पासष्टीचा भावार्थ जो अत्यंत गहन, तो कोठवर सांगावा?

ज्ञानेश्वरानें ती पासष्टी किंवा पत्रिका आपल्या हातानें लिहून त्या दोघां शिष्यांच्या हवाली केली आणि "ज्ञानेश्वराचा चांगदेवास नमस्कार सांगावा व त्यांस असें सांगावें कीं, तुह्मीं चौदाशें वर्षें शरीर रक्षण करून या जगाचा अनुभव बहुत घेतला आहे, तर हें उत्तर अनुभवास आणून त्याचें सार्थक करून घ्यावें." याप्रमाणें ज्ञानराजानें पत्र देऊन निरोप सांगतांच ते चांगदेवाचे शिष्य त्यास नमस्कार करून जे निघाले ते तप्तीपयोष्णी-संगमावर चांगदेवासन्निध येऊन त्यास नमस्कार करून उभे राहिले. नंतर ज्ञानराजानें जें पत्र दिलें होतें, तें त्यांनीं चांगदेवाच्या समोर ठेविलें आणि तोंडानें निरोप सांगितला होता, तोही त्यास निवेदन केला. नंतर त्या चांगदेवानें "त्यांची स्थिति कशी आहे? उपासना कोणाची करितात? अंतर कसें आहे?" इत्यादि विचारलें; तेव्हां ते शिष्य त्यास म्हणाले:—"महाराज, त्यांची स्थिति पाहतां आर्षपणाची आहे असें दिसतें; पण त्यांत दांभिकपणाचा लेशही नाहीं. चारी मुलें जरी लहान आहेत, तरी त्या सर्वांचे विचार एकसारखे

आहेत. निवृत्तिनाथ सात वर्षांचे, सहा वर्षांचे ज्ञानराज, पांच वर्षांचा विदेही सोपान देव आणि मुक्ताबाई चारच वर्षांची आहे. त्यांचे अंगीं अगाध सामर्थ्य जरी आहे, तरी त्यांस त्याचा अभिमान मुळींच नाहीं. परब्रह्मीच्या कोंभाप्रमाणें त्यांची स्थिति दृष्टीस पडते. श्रीपांडुरंग–मूर्तीची उपासना भक्तिभावानें करीत असतात. आम्हांस पाहतांच आम्ही आपणाकडून कोरें पत्र घेऊन आलों आहों असें त्यांनीं जाणलें. नंतर आपलें पत्र त्यांस देतांच त्यांनीं त्याचें हें उत्तर लिहून दिलें आणि मोठ्या सद्भावानें आपणांस नमस्कार सांगितला आहे. पत्रार्थ जाणून देहाचें सार्थक करून घ्यावें असें शेवटीं सांगून त्यांनीं आम्हांस आनंदानें निरोप दिला."

याप्रमाणें त्या शिष्यांचें भाषण ऐकून व ज्ञानराजानें जें पत्र दिलें होते, तें मस्तकीं वंदन करून चांगदेवानें त्या लिखित पासष्टीची पहिली ओंवी वाचून पाहिली, तों तींत नाना प्रकारचे अर्थ भरलेले आहेत असें त्याला वाटलें व मति अगदीं कुंठित होऊन राहिली. त्यानें अर्थ–शोधनास्तव पुष्कळ खटपट केली, पण खरा भावार्थ मुळींच ध्यानांत येईना, तेव्हां मात्र त्याच्या चित्तास लाज वाटली आणि कांहीं वर्म कळत नाहीं म्हणून मति कुंठित झाली. ज्ञानदेवाची प्राकृत वचनें, पण त्यांत वेदांतज्ञान पूर्ण भर-लेलें. तेव्हां "स्वतः जाऊन त्यांची भेट घेतल्याशिवाय याचें प्रमेय कळणार नाहीं," असा त्यानें निश्चय केला आणि आपल्या सर्व शिष्यांस जवळ बोलावून तो आपला मनोदय त्यांस कथन केला.

नंतर मोहन, स्तंभन, वशीकरण, इत्यादिक विद्यांचें स्मरण करून चौदाशें शिष्यांसह चांगदेव व्याघ्रारूढ होऊन व हातांत महासर्पाचे चाबूक घेऊन ज्ञानेश्वराच्या भेटीस निघाले. तो अद्भुत प्रकार पाहतांच गांवोगांवचे लोक आश्चर्य करूं लागले. सभोंवते सर्व सांप्रदायिक शिष्य व्याघ्रारूढ होऊन चालले आहेत. सेनापति जसा सैन्याच्या मध्यभागीं असावा, तसा चांग-देव त्या सर्वांच्या मध्यभागीं महाव्याघ्रावर बसून चालला आहे. असा

तो विचित्र समुदायानें मार्गानें ज्या ज्या गांवीं आला, त्या त्या गांवचे लोक पूजा उपचार समर्पण करून त्यांस संतोषित करूं लागले. चांगदेवास सर्व सिद्धि अनुकूल असल्याकारणानें त्याचें दर्शन घेणारांच्या मनकामना सहज पूर्ण होत असत व त्याची कीर्ति सहजच वृद्धिंगत होत असे. असो. अशा प्रकारेंकरून तो योगेश्वर दक्षिण पंथानें चालला असतां अलकापूर सन्निध आलें. भीमातीरीं पिंपळगांव आहे, तेथून आळंदी एक योजन—चार कोस, त्या पिंपळगांवांतील रहिवासी लोक सभाग्य व सधन आणि पुराणप्रसिद्ध ती भीमरथी महानदी, असें जाणून त्या ठिकाणीं चांगदेव चार घटिका थांबले व सर्वांनीं आपापलीं नित्य कर्मे करून घेतलीं. नंतर एका शिष्यास जवळ बोलावून चांगदेवानें त्याला सांगितलें:—"आतां तूं सर्वांच्या पुढें जा आणि ते निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांची भेट घेऊन आम्ही दर्शनास येत आहों असें त्यांस निवेदन कर." असें ऐकतांच चांगदेवास वंदन करून तो व्याघ्रारूढ शिष्य अति त्वरा करून आळंदीस आला.

इकडे निवृत्तिनाथ आदिकरून चार भावंडें आपल्या आश्रमाजवळ असलेल्या एक्या पडक्या भिंतीवर बसलीं होतीं. त्या शिष्यास पाहतांच निवृत्तिनाथ ज्ञानराजास म्हणाले:—"तुम्हीं चांगदेवास पत्र पाठविलें; पण त्याचा अर्थ त्यास कळला नाहीं, म्हणून तुमची भेट घेण्यासाठीं तो येत आहे. आपली सिद्धाई दाखवावी म्हणून चौदाशें शिष्यांसह तो व्याघ्रावर बसून व हातांत सर्पांचे चाबूक घेऊन येत आहे." याप्रमाणें परस्पर खुणेच्या गोष्टी सांगताहेत, तों चांगदेवाचा शिष्य तो ब्राह्मण त्यांच्या जवळ आला आणि व्याघ्रावरून उतरून त्यानें त्या चौघांस साष्टांग नमस्कार घातला. नंतर चांगदेवाचा निरोप त्यांना सांगणार तों सोपानदेव म्हणाले:—"चौदाशें वर्षें काळास फसवून जगलेला सिद्ध चांगदेव, जो प्रत्यक्ष मरुद्गणाचा अवतार तो आमच्या भेटीसाठीं अगदीं जवळ आला आहे व तें वर्तमान आम्हांस

कळवावें ह्मणून त्यानें आपल्या या सांप्रदायिकास मुद्दाम पुढें पाठविलें आहे." असें ऐकतांच निवृत्तिनाथ ज्ञानराजास म्हणाले:–ज्ञानेश्वरा, आपल्या घरास आज संत येत आहेत, तर आपणही त्यांचें दर्शन घेण्यासाठीं त्यांना सामोरें जावें असें वाटतें." असें ऐकतांच ज्ञानेश्वरानें अघटित माया दाखविण्याचा विचार मनांत आणून मुक्ताबाईसह ते ज्या पडक्या भिंतीवर बसले होते, त्या भिंतीस उद्देशून म्हणाले:–"बाई, चांगदेव महासिद्ध पुरुष व्याघ्रावर बसून येत आहे. यासाठीं तूं त्याला सामोरी चल." असें ऐकतांच ज्याप्रमाणें एखादा चपळ अश्व धावूं लागतो, त्याप्रमाणें ती भिंत अति वेगानें चालूं लागली. निर्जीव दगडमातीची ती भिंत ज्ञानेश्वरानें आज्ञा करितांच वेगानें चालूं लागली. तो प्रकार पाहतांच क्षेत्रवासी नरनारी आश्चर्य करूं लागल्या. कित्येक लोक त्या भिंतीच्या पाठीमागून धांवत निघाले तों चांगदेवही चौदाशें शिष्यांसह व्याघ्रारूढ होऊन वायुवेगानें येत होते. ज्याप्रमाणें भक्तोत्तम गरुड व मारुति एकमेकांस भेटावे किंवा चंद्र व सूर्य यांची भेट व्हावी, अथवा शिवविष्णु आनंदानें एकमेकांस भेटण्यासाठीं यावे, त्याप्रमाणेंच ते चांगदेव आणि ज्ञानराजप्रभृति बालभक्त एकत्र होण्याचा प्रसंग अगदीं जवळ आला.

भक्ति, ज्ञान आणि वैराग्यसंपन्न केवळ परब्रह्मपुतळा असा तो ज्ञानराज निर्जीव आणि अचेतन भिंतीस चेतना देऊन तिच्यावर बसून आपणास सामोरा येत आहे, असें जेव्हां चांगदेवानें प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां त्याच्या मनांतील सर्व अभिमान नाहींसा झाला. त्यास वाटलें कीं, "जरी आम्ही व्याघ्रावर बसून हातांत सर्पांचे चाबूक घेऊन येत आहों, तरी हे सचेतन आहेत. चालण्याचा धर्म यांचें अंगीं प्रत्यक्ष आहे. पण ज्ञानराजादिक भावंडें हीं अचेतन व निर्जीव भिंतीवर बसलेलीं असतां तिला चेतना देऊन आमचें स्वागत करण्यासाठीं येत आहेत. तर आमच्याहून यांचें सामर्थ्य व प्रभाव अधिक आहे यांत कांहीं संशय नाहीं." याप्रमाणें सत्य प्रकार

मनांत आणून चांगदेवानें आपल्या मनांतील सर्व अभिमान दूर केला व हातांतील सर्परूपी चाबूक सोडून त्यानें व्याघ्रावरून भुईवर उडी टाकली. तो प्रकार पाहतांच त्याच्या सर्व शिष्यांनींही आपापलीं वाहनें सोडून हातांतील सर्प टाकून दिले, तेव्हां ते सर्व आपापल्या सोईप्रमाणें मार्ग धरून निघून गेले. सिद्धाचा सर्व खेळ मायावी असतो, हें सर्व प्रसिद्ध आहे. ते सर्व व्याघ्र व सर्प एका क्षणांत नाहींसे झाले आणि निवृत्ति ज्ञानराजादिकांस लोटांगण घालीत चांगदेव निरभिमान होत्साता पुढें आला.

निवृत्तीनें तो लोटांगण घालीत येत आहे, असें जेव्हां पाहिलें, तेव्हां आपल्या भावंडांसह तो त्या चालत्या भिंतीवरून खालीं उतरला. सर्वांनीं चांगदेवाला साष्टांग नमस्कार केला. तो प्रकार पाहतांच चांगदेवानें त्यांस उठविलें व स्वतः त्यांच्या चरणावर मस्तक ठेविलें. नंतर चांगदेवास हातीं धरून तीं चारी भावंडें आपल्या विश्रांतिस्थळीं आलीं. ज्ञानदेवादिक सर्व जेथें रहात असत तेथें एक वडाचें झाड होतें, त्यास विश्रांतिवट असें सर्व म्हणत असत. त्या विश्रांतिवटाखालीं बसून सर्वांनीं प्रथम अत्यानंद करून क्षणभर श्रीविठ्ठलनामसंकीर्तन केलें.

ज्ञानदेव, निवृत्ति, सोपान व मुक्ताबाई यांस जरी पूर्ण आत्मज्ञान होतें, तरी सगुण भक्ति करण्याची आवड त्यांस फार असे. कित्येक योगी वज्रासनीं बसून आत्मा ब्रह्मांडीं नेतात व देहभान न ठेवितां निर्गुण व निराकारास पाहून तदाकार होत्साते सायुज्य मुक्तिप्रत पावतात. ते विराटस्वरूपीं लीन होतात खरे, पण जें सत्य सुख, त्यास अंतरतात व शेवटपर्यंत क्लेशानुभव मात्र घेतात. निवृत्ति आदिकरून तशा प्रकारचे नव्हते. विश्वोद्धार करावा म्हणूनच त्या चौघांनीं या पृथ्वीवर अवतार घेतले होते. ते अंतरीं जरी पूर्ण ब्रह्मनिष्ठ होते, तरी सगुणोपासनेमुळें त्यांस भगवंताचा साक्षात्कार झालेला होता. सगुण परमात्मा त्यांस भेटत असे. अंतरीं अद्वैत ओळखून साकार मूर्तीवर प्रेम ठेवणारे भक्त जगांत विरळा. असो.

निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई या चौघांनीं चांगदेवासह बसून आनंदानें क्षणभर भगवद्भजन केलें. नंतर चांगदेव त्यांस विचारूं लागला कीं, "महाराज, आपण निर्जीव आणि अचेतन भिंतीस चेतना देऊन ती कशी चालविली? हें कृपा करून मला सांगावें. आम्हीं आपल्या सिद्धिबळानें व्याघ्रावर बसून सर्पाचे चाबुक जरी हातांत घेतले होते, तरी त्यांत विशेष महत्व होतें असें मला वाटत नाहीं. व्याघ्र जात्या चालणारे, त्यांस लीन करून आम्हीं आपलीं वाहनें केलीं; तरी त्यांत कांहीं अधिकोत्तर मानावयासारखें नाहीं. आपण अचेतनास चेतनायुक्त करून चालविलें हें मात्र आश्चर्य खरें." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच ज्ञानराजानें त्याला सांगितलें:-"अहो, भगवंतास कोणतें अशक्य आहे? त्यानें पाण्यावर पाषाण तारले व त्यावरून वानरसेना लंकाद्वीपास नेऊन सीतेसह सर्व देवतांचें बंधविमोचन केलें. त्या श्रीहरीला सर्व कांहीं शक्य आहे असें समजावें. जो श्रीपति हें चराचर जग नटला आहे, त्याचीच प्रकृति हें सर्व पदार्थ, त्यानें आपल्या पराक्रमें करून केवळ कौतुक-दर्शनास्तव निर्जीव भिंत चालविली, तरी त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं आहे असें नाहीं. पंचमहाभूतें परस्पर वैरी असतां, तो परमात्मा आपल्या सत्तेनें त्यांस एकत्र वर्तवितो. तर त्यानेंच तुमची इच्छा पूर्ण करण्यासाठीं अचेतन भिंतीस चेतना देऊन तिला चालविलें असें मानावें म्हणजे झालें. त्यांत आमचें सामर्थ्य अगदीं नाहीं, हें त्या भगवान् कमलापतीस ठाऊक आहे." याप्रमाणें ज्ञानराजाचें भाषण ऐकतांच चांगदेवानें "धन्यधन्य" असा उद्गार काढून अत्यानंदानें त्यांचे पाय धरिले.

नंतर निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांनीं आपसांत खूण करून विचार ठरविला कीं, "आतां या चांगदेवास आत्मज्ञानोपदेश देऊन कृतार्थ करावें. चौदाशें वर्षेंपर्यंत जें पत्र कोरें राहिलें आहे त्यावर आतां अक्षरें लिहावीं." याप्रमाणें आपसांत निश्चय केल्यावर त्यांनीं त्यास उपदेश

करण्याचा उपक्रम केला. त्यांत त्यांचा जो संवाद झाला, तो अभंग रूपानें झाला. ते प्रत्यक्ष त्यांच्या तोंडचे अभंग वाचकांसाठीं येथें लिहितों :–प्रथम चांगदेवाचा अभंग आहे तो :—

## अभंग.

विश्रांति तळवटीं चांगदेवा भेटी ।
परस्परें कसवटी अनुभवाची ॥ १ ॥
निवृत्ति ज्ञानेश्वर ह्मणती तुह्मी थोर ।
सर्वज्ञ उदार आह्मांलागीं ॥ २ ॥
भेदून षट्चक्रें साधीलें योगासी ।
रिद्धिसिद्धि दासी स्वयें केल्या ॥ ३ ॥
ऐकोनि उत्तर जोडी दोन्ही कर ।
केला नमस्कार दीर्घ दंडें ॥ ४ ॥
संतांच्या दर्शनें शुद्ध झालें मन ।
गेला अभिमान विरोनियां ॥ ५ ॥
काळवंचनेनें वांचविलें शरीर ।
पहावें योगीश्वर तुह्मां ऐसे ॥ ६ ॥
वटेश्वर चांगा करीत विनंति ।
तोडा माझी गुंती संसाराची ॥ ७ ॥

याप्रमाणें चांगदेवानें शुद्ध चित्तें करून उपदेश करण्याबद्दल विनंति करितांच, निवृत्तीने ज्ञानराजास खूण करून मुक्ताबाईनें त्यास उपदेश करावा असें

सुचविलें. तेव्हां मुक्ताबाईनें चांगदेवास अनुलक्षून उपदेशार्थ असा एक अभंग म्हटला, तो:—

## अभंग.

हें मी हें मी प्रचीत पाहीं ।
अनुभव आलीया भेदची नाहीं ॥ १ ॥
सोहंकार मन न संडीच साच ।
मीपण नाहीं तेथें तूंपण केंचें ॥ २ ॥
अहं तें मी सोहं तें गुज ।
मुक्ताबाई ह्मणे चांगया बूझ ॥ ३ ॥

याप्रमाणें अभंग म्हटल्यावर मुक्ताबाईनें चांगदेवाला स्पष्ट सांगितलें कीं, "मनाची भ्रांति नाहींशी करून प्रथम मी कोण आहें? हें ओळखावें. त्रिगुणात्मक ब्रह्मज्ञान वैराग्यबलानें पूर्ण ओळखून चराचर जग आत्मस्वरूप मानावें आणि आत्मानंदांत डोलत असावें. अहंभाव सोडून सोहं शब्दाचें जें गुज आहे, तें यथार्थपणें जाणावें आणि त्याची खूण अंतरीं समजून रहावें म्हणजे सर्वत्र सुखच आहे." याप्रमाणें मुक्ताबाईचें भाषण ऐकतांच चांगदेवानें लोटांगण घातलें आणि म्हणाला:—"चौदाशें वर्षेपर्यंत जें भूमिगत धन होतें, तें आज मला सांपडलें. लोकांत दंभधर्म दाखविण्यासाठीं सर्पाचा चाबूक हातांत घेऊन व्याघ्रावर बसलों व तुमच्या भेटीस आलों; पण तो सर्व दांभिक आसुरी संपत्तीचा प्रकार होय. आजपर्यंत व्यर्थ रिद्धिसिद्धि वश करून घेऊन मी आपणास थोर मानीत होतों, पण तें सर्व व्यर्थ होय. तुमच्या दर्शनें करून आज कृतार्थ झालों. तुम्ही चौघे प्रत्यक्ष महेशासमान आहां, तर माझा सर्व मनःसंताप दूर करा, इतकीच माझी प्रार्थना आहे." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकल्यावर ज्ञानराज त्यास म्हणाले:—"तुझाच

तुला शोध लागला, म्हणजे अखंड समाधि–सुखाचा लाभ होईल. दंभधर्म ही निरर्थक उपाधि होय, तिचा त्याग कर. तुझी व आमची भेट कर्पूर–अग्नीप्रमाणें झालेली आहे. एका क्षणांत दोन्हीही दृष्टीस पडणार नाहींत. सिद्धीचा अभिमान मनांत धरून व्यर्थ नाडला होतास व भ्रम लोभेंकरून लौकिकास भुळला होतास; पण तें सर्व व्यर्थ. आतां सत्यज्ञानाचा लाभ झाला म्हणजे अंतरीं सुखोत्पत्ति होईल आणि व्यर्थ ज्या येरझारा (येण्याजाण्याच्या खेपा) त्याही चुकतील. हें राजयोग–साधन फार कठीण आहे. हें प्राप्त करून घेत असतां रिद्धिसिद्धि महा विघ्न करीत असतात, त्यामुळें आत्मसुख नाशवंत व अशाश्वत आहे असा भास होतो, पण तो भासच. मनासह इंद्रियें आवरून धरलीं म्हणजे ब्रह्मज्ञान–लाभ सहज होणार यांत संशय नाहीं. जेथें जेथें मन धांवून जाईल, तेथें तेथें तूं आपल्यालाच पहा, म्हणजे निर्गुण आत्मपदप्राप्ति सहज होईल. रजोगुण व तमोगुण समूळ नाहींसे करून शुद्धसत्व गुणानें युक्त हो व निश्चळपणानें आत्मपद पहा. त्वां काळ–वंचना करून आजपर्यंत शरीर रक्षण केलेंस, पण आत्मज्ञानाचा लाभ तुला झाला नाहीं आणि अहंता मात्र व्यर्थ वाढली हें उघड दिसत आहे. तरी योगी जे आहेत त्यांची खूण निराळीच आहे. तमोगुणाचा जेव्हां पूर्णपणें नाश होईल, तेव्हांच आम्ही तुम्हांला संत म्हणूं. जगांत शब्दज्ञानावडंबर माजविणारे अनेक आहेत; परंतु परब्रह्म जें ह्मणावयाचें तें वेगळेंच, तें कोणासही कोणाजवळ बोलून दाखवितां येत नाहीं. चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें जरी मुखोद्गत झालीं तरी ती खूण वेगळीच आहे. बरें, निराळी म्हणावी तर त्यांतच आहे. म्हणून आपण आपणास समजावें आणि निर्वाण आत्मपद प्राप्त करून घ्यावें."

याप्रकारेंकरून त्यांचा संवाद वटवृक्षाखालीं होत आहे तों माध्यान्ह–कालसमय प्राप्त झाला; तेव्हां ज्ञानराज निवृत्तिनाथास म्हणाले:–"आतां यांस आश्रमांत घेऊन चलावें असें वाटतें." असें ऐकतांच ते मंडळीसह आश्रमांत आले. तृणासनें मांडून त्यांनीं चांगदेवास त्यावर बसविलें. नंतर ज्ञानरा-

ज्ञानें मुक्ताबाईस पाकसिद्ध करावा असें सांगितलें. तें ऐकतांच अवश्य म्हणून ती मृत्तिकापात्र हातीं घेऊन परसांत गेली. तों लघुशंका करावी अशा उद्देशानें चांगदेवही त्या ठिकाणीं आला. पण त्यानें जेव्हां मुक्ताबाई नग्न आहे असें पाहिलें, तेव्हां आपले डोळे झांकून घेतले व मागें फिरण्याच्या विचारास लागला. तों त्याचें मानस ओळखून मुक्ताबाई त्यास म्हणाली:— "मेल्या निगुऱ्या, मनांत कसला संशय धरून परत चालला आहेस? इतका उपदेश केला तरी आत्मज्ञानाचें प्रमेय तुला कळलें नाहीं? तुझ्या मनांत विषय वासना जागृत आहे म्हणून स्त्रीपुरुष हा भेद राहिला आहे. पण जो आत्मा तुझ्या देहांत तोच माझ्याही देहांत आहे. असें असतां विकार कसला मानतोस? देहरूपी कवच जें हें वर दिसत आहे, हें सोडून आत्मस्वरूप एकच आहे असें पहा. नाना प्रकारचे अलंकार जरी भिन्न भिन्न केले तरी सुवर्ण एकच, त्यांत कांहीं भेदभाव नाहीं. त्याप्रमाणें देहोपाधीस्तव जरी स्त्रीपुरुष हा भिन्नभाव दिसला, तरी आत्मस्वरूपांत कांहीं भेद नाहीं. त्रिजगांत आपलीच व्यापकता आहे, अशी वृत्ति बाणली म्हणजे तीच परिपूर्णता होय. अरे, पहा कुत्री, मांजरी, गाय ह्या काय वस्त्रें नेसत असतात? त्या पशूंप्रमाणेंच मी आहें असें कां तुला वाटलें नाहीं?" याप्रमाणें मुक्ताबाईचें भाषण ऐकतांच "यांचें ज्ञान अगाध आहे," असें मनांत आणून चांगदेवानें तिचे पाय धरले. नंतर स्वस्थपणें मठांत येऊन व्याघ्रासनावर बसून राहिला.

इतका प्रकार झाल्यानंतर चांगदेवाचा एक शिष्य त्या ठिकाणीं आला व त्यास नमस्कार करून म्हणाला:—"स्वामि, क्षुधा फार लागली आहे, तर काय उपाय करावा हें कृपा करून सांगावें." असें ऐकतांच चांगदेवानें त्याजकडून थोडेसे जोंधळे आणविले व ते एका वस्त्रांत बांधून आपल्या हातानें त्याच्या मस्तकावर ठेवले. तों भट्टींत घातल्याप्रमाणें तडातड लाह्या फुटल्या. तो प्रकार पाहतांच निवृत्ति आणि सोपान यांस ज्ञानेश्वर म्हणतात:—"अजून सिद्धीचा तोरा याच्या अंगीं आहे. अजूनही अंतरीं पूर्ण विरक्ति उत्पन्न

झाली नाहीं." तें ऐकतांच निवृत्तिनाथ म्हणाले:—"नुक्ताच सत्संग झाला आहे, तर सर्व कांहीं क्रमानें होईल. पंचाग्नि चेतविण्याची हातोटी आमच्याजवळ नाहीं, असें त्यास कदाचित् वाटलें असेल, तर कांहीं चमत्कार करून दाखवावा म्हणजे अभिमान नाहींसा होईल." याप्रमाणें आपसांत बोलल्यावर ज्ञानराजानें मुक्ताबाईला हाक मारून सांगितलें:—"बाई, आज हे चांगदेव महासिद्धपुरुष आपल्याकडे आले आहेत. यांचा पाहुणचार कांहीं तरी केला पाहिजे." असें ऐकतांच मुक्ताबाईनें सांगितलें कीं, "ठीक आहे. मला एक खापर आणून द्यावें म्हणजे पाहुण्यांच्या मेजवानीची व्यवस्था लावितां येईल," असें ऐकतांच "हें काम सोपानदेव करील," असें ज्ञानराजानें सांगितलें.

नंतर सर्व साहित्य आणून मांडे तयार करण्याची व्यवस्था लाविली. पण चुलींत विस्तव नाहीं, धूर निघेना. बाहेर पाहुणे बसले होते त्यांस तर भूक अतिशय लागली. तों ज्ञानदेवानें सर्वांस स्नानें करा म्हणून सांगितलें. पण चुलींत विस्तव नाहीं असें पाहून चांगदेवास आश्चर्य वाटलें. सर्व मंडळी स्नानें करून आली व पात्रांवर बसली, तों सोपानदेवानें जठराग्नि प्रज्वलित केला आहे; त्याच्या मुखांतून ज्वाला चालल्या आहेत. पाठ लाल झाली आहे व त्या पाठीवर मुक्ताबाई आनंदानें मांडे भाजीत बसली आहे असें चांगदेवाच्या दृष्टीस पडलें. तेव्हां मात्र त्याच्या चित्तांतील अहंकार अगदीं नाहींसा झाला. हे केवळ परब्रह्मांचे पुतळे आहेत असें त्याला वाटलें. नंतर स्वात्मबोधरूप ताटांत नवरस युक्त पक्वानें वाढलीं व त्यांवर भूतकृपेची शर्करा पेरली. गुरुकृपारूप आज्य (तूप) मुक्ताबाईनें आपल्या हातानें वाढतांच नामघोषपूर्वक संकल्प सुटतांच सर्व मंडळी भोजनास बसली. ज्याला ज्याला जें जें आवडत होतें, तें तेंच त्याच्या पात्रावर वाढण्याची व्यवस्था लागलेली असल्याकारणानें सर्वांनीं आनंदांत भोजन केलें. कर-शुद्धि झाल्यावर मुखशुद्धीसाठीं सोपानानें सर्वांस तुळशीपत्रें आणून दिलीं. सर्व आनंदयुक्त होऊन बसल्यावर ज्ञानराज म्हणाले:—"आजचा मोठा

सुदिन, म्हणून आज संतसंगति आह्मांला लाभली असें वाटतें. या दिव-साची धन्यता वर्णन करावी तितकी थोडीच होणार आहे." याप्रमाणें, बोलत आहेत तों मुक्ताबाईही प्रसाद घेऊन बाहेर आली, आणि प्रेमानें निवृत्तीस नमन करून आपल्या जागीं बसली.

नंतर चांगदेवानें मुक्ताबाईच्या जवळ येऊन तिला नमस्कार केला आणि हात जोडून व त्या चौघांसमोर उभा राहून त्यांस मोठ्या विनयानें म्हणाला:– "महाराज, आपण पाठविलेल्या पत्रिकेचा अर्थ मला कळला नाहीं, तर तो कृपा करून मला सांगावा. सर्व साधनांत सत्समागम श्रेष्ठ असें जें ह्मणतात, त्याचा आज मला प्रत्यय आला. तर कृपा करून माझा तेवढा हेतु पूर्ण करावा." असें ऐकतांच ज्ञानेश्वरानें त्याला सांगितलें:–"त्या पत्रिकेवर बळी देण्याकरितां तुम्हीं एक शिष्य तयार करावा, ह्मणजे त्या पत्रिकेचा भावार्थ तुह्मांला सहज कळून येईल." याप्रमाणें ज्ञानराजाचें भाषण ऐकतांच चांगदेवानें त्यांस सांगितलें:–"ठीक आहे. आमच्या बरोबर चौदाशें शिष्य आहेत त्यांतून एकास बळी देतां येईल. रात्रीं कोण द्यावयाचा याबद्दल विचार करून आप-णास कळवितों." याप्रमाणें चांगदेवाचें व ज्ञानेश्वराचें भाषण ऐकतांच ते सर्व शिष्य चिंतातुर झाले आणि "आतां स्वामि कोणाच्या जिवावर उदार होतात हें कांहीं कळत नाहीं," असें आपसांत कुजबुजूं लागले. देहाच्या अनिवार लोभामुळें कोणा एकासही चैन पडेनासें झालें. त्यांस एकेक घटका वर्षा-एवढी भासूं लागली. कित्येक आपसांत जमून ह्मणूं लागले कीं, "आजपर्यंत आनंदानें नाना प्रकारचे उपभोग घेतले व पंक्तीस बसून नित्य सुग्रास भोजन केलें, त्याचें उट्टें निघण्याची वेळ आली आहे यांत अगदीं संशय नाहीं." कोणी ह्मणूं लागले:–"स्वामींच्या कृपेनें आजपर्यंत संपत्ति व संतति लाभल्या खऱ्या; पण त्या सर्वांचें प्रायश्चित्त आज भोगावें लागणार." कोणी "स्वामींनीं हा वेष धरून, साबरीमंत्र–साधनानें सर्वांस मोहिनी घातली आणि अनेक चमत्कार करून दाखविले, त्या सर्वांचें फळ भोगण्याची पाळी

आज कोणावर तरी येणार खास," असेंही ह्मणूं लागले. याप्रकारेंकरून ते चौदाशें शिष्य आपापल्या बुद्धिवैभवानुरूप निरनिराळे विचार मनांत आणून अतिशय चिंता करीत बसले.

सायंकाळ झाला. सूर्यास्त होण्याची वेळ येतांच चांगदेवानें संध्यावंदनादि नित्यकर्म केलें. ज्ञानराज व सोपानदेव नित्यनेमाप्रमाणें भगवद्भजन व हरि-कीर्तन करूं लागले असतां चांगदेव आणि निवृत्तिनाथ सप्रेमचित्त होऊन तें ऐकत बसले. नामाप्रमाणें या कलियुगांत दुसरें साधन नाहीं; असें भागवतांत प्रत्यक्ष व्यास-वचन आहे. कर्मारंभीं केशव नारायणादिक नामो-च्चार करण्याचा व अंतीं विष्णुस्मरणपूर्वक सर्व कर्म ब्रह्मार्पण करण्याची वहिवाट त्यावरूनच पडली आहे, हें सर्वांस विदित आहे. अंतीं विष्णुस्म-रण केलें म्हणजे कर्मांत कांहीं न्यूनता झाली असली तरी त्याची पूर्तता होते. पातकी अजामीळ, गणिका इत्यादिकांचा उद्धार केवळ नामस्मरणानें झाला. बहुत कष्टप्रद असा जो योगमार्ग तो लक्षांतून एकादा विरळा साध्य करील. परंतु भोळ्या भाविकांस पावन करणारें भगवंताचें नांवच होय. जो सर्वदा नामस्मरणीं रत असतो त्यास चारी मुक्ति सहज साध्य होतात, असा नाम-महिमा अगाध आहे. याप्रकारेंकरून ज्ञानराजानें सगुणोपासना स्थापन करून कीर्तन पूर्ण केलें व कापूर लावून भगवंतास ओंवाळिलें, खिरापती वाटल्या आणि निवृत्तिनाथास नमन करून ज्ञानराज तृणासनावर येऊन बसले. तों रात्र झाली. सर्वांनीं तृणशय्या तयार करून निद्रा करण्याचें मनांत आणलें असतां चांगदेवानेंही जाऊन एकांतीं तृणशय्येवर शयन केलें. तेव्हां त्याचे शिष्य जवळ येऊन त्याची सेवा करूं लागले. तेव्हां तो योगी एकांत पाहून त्यांस म्हणाला:—"ज्ञानराजानें आम्हांस जें पत्र लिहिलें, त्याचा अर्थ फारच खोल व गहन आहे. तो समजून घ्यावयाचा तर एका पुरुषास बळी देणें भाग आहे. तर तुम्हीं सर्वांनीं मिळून विचार करावा आणि एकानें आपल्या जिवावर उदार होऊन आमची इच्छा परिपूर्ण

करावी." असें ऐकतांच ते शिष्य त्यास म्हणाले:–" महाराज, हीं शरीरें आम्ही आपणांस अर्पण केलेलीं आहेत; तर आपणच आपल्या मनास वाटेल तसा विचार करावा." याप्रमाणें जरी त्या शिष्यांनीं सांगितलें, तरी तें सगळें वरवरच होतें. खरेंच आहे. देहाचा लोभ धरून जे वरकांति वैराग्य दाखवितात त्यांस इहपरत्र गति नाहीं. पण हें कळेल त्याला. चांगदेवाबरोबरचे सर्व शिष्य कांहींना कांहीं मनकामना धरून त्याची सेवा करीत राहिलेले, त्यांनीं जीवाशा किंवा देहाशा सोडून उदार कसें व्हावें? असो.

चांगदेवास निद्रा लागेपर्यंत ते त्याची सेवा करीत होते. तो जेव्हां चांगला घोरूं लागला असें त्यांनीं पाहिलें, तेव्हां आपसांत विचार करून उद्यां कोणावर पाळी येते नकळे, असें मनांत आणून एकेकानें आपली वाट धरली. सूर्योदय होई तोंपर्यंत चौदाशें शिष्यांतून एकही कांहीं चांगदेवाची सेवा करण्यास राहिला नाहीं. ज्ञानेश्वरानें ही युक्ति योजून चांगदेवाच्या मागें शिष्यसांप्रदायिकांचा जो पाश होता तो अशा प्रकारानें तोडून टाकला. गृहस्थाश्रमाहून मठाश्रम फार कठीण आहे, त्याचा त्याग कोणाच्यानेंही करवत नाहीं. एक तो श्रीहरि कृपा करील, तरच महंती दूर होईल व साधु पाशमुक्त होऊन राहील.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं चांगदेव जागृत होऊन शिष्यांस हांका मारूं लागला; पण जर एकही जाग्यावर राहिला नाहीं, तर त्याला हांक कोणी द्यावी? शेवटीं तो स्वतः उठला व पाणी घेऊन हस्तपादमुखप्रक्षालन करून आचमन करून बसला. नंतर आनंदानें प्रातःस्मरण करीत आहे तों ज्ञानराज त्याच्याजवळ आले. तेव्हां परस्परांनीं परस्परांस नमस्कार केले. नंतर ज्ञानराज मुद्दामच त्यास म्हणाले:–" आजचा दिवस चांगला आहे, बलिदानाकरितां कोणत्या शिष्याची योजना केली आहे हें आम्हांला सांगा." असें ऐकतांच चांगदेव पुनः आपल्या शिष्यांस हांका मारूं लागला. पण कोणीच ओ म्हणेना व समोर येऊन उभा राहीना. असा प्रकार जेव्हां त्यानें पाहिला, तेव्हां

देहलोभ धरून सर्व शिष्य आपल्याला सोडून पळून गेले, असें त्याच्या ध्यानांत आलें व तो खिन्न होत्साता स्तब्ध बसला. नंतर तो ज्ञानराजास उघडपणें म्हणाला:-"महाराज, आजपर्यंत सिद्धपणाचा डौल व दंभ माजवून मीं व्यर्थ श्रम मात्र केले, हें आतां माझ्या प्रत्ययास आलें. जिवावर गोष्ट येतांच सर्व मला सोडून न विचारतां चालते झाले. बहुत सांप्रदायिक जमवून प्रसंगीं जर कोणी नाहीं, तर तो प्रकार नाशवंत हें सिद्ध झालें. विद्या, कला, कुशलता व अष्टांगयोगसाधन करूनही व्यर्थ श्रम, जिवाला विसावा नाहीं. आतां आपणांस शरण आलों आहें. सर्व शिष्य तर पळून गेलेच; तर आतां हा माझाच देह बळी देऊन आपल्या पत्रिकेचा अर्थ माझ्या कानांत सांगावा आणि मला कृतार्थ करावें अशी प्रार्थना आहे. तनु, मन व धनेंकरून मी आपणांस शरण आलों आहे, तर माझा अव्हेर करूं नये." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच त्या ज्ञानराजास अत्यानंद झाला. त्यानें तें वर्तमान निवृत्तिनाथास जेव्हां सांगितलें, तेव्हां तो म्हणाला:-"हा सर्व खेळ तुझाच. त्यांच्या समक्ष मनुष्याचा बळी मागून चांगदेवाच्या मागें जे पाश लागलेले होते, ते सहज तोडून टाकलेस." तें वर्तमान जेव्हां मुक्ताबाईनें ऐकिलें, तेव्हां तिला तर फारच आश्चर्य वाटलें आणि हंसूही आलें. नंतर निवृत्ति, ज्ञानराज व सोपान यांनीं मुक्ताबाईला सांगितलें कीं, "आतां चांगदेवावर कृपा करून त्याला उपदेश करावा."

याप्रमाणें बंधूंनीं आज्ञा करितांच, मुक्ताबाईनें चांगदेवास स्नान करून आपलीं नित्य कर्मे करावयास सांगितलीं. तीं आटपल्यावर तिनें त्याला आपल्यासमोर बसविलें आणि उपदेशपूर्ण असा एक अभंग म्हटला, तो:-

## अभंग.

**मी कोण हें ओळखावें । आपण आपणां पहावें ॥**
**स्वरूपीं समरसावें । रात्रंदिवस ॥ १ ॥**

[library stamp]

[stamp]

त्रिगुणा वरुतें । ज्ञान पैं निश्चितें ॥
तया पैं निरुतें । घेई बापा ॥ २ ॥
मुक्ताबाई ह्मणे । होई तूं सावध ॥
सांगितला बोध । पुढील तो ॥ ३ ॥

याप्रकारें बोध करून अनुग्रहार्थ मस्तकावर हात ठेवितांच, चांगदेवाच्या मनांत पूर्ण बोध ठसला आणि तो मुक्ताबाईच्या चरणीं लागला. त्याच्या दृष्टीस हें सर्व चराचर जग विश्वंभररूप भासूं लागलें. द्वैतवृत्ति व बुद्धि अगदीं नष्ट झाली आणि जो कांहीं मनाला संशय होता, त्याचीही निवृत्ति झाली. त्याचा सर्व अभिमान दूर झाला आणि त्यास देहाचीही शुद्धि न राहिल्यामुळें त्याचाही विसर पडला. सद्गुरूनें कृपा केल्यावांचून आत्मज्ञान-प्राप्ति होत नाहीं, असें जें ह्मणतात, त्याचा चांगदेवास पूर्ण अनुभव आला. ज्ञानदेवाच्या संगतीस राहून नित्य रात्रीं कीर्तन–श्रवण, त्याचेंच दिवसा मनन आणि अहोरात्र त्याचाच निजध्यास अशा प्रकारानें एक महिना लोटला. नंतर ज्ञानराजानें त्यास विचारलें :–"आमच्या संगतीस राहून तुम्हीं एक मास काढला. अजून पत्राचा अर्थ ध्यानांत आला कीं नाहीं ? हें आह्माला सांगावें." ज्ञानदेवानें याप्रमाणें विचारतांच चांगावटेश्वरानें त्यास नमस्कार केला आणि प्रेमयुक्त अंतःकरणानें एक अभंग म्हटला, तो :—

वळे ना वर्षें वरवर पूर आला ॥ जेथें जन बुडाला आईयानों ॥१॥
बुडाला बुडाला परी ह्मणती ॥ बुडाल्याची शुद्धि कोणी न घेती ॥२
पैल बुडाला पैल बुडाला ॥ कोरडयाच डोहीं जन बुडाला ॥३॥
ज्ञानदेव सांगडी मुक्ताबाई तारूं ॥ चांगा पैल पारू पाववीला॥४॥

याप्रमाणें अभंग म्हणून त्यानें चौघांसही नमस्कार केला आणि सांगितलें कीं, "तुमची कृपा व संगति झाल्यामुळें अंतरीं पूर्ण बोध ठसून राहिला आणि कृतार्थ झालों." असें ऐकतांच ज्ञानराजास आनंद झाला आणि तो त्यास

म्हणाला :-"तुम्हीं या भूलोकीं येऊन स्वत:चें संरक्षण करून घेतलें यांत संशय नाहीं." मुक्ताबाई म्हणाली :-"तुमचें हें चौदाशें वर्षांचें शरीर अमर झाल्यासारखेंच आहे. तरीही एक विचार सांगतें तो ऐका :-तुम्हीं आतां हा देह सोडून दुसरा जन्म घ्यावा आणि त्या जन्मांत प्रेमानें सत्वगुणप्रधान जें महाविष्णु नामक दैवत प्रसिद्ध आहे, त्याची आराधना, उपासना, सेवा आणि भक्ति करावी. श्रीपांडुरंगाची उपासना केल्यावांचून शुद्ध सात्विक गुण उत्पन्न होणार नाहीं. प्रीतीनें सगुणमूर्तीची उपासना करून 'श्रीरामकृष्णादि अवतारमूर्तींचीं चरित्रें परमादरानें गात राहिल्याशिवाय जगदोद्धार होणार नाहीं आणि निष्कामवृत्तीनें परोपकाररत झाल्यावांचून पुण्याईची जोड व उद्धार होणार नाहीं. या कलियुगांत हरिकीर्तनाहून श्रेष्ठ व श्रेयस्कर साधन दुसरें नाहीं; यासाठीं पंढरीस जाऊन तो रुक्मिणीरमण पहिल्यानें ओळखावा." याप्रमाणें मुक्ताबाईनें उपदेश करितांच चांगदेवानें "ही आज्ञा मला प्रमाण आहे, मी हिचें उल्लंघन करणार नाहीं," असें बोलून पुन: त्या चौघांस साष्टांग नमस्कार करून वेदोक्त मंत्रांनीं त्यांची पूजा केली. चंदन, तुळशीमाळा, पुष्पें, धूप, दीप, नैवेद्य इत्यादि सर्व उपचार समर्पण करून शेवटीं आरती ओंवाळून खिरापत वाटली. नंतर विठ्ठल—नामाचा गजर करून पुन: पुन: साष्टांग नमस्कार करून म्हणाला:-"धन्य धन्य हे निवृत्तिनाथ, हा प्रत्यक्ष शंकरावतार आहे. हे ज्ञानराज श्रीमहाविष्णुच प्रत्यक्ष जगदोद्धार करण्यासाठीं या भूलोकीं अवतरले आहेत. हे सोपानदेव साक्षात् ब्रह्मदेव आणि मुक्ताबाई आदिशक्ति होय. हीं आपल्या नाममात्रें करूनच या जगाचा उद्धार करण्यास समर्थ आहेत." या प्रकारें स्तुति करून चांगदेवानें पुन: नमस्कार घातला आणि वटेश्वराच्या सेवेसाठीं जाण्याची आज्ञा मागितली. पण ती मागत असतां तो सद्गदित झाला. त्याचा कंठही दाटून आला आणि नेत्रांतून प्रेमाश्रु पडूं लागले. त्यानें जाण्याची आज्ञा मागतांच ती देऊन चौघेंही भावंडें त्यास पोंचवीत निघालीं. सीमेपर्यंत आल्यावर चांगदेवानें त्यांस पुन: पुन: नम-

स्कार करून "आतां या रंकासाठीं श्रम न घेतां मागें परतावें," अशी विनंति केली. तेव्हां तीं चौघेंही त्यास प्रेमालिंगनपूर्वक नमन करून मागें परतलीं व चांगदेव चालूं लागला; तरी क्षणोक्षणीं प्रेमानें मागें पहातच असे. असो. चांगदेवाची बोळवण करून निवृत्तिनाथ, ज्ञानराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं चौघेंही मागें परतलीं, तीं आपल्या मठांत आलीं. ज्यांच्या ध्यानीं मनीं त्या जगज्जीवन रुक्मिणीरमणाचे गुण मात्र भरलेले, अशीं तीं अहोरात्र हरिकीर्तन व नामगजर करून दीन अनाथांचा सहज उद्धार करीत आळंदींत राहिल्याकारणानें जगांत तें क्षेत्र व इंद्रायणी–तीर धन्यता पावलें.

ज्ञानेश्वराची आज्ञा व निरोप घेऊन चांगदेव जो निघाला, तो कांहीं दिवसांनीं तप्तीपयोष्णी संगमावर वटेश्वरासन्निध आला आणि सप्रेमचित्तानें त्या आराध्य दैवतास नमस्कार करून, स्नानसंध्यादिक नित्यकर्मे करून त्या वटेश्वराचें पूजन केलें. मुक्ताबाईनें त्यास "दुसरा देह धरून श्रीपांडुरंगाची उपासना कर" इत्यादि सांगितलें होतें, तें वारंवार अक्षरशः स्मरत असल्याकारणानें त्यानें वटेश्वराजवळ फार दिवस न राहतां तेथून त्या महादेवाची आज्ञा घेऊन तो तोरणमाळापर्यंत आला. त्या ठिकाणीं प्रत्यक्ष विष्णूचा अवतार गोरक्षनाथ नामें कानफाड्या रहात होता, त्याचें स्थान पाहतांच मार्गश्रमाची कृतार्थता मानून तो स्थिर झाला आणि त्या गोरक्षनाथाचें दर्शन घेऊन त्यांस आदेश ( नमस्कार ) करून प्रेमानें त्याचें पूजन केलें. तेव्हां गोरक्षनाथानेंही त्याचा आदरसत्कार केला आणि तो सिद्धपुरुष भेटल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून दाखविला. आपल्या गुरूच्या परंपरेनें गोरक्षनाथ आपला गुरूच आहे, असें मानून चांगदेव त्याची स्तुति करूं लागला. तेव्हां गोरक्षनाथानें त्याला सांगितलें:–"तुमची सप्रेमभक्ति पाहून प्रत्यक्ष कैलासपति वाटींत प्रगट झाले व त्यावरून तुह्मांला चांगावटेश्वर हें अभिधान प्राप्त झालें; तर असे जे आपण, त्या आपलें वर्णन व स्तुति आम्हीं काय व किती करावी? तरी असें विचारितों कीं, कोणत्या इच्छेनें आपलें आगमन

झालें आहे तें कृपा करून मला कथन करावें." याप्रमाणें गोरक्षनाथानें त्यास विचारितांच चांगदेवानें त्याच्या चरणीं मस्तक ठेवून सांगितलें :-"महाराज, एक विज्ञापना आहे ती ऐकावी. मागें वटेश्वरीं असतां सिद्धाईचा भर होता. त्यामुळें कामनिक संसारीजन जमून, नाना प्रकारच्या इच्छा धरून नित्य यात्रेस येत असत. त्यांत एक स्त्री व पुरुष मनांत पुत्रकामना धरून निराहार तीव्रतपानुष्ठान करीत असत. त्यांचा निग्रह पाहतांच वटेश्वर संतुष्ट झाला व त्यांची इच्छा पूर्ण करण्याबद्दल त्यानें मला आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणें मी त्यांस त्यांची इच्छा विचारितां त्यांनीं सांगितलें:-"महाराज, स्वामींच्या चरणीं आमचा भाव किती व कसा आहे, हें आम्हांस तोंडानें बोलून दाखवितां येत नाहीं. आतां कोणती इच्छा आहे? असा स्वामींनीं प्रश्न केला आहे. म्हणून सांगतों कीं, आमच्या कुलाचा उद्धार करील, असा आपणाप्रमाणें पुत्र असावा, अशी इच्छा आहे, ती परिपूर्ण करावी." असें सांगून तो पुरुष व त्याची ती साध्वी स्त्री वारंवार नमस्कार करूं लागली. तेव्हां मी त्यांस प्रसन्न झालों आणि सांगितलें कीं, साक्षात् विष्णूचा अवतार गोरक्षनाथ पृथ्वीवर संचार करीत असतात. ते तुमच्या घरीं भिक्षेस येतील व पुंगी वाजवितील. त्या पुंगीच्या नादांतून मी बालक रूपानें प्रगट होईन व तुमचा पुत्र म्हणवीन. तोंपर्यंत सावध रहा. कोणत्याही यतीस आपल्या घरांतून विन्मुख जाऊं देऊं नका. जा आतां आणि जें सांगितलें आहे तें ध्यानांत धरून आपला संसार विचारानें चालवा. याप्रमाणें जरी मी सांगितलें, तरी त्या सुजाण ब्राह्मणानें मला पुनः विचारलें:-"स्वामींनीं वर दिला आहे तो पूर्ण होईलच, पण आम्ही अज्ञान आहों, यासाठीं कांहीं तरी मुदत सांगावी आणि त्या मुदतीच्या आंत तुमच्या इच्छा पूर्ण होतील असें सांगून ठेवावें, म्हणजे मनाला रुखरुख लागून राहणार नाहीं." असें ऐकतांच मी त्याला बारा वर्षांची मुदत सांगितली. ती ऐकतांच आनंदित झालेला तो ब्राह्मण आपल्या स्त्रीसह आपल्या घरीं

निघून गेला. तरी तेव्हांपासून त्यास आमचा ध्यास लागून राहिला आहे. त्या गोष्टीस आज अकरा वर्षें व कांहीं महिने होऊन गेले आहेत व सहा महिन्यांचीच काय ती अवधि राहिली आहे. म्हणून हें वर्तमान स्वामींस निवेदन करण्यासाठीं आलों आहें. येत्या श्रावणांतील नागपंचमीच्या दिवशीं स्वामींनीं मुद्दाम त्या ब्राह्मणाचे घरीं जावें आणि पुंगी वाजवावी; म्हणजे त्या नादांत मी प्रगट होईन आणि त्या ब्राह्मणास वचन दिल्याप्रमाणें त्याची इच्छा पूर्ण करीन." असें ऐकतांच गोरक्षनाथानें त्यास "ठीक आहे" म्हणून सांगितलें. नंतर त्यांची आज्ञा घेऊन चांगावटेश्वर परत तापी-तीरावर आपल्या नियमित स्थानीं आला. नंतर त्या दिवसापासून पुढें सहा महिनेपर्यंत त्या चांगावटेश्वरानें आपला तो देह गुप्त केला; किंवा तो जो प्रसिद्ध चांगावटेश्वरावतार कित्येक शतकें पृथ्वीवर गाजून राहिला होता, तो पूर्ण केला; असें जरी म्हटलें तरी त्याला कांहीं प्रत्यवाय येईल असें वाटत नाहीं. हें चांगावटेश्वर-चरित्र-लेखन त्या अनाद्यनंत भगवंताच्या चरणीं विदित असो; अशी या चरित्रलेखकाची दृढाशा आहे.

**इति चांगावटेश्वरचरित्र संपूर्णमस्तु.**

---

# श्रीचांगाकेशवदासचरित्र प्रारंभ.

नगराजवळ नारायणडोह या नांवाचें एक क्षेत्र आहे. त्या क्षेत्रांत मुधोपंत या नांवाचा एक गृहस्थ कुळकरणीपणाच्या वृत्तीनें रहात असे. तो यजुर्वेदी सुशील ब्राह्मण नित्य पंचमहायज्ञ करून नित्य यथाशक्ति अन्नदान करीत असे. त्याची धर्मपत्नी महापतिव्रता रुक्मिणी या नांवाची होती. त्या दोघांसही अहोरात्र चांगदेवाचें ध्यान लागलेलें असल्यामुळें स्वप्नांतही कधीं त्याची विस्मृति होत नसे. चांगदेवानें "मी तुमचा पुत्र होईन,"

म्हणून जें वचन दिलें आहे, तें मिथ्या होईल असें वाटत नाहीं; तरी अजून किती वाट पहावी? त्या गोष्टीस बारा वर्षे तर होत आलीं; असें वारंवार त्यांच्या मनांत येत असे व डोळ्यांत तेल घालून तीं दोघें कानफाट्याची वाट पहात असत. या प्रकारेंकरून कांहीं काळ लोटल्यावर श्रावणमास लागला व नागपंचमीचा दिवस उगवला. तों त्या दिवशीं दोन प्रहरच्या वेळीं अकस्मात् गोरक्षनाथ त्या मुधोपंताच्या आंगण्यांत येऊन "आलख" शब्द उच्चारून उभे राहिले. तप्तसुवर्णाप्रमाणें सतेज कांति, त्यावर शुभ्र विभूति चर्चन केलेली, कानांत मुद्रा शोभताहेत व आकर्ण नेत्रांची भव्य शोभा मनहरण करून घेत आहे असें तें दिव्यरूप पाहतांच गृहस्वामिणी ती रुक्मिणी आपल्या मनांत संतोष पावली आणि विस्मितही झाली. तरी लौकर घरांत जाऊन तिनें भिक्षा आणली व गोरक्षनाथाचे झोळींत घातली आणि नमस्कार करून अत्यंत विनयानें त्यांच्या समोर उभी राहिली. तों चांगदेवानें पूर्वी 'कानफाट्या भिक्षेस येईल' इत्यादि जो वर दिला होता, तो तिला आठवला आणि "तोच कानफाट्या हा नसेल असें कशावरून समजावें?" असें मनांत आणून तिनें त्याला नमस्कार केला. तेव्हां त्यानें संतोषित होऊन "मनोरथाः सफलाः संतु," असा तिला आशीर्वाद दिला आणि आपली पुंगी मुखास लावून वाजविली. तो मंजूळ नाद ती रखमाई आनंदित वृत्तीनें ऐकत उभी राहिली असतां त्या नादाबरोबर एक बत्तीस लक्षणी बालक अंगणांत प्रगट झालें. ती बाई अनुरागयुक्त दृष्टीनें त्या बालकाकडे पहात आहे, तों गोरक्षनाथ जागच्या जागीं गुप्त झाले व मुंधोपंत जे कांहीं कामाच्या निमित्तानें बाहेर गेले होते, ते पुंगीचा नाद कानीं पडतांच धांवत तेथें आले. पण गोरक्षनाथ त्यांस दिसले नाहींत. पत्नीनें जेव्हां सर्व वर्तमान त्यांना सांगितलें तेव्हां कळलें व तें बालक पाहतांच हा चांगदेवानें वर दिला होता, तो फलद्रूप झाला आहे, असें मनांत आणून त्या बालकास आनंदानें उचललें व पत्नीच्या ओट्यांत घातलें. रखुमाईनें त्या बाल-

कास हातीं घेतांच तिला समाधान वाटलें. नंतर त्यांनीं आपल्या शक्ती-प्रमाणें आनंदोत्साहास आरंभ करून घरोघरीं सुंठवडा वाटला. त्या बालकाला न्हाऊ घालून रखमाईनें आडवा घेतांच भगवंताच्या अघटित घटनेमुळें तिच्या स्तनास पान्हा फुटला. तो चांगदेवाचाच अवतार आहे, असें त्या दोघांनींही मनांत आणलें आणि गणक व ज्योतिषी जमवून त्यांजकडून त्याचें जातक वर्णन करविलें. याचकांस यथा शक्ति दानें देऊन संतोषित केलें. तो योगेश्वर चांगदेव अवतरल्याकारणानें ग्रामवासी इतर लोकांनींही आनंद मानून आपापल्या घरीं आनंदोत्साह चालविले. बारा दिवस झाल्यावर त्या बालकास पाळण्यांत घातलें आणि चांगदेवाच्या वरप्रभावानें त्याची प्राप्ति झाली आहे असें मनांत धरून त्यांनीं त्याचें नांव चांगदेवच ठेविलें.

नंतर दिवस, मास, वर्ष लोटत असतां तो पुत्र शुक्लचंद्रकला जशा वाढ-तात, तसा वाढूं लागला. तो लौकरच चालूं व बोलूं लागल्यामुळें मुधोपंत व त्याची स्त्री या दोघांसही आनंद वाटूं लागला. पुढें त्याच्या वयास पांच वर्षें पूर्ण होतांच त्याचा व्रतबंध करून मुधोपंतानें आनंदेंकरून त्यास गायत्री मंत्राचा उपदेश केला. चार दिवसपर्यंत व्रतबंधोत्सवसंबंधानें ब्राह्मण-भोजन व दानधर्म चालला होता. वैदिक ब्राह्मण नित्य भोजन करून दक्षिणा तांबूलादि घेऊन संतोषित होत्साते आशीर्वाद देत व प्रसंगीं मुलास किंवा त्या नूतन वटूस वेदाक्षरही सांगत. त्याची प्रज्ञा थोर असल्यामुळें त्यास कष्ट मुळींच वाटत नसत. उलट अहोरात्र त्यास पढवीत असावें असें वाटत असे. असो.

व्रतबंध केल्यावर मुधोपंतानें त्याच्या वेदाध्ययनाची व्यवस्था केली. तो लीलावतारी योगभ्रष्ट असल्याकारणानें गुरूनें सांगण्याचाच काय तो अवकाश, त्याला ताबडतोब पाठ होत असे. थोडक्याच आवकाशांत त्यानें चार वेद पाठ केले. न्याय व्याकरणादि शास्त्राध्ययनासही त्याला फारसे कष्ट पडले नाहींत. त्याची बुद्धि पाहून मोठे मोठे विद्वान् ब्राह्मण आश्चर्य करीत असत.

भारत भागवतादि महापुराणें तर त्यास करतलामलकवत होऊन राहिलीं, त्यामुळें कित्येक लोक त्यास प्रत्यक्ष व्यासावतार असें मानीत असत. कित्येक "हा साक्षात् प्रजापति अवतरला आहे," असें मानून होन, मोहरा, पुतळ्या इत्यादि व्यवहारिक द्रव्य समर्पण करून त्याची संभावना करीत असत. कित्येक वस्त्रालंकार अर्पण करीत, त्यामुळें मुधोपंत व त्याची स्त्री रखुमाई या दोघांस आनंद वाटत असे. मुधोपंतानें चांगदेवाची सेवा करून त्यास आपल्या आधीन करून ठेविलें होतें, म्हणून तो पुत्ररूपानें त्याचें ऋण फेडण्यासाठीं आला होता, असें म्हटलें तर काय प्रत्यवाय आहे? कारण तो पुत्र झाल्यापासून मुधोपंत चांगला संपत्तिवान् झाला आणि नित्य त्या संपत्तींत भर पडत चालल्यामुळें ती सहजच वाढूं लागली. एका धनाढ्य ब्राह्मणानें एक सहस्र सुवर्णमुद्रा वरदक्षिणा देऊन आपली सुंदर कन्या त्या मुधोपंताच्या चांगदेवास अर्पण केली आणि आनंदोत्साहांत चार दिवसपर्यंत विवाह–समारंभ केला. त्याशिवाय आंदण म्हणून बहुत संपत्ति अर्पण करून त्या व्याह्यानें मुधोपंत व रखमाई यांसही अमूल्य वस्त्रें व अलंकार देऊन संतोषित केलें. नंतर मोठ्या आनंदगजरानें ती वरात मुधोपंताच्या घरीं आली व सुमुहूर्त पाहून नूतन वधुवरांनीं गृहप्रवेश केला.

नंतर तो चांगदेव नित्य त्रिकाळ स्नानसंध्या व घरीं असलेल्या स्मार्ताग्नीची सेवा करूं लागला. नित्य पंचमहायज्ञ व अतिथीपूजन करून त्यांची तृप्ति करण्याचा क्रम ठेविला. घरांत अन्नसत्र चालू करून अन्नार्थी याचकांची तृप्ति करण्याची व्यवस्था केली. याप्रकारें चोवीस वर्षेपर्यंत त्या चांगदेवानें यथासांग गृहस्थाश्रम–धर्म चालवून आईबापांची सेवा केली आणि त्यांना पूर्ण संतोषित केलें. ज्याला भगवत्प्राप्ति व्हावी असें वाटत असेल, त्यानें एकभक्तीनें आईबापांची सेवा करणेंच भाग आहे. मातापितृभक्त पुंडलीक होता, म्हणूनच प्रत्यक्ष भगवान् त्याच्यासाठीं विटेवर समचरण ठेवून भक्तोद्धार करीत उभा राहिला आहे. पितृभक्तीशिवाय स्नानसंध्या, व्रतें व उद्यापनें सर्व

व्यर्थ होत, असें वेदशास्त्र गर्जना करून सांगत आहे. तें जाणूनच चांगदेवानें पितृभक्ति करून कृतार्थता संपादिली व जगांत धन्य ह्मणवून घेतलें. चोवीस वर्षें पुत्राच्या हांतून सेवा करून घेतल्यावर मुधोपंताचा अंतकाळ सन्निध आला. तो जाणून चांगदेवानें त्यास प्रायश्चित देऊन शुद्ध केलें. त्याचें देहावसान होतांच रखमाईनें सहगमनाचा निश्चय केला व सर्व संसार सुनेस निरवून ती आपल्या पतिसह परलोकीं गेली.

नंतर माता व पिता या दोघांचेंही उत्तरकार्य केल्यावर पत्नीसह चांगदेव महायात्रेस गेला व अनुतापयुक्त होत्साता भागीरथीचें स्नान करून त्यानें बहुत द्रव्य खर्चून पितरांचें गयावर्जन केलें. याप्रकारेंकरून पितृऋणांतून मुक्त होऊन तो परत नारायणडोहास आला. आपल्या घरीं आल्यावर त्यानें घरांत जी वडिलोपार्जित धनसंपत्ति होती, ती याचकांस वाटून दिली. त्याचप्रमाणें अत्यंत औदार्यानें त्यानें आपली वृत्तिही आपल्या भाऊबंदांच्या हवालीं करून पूर्वीं मुक्ताबाईनें पंढरिनाथाची उपासना करावयास सांगितलें होतें, तें मनांत आणलें आणि अतित्वरेनें पंढरीस गमन केलें. त्याच्याबरोबर दिंड्या पताका घेऊन दुसरेही कित्येक यात्रेकरी पंढरपूर पाहण्यासाठीं निघाले होते, त्या सर्वांसह आनंदानें भजन करीत तो पंढरीक्षेत्रासन्निध आला व पाहूं लागला तों सर्व याति अभिमानरहित होऊन सप्रेमचित्तानें एकमेकांस वंदन करीत आहेत. तो प्रकार पाहतांच चांगदेवास आश्चर्य वाटलें व त्यानेंही आपलें महत्व दूर करून जनीं जनार्दन भरला आहे, अशा बुद्धीनें सर्व चराचरास वंदन करण्याचें व्रत घेतलें. असो; पंढरींत येतांच चंद्रभागेचें स्नान करून त्यानें पुंडलिकाचें दर्शन घेऊन व पूजन करून क्षेत्रप्रदक्षिणापूर्वक महाद्वारीं येऊन तेथूनच श्रीपांडुरंगास प्रथम नमस्कार केला.

नंतर तें पांडुरंगमूर्तीचें सगुण ध्यान पाहतांच त्यास आपल्या जन्माचें सार्थक झालें असें वाटलें व नेत्रांत प्रेमाश्रु उत्पन्न होऊन ते भूमीवर पडूं लागले. नंतर त्या परात्परपतीची महापूजा करून त्यानें गरुड, मारुति

यांचेंही दर्शन घेतलें. पांडुरंगाचें दर्शन, पूजन व स्तवन करून ज्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रुधारा चालल्या आहेत असा तो चांगदेव राहीरखुमाबाईचें दर्शन व पूजन करून पुन: महाद्वारीं आला व प्रेमानें कीर्तन करूं लागला. पौर्णिमेपर्यंत उत्साह व गोपालकाला आटपून सर्व यात्रा परत फिरल्यावर चांगदेवानें विचार केला कीं "भीमा नदींत भगवंताची तीर्थमूर्ति आहे, ती कोणाचेही प्रत्ययास येत नाहीं; तर ती मूर्ति आपण आपल्या या नेत्रांनीं पहावी." असें मनांत आणून तो भीमातीरीं एकाग्रवृत्ति करून अनुष्ठानास बसला. तीन दिवसपर्यंत फळ, मूळ, किंवा जीवन न-घेतां तो एकसारखें त्या तीर्थमूर्तीचें ध्यान करीत बसला होता.

आतां श्रोते किंवा वाचक अशी शंका घेतील कीं, भगवंताची एक मूर्ति देवालयांत असतां भिवरेंत दुसरी तीर्थमूर्ति कोठून आली? तर या विषयींची सुरस कथा पांडुरंगमहात्म्यांत प्रत्यक्ष श्रीव्यासानें वर्णन केली आहे, त्यांत असें सांगितलें आहे कीं, तो जगदात्मा तीर्थरूपानेंही वास करीत आहे. मूर्तिमंत साक्षात् विटेवर असलेलें भगवंताचें ध्यान चंद्रभागेच्या तीरांत गुप्त आहे. तेथेंच दिव्यदेहधारी पुंडलीक मुनि वास करीत असल्यामुळें तो चक्रपाणि त्याच्या सन्निध उभा आहे आणि वरून भीमा नदी वहात आहे. तर तें दिव्यरूप पहावें ह्मणून चांगदेव ध्यान करीत बसला असतां तीन दिवस अहोरात्र भगवंतानें जेव्हां त्याची निष्ठा पाहिली, तेव्हां तिसऱ्या रात्रीं तो करुणाकर चांगदेवाचे जवळ प्रगट झाला. समचरण विटेवर ठेवून दोन्ही हात ज्याचे कटीवर आहेत. श्रीमुखाची मनोहर शोभा पाहतांच चित्तवृत्ति तल्लीन होत आहे. मस्तकीं किरीट, कर्णांत मकराकृति कुंडलें, गळ्यांत वैजयंतीसह भक्तार्पित तुलसी–माळा रुळत आहे. असें तें रूप प्रकट करून तो भगवान् चांगदेवास सावध करून म्हणाला:–"अरे, आतां नेत्र उघड आणि मजकडे अवलोकन कर." तो शब्द ऐकतांच चांगदेव विस्मितांतःकरणानें आपल्याशीं म्हणूं लागला:–"या ठिकाणीं मी एकटा बसलों असतां

या मध्यरात्रीच्या समयीं मजपाशीं येऊन भाषण कोण करीत आहे?" असें मनांत आणून त्यानें सहज नेत्र उघडून पाहिलें. तों ब्रह्मादिक सुरवर ज्या मूर्तीचें ध्यान करीत असतात, तीच मूर्ति साक्षात् आपल्या समोर उभी आहे व असंभाव्य अंगकांति चोहोंकडे पसरली आहे. असें पाहतांच "हे भगवन्, त्राहि त्राहि!" असें बोलून त्यानें त्याच्या चरणावर मस्तक ठेविलें आणि प्रेमभावेंकरून त्याचें स्तवन आरंभिलें. तेव्हां भगवान् त्यास प्रसन्न झाले आणि म्हणाले:–"चांगदेवा, तुझ्या जें मनांत असेल तें मजपाशीं माग, मी तुझ्या सर्व इच्छा परिपूर्ण करण्यासाठींच या ठिकाणीं प्रगट झालों आहें." असें ऐकतांच चांगदेवानें सांगितलें:–"भगवंता, जर तूं मला प्रसन्न झाला आहेस, तर कृपा करून मला कृतार्थता प्राप्त होईल असा अनुग्रह करावास. जो मंत्र कानीं पडतांच भुक्तिमुक्तीचा लाभ होऊन परोपकार घडेल असा मंत्र सांगून वरप्रदान दे, इतकेंच मागणें आहे." याप्रमाणें चांगदेवाचें भाषण ऐकतांच भगवंतानें त्याचा हात धरून चंद्रभागेच्या उदकांत प्रवेश केला.

भगवंतासह चांगदेव भीमाजळांत बुडी देऊन जों पाहूं लागला, तों अत्यंत अद्भुतच चमत्कार! रत्न कोंदणांनीं विराजित कांचन ( सुवर्ण ) मंडप देदीप्यमान् लागलेला आहे व त्यांत दिव्यदेहधारी पुंडलीक बसलेला असून देवाधिदेव रुक्मिणीकांत त्याच्या समोर उभा राहिला आहे. केवळ वैकुंठीचीच रचना ती, मानवानें एका मुखानें किती वर्णन करावी? चांगदेवाचें भाग्य थोर, म्हणून भगवंतानें तें गुप्तस्थान त्याला दाखविलें आणि तेथेंच त्याला षडाक्षरी मंत्राचा उपदेश केला. नंतर जो हात सनकादिकांच्या मस्तकीं ठेवलेला, तोच भगवंतानें चांगदेवाच्या मस्तकावर ठेवून भगवंतानें त्यास कृतार्थ केलें. अमृतसंजीवनीरूप नाममंत्र जो त्याच्या कानांत सांगितला, तो साक्षात्कारास आल्यावर प्राणी प्रेतवत् झाला असला तरी त्यानें जिवंत व्हावें. याप्रकारेंकरून चांगदेवास आश्वासन देऊन भगवंतानें पुनः मायाजाळ पसरलें. नंतर चांगदेव नेत्र उघडून पाहतो तों पुनः पूर्ववत् क्षेत्ररचना

दिसूं लागली. नंतर मनांत आश्चर्य करीत चांगदेव जळाच्या बाहेर निघाला. भगवंतानें कृपा करून जो साक्षात्कार दाखविला आणि जो मंत्र त्याच्या कानांत सांगितला, तो सांगोपांग स्मरल्यामुळें "माझ्या भाग्यास पार नाहीं," असें त्याला वाटलें.

नंतर तेथून निघून तो क्षेत्रांत आला आणि पांडुरंगाचें पूजन व स्तवन करून त्यास मंगलारती ओंवाळून ध्यान केलें, तें हृदयसंपुटांत सांठविल्यावर त्यानें भगवंताजवळ आपल्या गांवीं जाण्यास निरोप मागितला. त्यावेळीं मात्र त्याच्या नेत्रांतून पाणी आलें. तरी देवाचा निरोप घेऊन व क्षेत्रसव्य घालून तो परिवारासह तेथून निघाला. मार्गक्रमण करीत असतां त्यास वारंवार पंढरपूर आठवूं लागलें. आणि सप्रेमांतःकरणानें तो मागें पहात पहात पुढील मार्गक्रमण करूं लागला. विठ्ठलनाम संकीर्तन करीत मार्गानें जात असतां त्यानें बहुत लोकांस भक्तिपंथास लाविलें. याप्रकारेंकरून मार्गक्रमण करीत करीत तो वैष्णववीर आपल्या नारायणडोह या नांवाच्या गांवीं आला. तो सन्निध आला असें ऐकतांच ग्रामवासी भाविक जनांनीं त्याला सामोरें जाऊन आनंदानें भजन करीत गांवांत आणलें. चांगदेवानें आनंदेंकरून गृहप्रवेश केला आणि पंचारती हातांत घेऊन प्रेमानें देवास ओंवाळिलें व सर्वांस खिरापत व प्रसाद देऊन संतोषित केलें.

नंतर नारायणडोहीं उपासनामार्ग वाढवीत असतां, एके दिवशीं तो चांगदेव पूजा करून ध्यान करीत आहे, तों प्रत्यक्ष पंढरिनाथ त्या ठिकाणीं प्रकट झाला आणि चांगदेवास म्हणाला :–"आतां त्वां गोदातीरीं जाऊन तेथें रहावें आणि लोकांत भक्तिमार्ग वाढवावा अशी माझी तुला आज्ञा आहे." असें ऐकतांच चांगदेव त्या भगवंतास म्हणाला :–"हे देवाधिदेवा अधोक्षजा, तुझी आज्ञा मला शिरसा मान्य आहे. पण तेथें जाऊन मी कोणाची पूजा करावी? माझा भक्तिभाव कोणत्या मूर्तीवर बसेल हें विचार करून मला सांगण्यास तूंच एक समर्थ आहेस." याप्रमाणें त्या प्रेमळ भक्तानें विचारतांच तो

घननीळ प्रसन्न झाला आणि त्याच ठिकाणीं गंडकीशिळेची एक केशवमूर्ति प्रगट झालेली त्यास दाखवून पांडुरंगानें त्याला सांगितलें:–" या मूर्तींत माझा अखंड वास आहे, यास्तव ही घेऊन तूं गोदातीरीं जाऊन वास कर आणि सर्वोपचारयुक्त या केशवमूर्तीची सेवा आणि उपासना करून कृतार्थ हो." याप्रमाणें आज्ञा करून भगवान् अंतर्धान पावल्यावर चांगदेवानें नारायण-डोहवासी आपल्या इष्टमित्रांस आपला गोदातीरीं जाऊन राहण्याचा निश्चय झाला होता तो कळविला, त्यामुळें ते सर्व लोक त्याच्या विरहास्तव दुःखी झाले आणि म्हणूं लागले:–" महाराज, आपण आम्हांला सोडून जातां, तर संसारांत आम्हीं कोणाच्या आधारानें वागावें ? " असें ऐकतांच चांगदेवानें त्यांस अभय देऊन सांगितलें:–" तुम्ही संकटकालीं भगवंताचें स्मरण करा, म्हणजे तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील." असें सांगून त्यानें आपल्या हातानें एक दगड स्थापन करून दिला व त्यांस पुनः सांगितलें:–" याला नवस करून आपापल्या भावनेप्रमाणें कार्य करून घेत असा." हा चमत्कार अजू-नही त्या ठिकाणीं आहे. असो. नंतर कुटुंबासह चांगदेव तेथून निघाले, तेव्हां कित्येक ग्रामस्थ त्यांस पोंचवीत त्याच्या बरोबर निघाले. ज्याप्रमाणें श्रीकृष्ण मथुरेस निघाला असतां गोकुळवासी भाविक गोप व गोपींची अवस्था झाली होती, त्याप्रमाणें नारायणडोहवासी लोकांची अवस्था चांगदेव गोदातीरीं जाऊन राहण्यासाठीं निघाला तेव्हां झाली. असो.

केशवमूर्तीस बरोबर घेऊन चांगदेव सहकुटुंब जो निघाला, तो कांहीं दिवशीं गोदातीरावरील पुण्यस्तंभ क्षेत्रीं आला. ज्याच्या ध्यानीं मनीं श्रीपांडुरंग–मूर्ति वसत होती, अशा त्या चांगदेवानें गोदावरीस पाहतांच साष्टांग नमस्कार केला. नंतर परम अनुतापयुक्त होत्साता त्या महानदीचें स्नान करून व सद्भावानें तिला हात जोडून म्हणाला:–"हे हरिचरणोद्भवे माते सरिते, अति श्रेष्ठ जो गौतम मुनि, त्यानें जगदोद्धार होण्यासाठीं तप-श्चर्या करून तुला या भूलोकीं आणिलें. तुझा महिमा अगाध आहे, तो या

बुद्धिज्ञानहीन दीन मानवानें कोठवर व किती वर्णन करावा? माते, या आपल्या अज्ञान बालकाला सायुज्यमुक्तीचा लाभ करून दे, इतकीच याची तुझ्या चरणाजवळ प्रार्थना आहे. तुझें पावन तीर व अमृततुल्य नीर दृष्टीस पडतांच मानवानें जरी शत जन्मपर्यंत दुष्कृत केलेलें असलें, तरी त्याचा नाश होतो. त्याचप्रमाणें स्नान करितांच सहस्रजन्मांचें दुरित नाहींसें होतें, अशी जी तूं, ती माझ्या पूर्वपुण्यबळानें माझ्या दृष्टीस पडलीस; तर आतां मला कृपादृष्टीनें अवलोकन करून अक्षय आपल्या सन्निध ठेवून घे अशी प्रार्थना करितों." याप्रमाणें प्रार्थना करून त्यानें संध्यावंदनादिक आपलें आन्हिक कर्म केलें आणि मग जाऊन शिवदर्शन घेतलें. सोमतीर्थावर स्नान करून त्यानें रामेश्वराचें दर्शन घेतलें व त्याचें षोडशोपचारें पूजन केलें. त्यास बिल्वपत्रांची लाखोली वाहिली आणि मग आपल्या बिऱ्हाडाची व्यवस्था लाविली. आपल्या सांप्रदायिकांसह बसून चांगदेव क्षणभर भगवन्नामचर्चा करीत आहे, तों पाक-निष्पत्ति झाली. तेव्हां पंचमहायज्ञपूर्वक यति व ब्राह्मणपूजन करून परमादरानें त्यांस आपल्या पंक्तीला घेऊन भोजन केलें.

श्रीपांडुरंगाची आज्ञा शिरसा वंद्य करून गोदातीरीं वास करण्यासाठीं आलेल्या चांगदेवानें तेथें आपला मठ बांधला आणि त्या मठांत श्रीकेशव राजाच्या मूर्तीची स्थापना केली. मोठे मोठे वैदिक ब्राह्मण बोलावून, श्रीकेशवराजमूर्तीस, त्यानें वेदघोष चालला असतां, पंचामृत स्नान घालून शुद्धोदकाचा अभिषेक केला. नंतर वस्त्रोपवस्त्र, चंदन, पुष्पें, तुलसीपत्रें समर्पण करून धूपदीप दाखविला व नैवेद्यही समर्पण केला. नंतर विडा, दक्षिणा, पुढें ठेवून प्रदक्षिणा घातल्या, नमस्कार केला आणि मंत्रपुष्पांजुली वाहून एकाग्र चित्तानें तिची प्रार्थना केली. ज्या दिवशीं सुमुहूर्त साधून त्यानें केशवराजमूर्तीची स्थापना केली, त्या दिवशीं ब्राह्मणसंतर्पण केलें व नाना प्रकारचीं मिष्टान्नें वाढून त्यांस तृप्त केलें आणि विडे दक्षिणा देऊन त्यांस निरोप दिला, त्यामुळें चांगदेवाची कीर्ति वाढत चालली. देशोदेशींची

यात्रा दर्शनासाठीं तेथें येऊं लागली. त्यांत जे गरीब, दुर्बल व अनाथ असत, त्यांच्या इच्छा सहज पूर्ण होत, त्यामुळें विशेषेंकरून तेच त्याची कीर्ति चोहोंकडे पसरण्यास कारण होऊन आपलें तें काम मोठ्या प्रेमानें करूं लागले. चांगदेवानें पृथ्वीवर येतांच प्रथम श्रीशंकराची आराधना केली, त्यावेळीं जे अभंग केले, त्यांत चांगावटेश्वर असें नांव घातलें, हें सर्व भक्त किंवा वैष्णव आहेत ते जाणतातच; पण पुण्यस्तंभास येऊन केशवराजाची मूर्ति स्थापन केल्यावर त्यानें जी कविता केली, त्या कवितेंत त्यानें आपलें नांव चांगाकेशवदास असें घातलें. पुण्यस्तंभास आल्यावर त्यानें, श्रीपांडुरंगानें जो षडक्षरी मंत्र सांगितला होता, त्याचें अनुष्ठान केलें व तो सिद्ध होतांच त्याला त्याचा साक्षात्कार येऊं लागला. चांगावटेश्वर पुन: प्रगट झाला व श्रीपांडुरंगानें प्रसन्न होऊन त्याला संजीवनी मंत्र दिला, असें सर्व लोक बोलूं लागले. नानाप्रकारच्या कामना धरून दूर दूरचे लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले व त्यांच्या इच्छा पूर्ण होऊं लागल्या, त्यामुळें महती वाढून चोहोंकडे त्याची कीर्ति पसरली.

त्याच समयास देवगिरींत रामराजा राज्य करीत होता; त्यानें जेव्हां चांगदेवाची कीर्ति ऐकली, तेव्हां "स्वत: त्याच्या दर्शनास जावें आणि काय चमत्कार आहे तो पाहून यावें," असें त्याच्या मनांत आलें. त्याप्रमाणें पुण्यस्तंभास येऊन त्यानें चांगदेवाचें दर्शन घेतलें व हात जोडून व पुढें उभा राहून त्याचें स्वरूप लक्ष्यपूर्वक पहात उभा राहिला. तेव्हां त्याचें मनोगत जाणून चांगदेवानें त्याला सांगितलें, " महाराज, आपण एकटेच आलां आहां असें दिसतें, तर आपलें सर्व सैन्य व समुदाय घेऊन या ठिकाणीं यावें व तें वैभव आमच्या दृष्टीस पडावें अशी आमची इच्छा आहे." असें ऐकतांच राजानें आपल्या राज्यांत प्रधानादिकांस लिहून पाठविलें कीं, " पत्र देखत सर्व सेना–समुदाय सिद्ध करून यावें." हें पत्र पोंचतांच रामराजाचा मुख्य प्रधान सर्व सैन्य सिद्ध करून पुण्यस्तंभास आला. तेव्हां चांगदेवानें त्यास

चमत्कार दाखविण्यासाठीं भोजनाचें आमंत्रण केलें. त्याप्रमाणें सैन्यासह राजा जों स्नान करून येत आहे, तों चांगदेवानें पंक्ति बसविण्याची व्यवस्था त्याला सांगितली. पण त्यांत चमत्कार असा कीं, मठांत पाकनिष्पत्ति करून ठेवल्याचें चिन्ह राजास मुळींच दिसेना.

चांगदेवाच्या आज्ञेप्रमाणें त्या रामराजानें ज्यांच्या त्यांच्या जातिवर्णाप्रमाणें सहस्रावधि सैनिकांच्या निरनिराळ्या पंक्ति बसविल्या ; तों असा चमत्कार झाला कीं, प्रत्येकाच्या पुढें षड्रसान्नानें परिपूर्ण अशीं पात्रें वाढलेलीं दिसूं लागलीं व त्या अन्नाच्या उत्तम सुवासानें दश दिशा व्यापून राहिल्या. सर्व लोक भोजनास बसल्यावर ज्याला जें आवडलें, तेंच त्यानें तृप्ति होई तों भक्षण केलें, पण कोणास कमी झालें किंवा तोटा आला, असें मुळींच वाटलें नाहीं. तो प्रकार जेव्हां रामराजानें पाहिला, तेव्हां त्याला फारच संतोष झाला आणि हा एक अद्भुत चमत्कार आहे खरा, अशी त्याची खात्री झाली. नंतर राजानें हात जोडून चांगदेवाची प्रार्थना केली कीं, "स्वामींनीं माझ्या उपवनांत येऊन वास करावा, असें मी इच्छितों. तेथून हें गोदावरी-तीरही जवळच आहे." याप्रमाणें राजानें विनंति करितांच चांगदेवानें त्याच्या वचनास मान देऊन त्यानें सांगितलेल्या उपवनांत जाऊन वास केला. कुटुंब-परिवारासह गोदातीरीं येऊन राहिल्या दिवसापासून त्या चांगाकेशवदासाचा नियम असा होता कीं, नित्य सोमतीर्थांत स्नान करून संध्यावंदनादि आन्हिक विधि आटपावा, श्रीकेशवराज व पांडुरंग यांचें पूजन करून पंचमहायज्ञ, अतिथी-पूजन इत्यादि गृहस्थधर्म यथा शास्त्र चालवावा आणि अहोरात्र भगवंताचें नामस्मरण व कीर्तन करून लोकांची भजन-मार्गाकडे प्रवृत्ति होईल असें वागावें. त्याचप्रमाणें प्रतिवर्षी आषाढी-कार्तिकीस पंढरीची वारी करावी आणि तेथें त्या निमित्तानें आलेल्या भक्त-मंडळींचें दर्शन घेऊन कृतार्थता संपादन करावी. या प्रकारेंकरून बारा वर्षें तें व्रत चाललें आणि त्या चांगाकेशवदासाची विमल कीर्ति चोहोंकडे प्रसृत झाली.

नंतर एके दिवशीं आपल्या बरोबरीचे सर्व संतमहंत आपल्या आश्रमांत बोलावून केशवदासानें त्यांचें पूजन केलें आणि शेवटीं त्या सर्वांस आपला समाधिस्थ होण्याचा मनोदय कळविला. तेव्हां त्याच्या मनोदयाप्रमाणें सर्व मंडळीनें मिळून समाधिस्थ होण्यास एक उत्तम मुहूर्त नेमला आणि त्या संबंधानें दानधर्म, कीर्तन, भजन, इत्यादि सर्व सांप्रदायिक कर्मांचा आरंभ केला. नित्य सहस्त्रावधि ब्राह्मणांस भोजन व विडे दक्षिणा देऊन संतुष्ट करावें आणि त्यांचे आशीर्वाद घ्यावे हा क्रमही चालू झाला. चांगदेव समाधि घेणार, ही बातमी चोहोंकडे पसरतांच त्याचें दर्शन घेण्यासाठीं लक्षावधि यात्रेकरी जमले. तों एक अद्भुत चमत्कार झाला, तो असा:—

कल्याण कलबुर्ग्यांत शंकर या नांवाचा एक धनकनक-संपन्न ब्राह्मण होता, पण त्याला संतति नव्हती. कर्मधर्मसंयोगामुळें, त्याची स्त्री व तो तारुण्यांत असतां एकाएकीं त्याजवर मृत्यूचा घाला पडला. त्यामुळें त्याच्या त्या तरुण स्त्रीस अतिशय दुःख झालें. त्याच्या भावाबंदांतून एक धर्मपुत्र होऊन त्यानें त्या शंकर ब्राह्मणाचें उत्तरकार्य केलें. नंतर त्या शंकराची माता आपल्या पुत्राच्या अस्थि बरोबर घेऊन महायात्रेस निघाली. तेव्हां शंकराची तरुण स्त्रीही सासूच्या बरोबर यात्रेस निघाली. त्या दोघी मार्गक्रमण करीत असतां पुण्यस्तंभास आल्या व एका ब्राह्मणाचे घरीं बिऱ्हाड करून तीन दिवस तेथें राहिल्या. तों लोक नारळ, बुका व पूजासाहित्य बरोबर घेऊन चांगदेवाच्या दर्शनास जात असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हां त्यांसही साधूचें दर्शन घेण्याची इच्छा झाली आणि त्यांत जी सासू होती, ती तर त्यासाठीं निघालीच. तेव्हां ती तरुण सूनही तिच्या बरोबर येण्याची आपली इच्छा तिला कळवून त्या संबंधानें तयारी करूं लागली. तेव्हां सासूनें तिला सांगितलें:—“ बाई, अजून तुला आपल्या ब्राह्मण-धर्माप्रमाणें सोंवळें केलें नाहीं, यासाठीं तो साधु तुझ्या दर्शनाचा विटाळ मानून तुजवर कोप करील. यासाठीं आपलें मन आवरून तूं बिऱ्हाडांतच राहशील तर

फार चांगलें होईल." याप्रमाणें जरी त्या सासूनें तिला सांगितलें, तरी तें मनावर न घेतां ती सून आपल्या सासूच्या पाठीमागून चांगदेवाच्या दर्शनास गेली. लोकांची दाटी होतीच, सासूच्या पाठीमागून त्या सकेशा तरुण सुनेनें जेव्हां चांगदेवास नमस्कार केला, तेव्हां चांगदेवानें ती सधवा आहे असें मानून "पुत्रवतीभव," असा तिला आशीर्वाद दिला. तो ऐकतांच तेथें असलेले माहितगार ब्राह्मण हसूं लागले आणि "साधूनें विचार न करितां आशीर्वाद दिला; पण हा खडकावर मेघवर्षाव झाल्याप्रमाणें फुकट जाणार," असें म्हणूं लागले. तें ऐकतांच चांगदेवानें त्यांस त्यांचें सर्व वर्तमान विचारलें असतां त्यांनीं सर्व सत्य वर्तमान कथन केलें. तेव्हां "आमचा आशीर्वाद ईश्वर-कृपेनें सत्य झाला पाहिजे" असें बोलून सर्वांच्या समक्ष त्या बाईकडून तिच्या पुत्राच्या अस्थि तेथें आणविल्या आणि संजीवनी मंत्रानें उदक अभिमंत्रण करून त्या अस्थींवर ओतलें व तें त्या सुनेस पाजलें. त्यामुळें तिला त्या दिवसापासूनच गर्भ-संभव झाला आणि गर्भाचीं सर्व लक्षणें स्पष्ट दिसूं लागलीं. तेव्हां तेथें जे कित्येक कुत्सित ब्राह्मण होते, त्यांनीं घरोघर जाऊन, "आतां हा साधु वर्णसंकर करणार," असें म्हणून त्याची निंदा आरंभिली. पण तोंडावर कोणी एक शब्दही बोलत नसे. ती विधवा सौभाग्य-लक्षणयुक्त दिसूं लागतांच, त्यांनीं तिचें नांव विठ्ठलसवाष्ण असें ठेविलें. तें नांव अजूनही प्रसिद्ध आहेच. असो. कित्येक म्हणत कीं, "हा चांगदेव साबरी मंत्र-प्रयोगानें अद्भुत कृति करून दाखवितो. त्या स्त्रीला पुत्र झाला तरी तो यातींत मिळणें कठीण आहे." याप्रमाणें जें कुत्सित लोक बोलत असत तें सर्व अंतर्ज्ञानानें जाणून, त्या चांगदेवानें बालकाची योग्य व्यवस्था लाविल्यावांचून समाधिस्थ होणें नाहीं, असा निश्चय करून तो बेत राहित केला आणि त्या पुत्राच्या जन्माची वाट पहात राहिला. विधवेस गर्भ-संभव झाल्या दिवसापासून चांगदेवानें तिला आपल्या मठांत ठेवून भगवद्भक्तीस लाविलें होतें.

नंतर त्या गर्भास नवमास पूर्ण भरतांच ती विधवा प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. तो पांडुरंगाचा वरदपुत्र मानून चांगदेवानें पुत्र–जन्मोत्सव चांगला केला. पुढें दिवसा मासा तो पुत्र वाढत चालला असतां व्रतबंधास योग्य झाला; पण तो विधवा–पुत्र जाणून ब्राह्मण त्याच्या व्रतबंधाचा विचार मनावरच धरीनात. तेव्हां चांगदेव आपल्या परिवारासह त्या पुत्रास, त्याच्या मातेस व आजीस बरोबर घेऊन पंढरपुरास आले. चंद्रभागेचें स्नान व भगवंताचें दर्शन घेतल्यावर त्यानें तो विधवेचा पुत्र श्रीविठ्ठलाचे चरणावर घातला आणि "याचा अभिमान तुला असूं दे," अशी त्या भगवंताची प्रार्थना केली असतां पांडुरंगानें ती मान्य केली.

नंतर दुसऱ्या दिवशीं चांगदेवानें सर्व क्षेत्रवासी ब्राह्मण बोलावून त्यांस त्या पुत्राचें सर्व जन्मकर्म वृत्त कथन केलें आणि "आतां याचा व्रतबंध करावा," अशी त्यांची प्रार्थना केली. पण त्यांनीं त्याचा धिःक्कार करून "अविधि कर्मानें झालेली संतति शुद्ध ब्राह्मण ज्ञातींत मिसळणार नाहीं," असें स्पष्ट सांगितलें आणि त्याची निंदा करीत सर्व उठून गेले. तो प्रकार पाहतांच त्या पुत्राची माता रुदन करूं लागली असतां चांगदेवानें तिला अभय देऊन शांतविलें.

नंतर चांगदेवानें त्या ब्राह्मणीकडून शंभर पात्रांचा स्वयंपाक करविला आणि स्वतः राउळांत जाऊन पंढरीनाथाची प्रार्थना केली. इकडे ब्राह्मणीनें कित्येक क्षेत्रवासी ब्राह्मणांस भोजनास बोलाविलें असतां त्यांनीं तिचा धिःक्कार केला व तिला कुशब्दांनीं ताडण केलें; तेव्हां ती दुःखित होऊन बसली, तों चांगदेव धांवत तेथें आला व पंढरीनाथ भोजनास येत आहे असें सांगून त्यानें तिच्याकडून पानें वाढण्याची व्यवस्था करविली.

इकडे राउळांत कित्येक प्रेमळ भक्त वैष्णव देवदर्शनास आले, तों पंढरीनाथ सिंहासनावर नाहीं. असें पाहतांच कित्येक ह्मणूं लागले:–"देव आज पळून गेला यांत संशय नाहीं." कित्येक ह्मणूं लागले कीं, "चांग-

देवानें त्याला नेलें. त्याची प्रेमकला पाहून तो वाळवंटांत चांगदेव राहिला आहे तेथें भोजनास गेला असावा." कित्येक भक्तिभाव रहित होते ते म्हणूं लागले:-"पाषाण-मूर्ति चालेल व जाईल कशी? कोणी तरी त्याला चोरूनच नेलें असावें." असें अनेक लोक अनेक प्रकारांनीं बोलूं लागले. कित्येक वाळवंटांतही आले; पण तेथेंही त्यांस कांहीं दिसेना. सर्व क्षेत्र-वासी ब्राह्मण विठोबा गेला असें पाहून दुःखी झाले व कित्येक मुक्तकंठ होत्साते रुदनही करूं लागले. कित्येक चांगदेवाजवळ येऊन, "राउळांतून देव कोठें गेला?" असें विचारूं लागले. तेव्हां त्यानें सांगितलें:-"तुह्मीं विधवेस वाळींत घातलें पण ती खरोखर शुद्ध आहे, म्हणून देव तिच्याकडे जेवावयास आला आहे." याप्रमाणें जरी त्यानें सांगितलें, तरी तो भग-वान् चांगदेवाशिवाय दुसऱ्या कोणासही दिसेना. बरें, त्यांनीं त्याचें सांगणें असत्य मानावें, तर देवळांत मूर्ति नाहीं. तेव्हां ते सर्व ब्राह्मण व भक्त त्यास ह्मणाले :-"तुह्मी सांगतां यास कांहीं प्रमाण पाहिजे. आतां हें जें अन्न तुह्मीं तयार करविलें आहे, हें जर सर्वांना पुरलें, तर आह्मी देव येथें आला आहे हें सत्य मानूं." असें ऐकतांच चांगदेवानें त्यांना सांगितलें कीं, "महाराज, तुह्मी स्नान करून यावें. भगवान् पांडुरंग हें इतकेंच अन्न सर्वांस पुरवील." असें ऐकतांच ते धगामर ब्राह्मण स्नानें करून आले व पंक्तीनें बसले. दोन हजारांवर पात्रें मांडलीं, तरी ब्राह्मण उरलेच आहेत. त्याशिवाय इतर याति तेथें भोजन करण्यासाठीं आल्या. तरी चांगदेवानें न भितां देवाचें नांव घेऊन सर्वांच्यासाठीं पानें मांडविलीं. ब्राह्मणांनीं पुनः त्याला सांगितलें कीं, "जें अन्न शिजलें आहे त्यानें जर सर्वांची तृप्ति झाली, तर देव येथें आला आहे हें सत्य मानून तुम्हीं विधवेस वरदपुत्र दिला आहे त्याचा व्रत-बंध करूं." असें ऐकतांच केशवदासचांगा यानें "ठीक आहे." असें ह्मणून त्या अन्नावर उदक प्रोक्षण केलें व त्या विधवा मातेस व तिच्या पुत्रास पानें वाढावयाची आज्ञा केली. त्याप्रमाणे "तीं दोघें सर्वांस वाढतील," असें

त्यानें ब्राह्मणांसही सांगितलें. त्याशिवाय त्या मातापुत्रांस दुसरी एक खुबी सांगितली कीं, "तुम्ही पात्रावर भात लवंडीत चला. तो उकरून काढतांना भांडें अगदीं पालथें करूं नका. पांडुरंगाच्या कृपेनें हें इतकेंच अन्न सगळ्यांना पुरेल." असें ऐकतांच त्या मातापुत्रांनीं चांगदेवाच्या आज्ञेप्रमाणेंच क्रम चालविला असतां तें अन्न सर्वांस पुरून उरलें, त्यामुळें ते सर्व क्षेत्रवासी व ब्राह्मण आश्चर्य करूं लागले. नंतर सर्व "या विठ्ठलसवाष्णीच्या हातचें जेवलें तरी कांहीं पाप नाहीं," असें म्हणूं लागले. क्षेत्रांत दुसरेही कित्येक भाविक होते, त्यांस जेव्हां हें कळलें, तेव्हां ते मुद्दाम 'प्रसाद घ्यावा' म्हणून तेथें धांवत आले व पात्रांवर बसले असतां त्यांसही त्या मातापुत्रांनीं तृप्त केलें. ज्याला जें रुचलें, तें त्याच्या पात्रावर वाढलें आहे असें दिसलें आणि सर्व प्रकारें सर्वांची तृप्ति झाली. तो विधवा–पुत्र जो भात लवंडून पात्रांवर वाढीत होता, त्यास सर्व लोक "भातलवंड्या" असें विनोदानें म्हणूं लागले असतां पुढें त्याचें तेंच उपनाम होऊन राहिलें. त्या दिवशीं त्या भातलवंड्याच्या हातानें पंढरपूर क्षेत्रांतील प्राणिमात्र सर्व तृप्त झाले, तरी जो स्वयंपाक केला होता तो तसाच राहिला! ज्याच्यावर प्रत्यक्ष श्रीविठ्ठलानेंच कृपा केली, त्यास काय कमी पडणार आहे? तृप्त झालेल्या ब्राह्मणांनीं भोजनदक्षिणा व तांबूल घेतले आणि चांगदेवाच्या त्या वरद पुत्रास उत्तमोत्तम आशीर्वाद देऊन मंत्राक्षता त्याच्या पदरांत घातल्या. तेव्हां मात्र तो प्रकार पाहून चांगदेवाला संतोष वाटला. नंतर सर्व देवळांत जाऊन पाहतात तों ती सगुण मूर्ति त्यांस दिसूं लागली. सर्व चांगदेवाच्या भक्तिभावाची स्तुति करूं लागले. नंतर दुसऱ्या दिवशीं क्षेत्रवासी ब्राह्मणांनीं चांगदेवाजवळ येऊन त्या भातलवंड्याच्या मुंजीचा निश्चय केला आणि माघमासीं उत्तम मुहूर्त नेमून त्या मुहूर्तावर त्याचा व्रतबंध केला. चार दिवसपर्यंत तो व्रतबंधोत्सव चालला होता; तो यथासांग आटपल्यावर चांगदेव त्याच्या आई व आजीसह त्यास बरोबर घेऊन कल्याण कलबुर्ग्यास त्याच्या घरीं

आले. त्याचे आप्त सुहृद होते त्यांस तें सर्व वर्तमान कळविलें. तेव्हां ते त्या मुलांचीं उत्तम लक्षणें पाहून संतोषित झाले व त्यांनीं त्याचा स्विकारही केला.

नंतर तेथेंच एक धनवान् गृहस्थ होता, त्यानें चांगदेवाजवळ येऊन आपली कन्या त्या मुलास देण्याचा आपला मनोदय कळविला. तेव्हां चांगदेवानें तेंही कबूल केलें व लग्नाची तयारी करून सुमुहूर्तावर त्याचें लग्न करून त्यास गृहस्थाश्रमी केलें. इतका प्रकार झाल्यावर चांगदेवानें आपला द्वारकेस जाण्याचा निश्चय झाला होता, तो त्यांस कळविला. तेव्हां तेथील लोक, त्यांचें दर्शन पुनः दुर्लभ असें समजून दुःखी झाले. भात लवंड्याचें नांव विठोबा ठेवलें होतें, त्याच्या मातेनें त्यास चांगदेवाच्या पायांवर घालून असा वर मागितला कीं, "याच्या वंशांत तुजवांचून दुसरें दैवत नसावें. जो हें अन्यथा करील त्यास दरिद्र येईल." असें ऐकतांच चांगदेवानें तें मान्य करून त्यास पांडुरंगाची उपासना व दर आषाढी कार्तिकीस पंढरीची वारी करावी असें सांगितलें. त्या विठोबाचे वंशज अजून पंढरीस येतात व भातलवंडून वाढतात, ही त्यांच्या पूर्वजाची खूण अव्याहत चालू आहे. असो. चांगदेव सर्वांचा निरोप घेऊन आपल्या सांप्रदायिकांसह तेथून निघाले, ते द्वारकेचा मार्ग चालूं लागले.

भारूर देशचा देशपांड्या यादवपंत या नांवाचा एक ब्राह्मण होता, तोही चांगदेवाबरोबर द्वारकेची यात्रा करण्यास निघाला असतां त्याची स्त्री जी गरोदर होती, तीही त्याच्याबरोबर निघाली. तेव्हां त्यानें तिला नानाप्रकारें सांगून अडथळा घातला; पण ती कांहीं ऐकेना. ती तशीच त्याच्या मागून चालूं लागली. तेव्हां "चांगदेवाच्याबरोबर जात आहों; तर भगवान् गोपालकृष्णच इचें संरक्षण करील," असा विचार करून तीं दोघेंही निघालीं. पण ती सहा महिन्यांची पहिलटकरीण गरोदर, ह्मणून तिचे कोणी आप्तसंबंधी होते, ते तिला राहवून घेण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां तिनें सांगितलें:— "माझा भ्रतार आधींच विरक्त देवभक्त आहे. त्यांत मी जर त्याला सोडून

राहिलें, तर तो वेळीं संन्यासग्रहणही करील आणि मग मला जें दुःख होईल, तें या मार्गश्रमांहून विशेष जाचक होईल. यासाठीं कोणीही मला मोडती घालूं नये." याप्रमाणें सांगून तिनें सर्वांस परतविलें.

यादवराव चांगदेवाच्या मेळ्यांतून चालले आहेत व मागून त्यांची गरोदर स्त्री हळू हळू मार्गक्रमण करीत आहे. पण तिच्यानें चालवेना. सायंकाळीं ती यात्रा एके ठिकाणीं उतरली असतां, प्रहर रात्रीपर्यंत मार्गक्रमण करून ती स्त्री आपल्या पतीच्या सन्निध गेली. तेव्हां तो म्हणूं लागला:-" तुला मी येऊं नको म्हणून सांगितलें असतां कां आलीस? तर आतां परतून जा व आपल्या माहेरीं रहा." असें ऐकतांच ती रुदन करूं लागली. तेव्हां इतर यात्रेकरी होते त्यांनीं तिची समजूत केली आणि "आतां या आपल्या पतीची संगति सोडून परत जाऊं नको," असें तिला त्यांनीं शिकविलें. यादवराव चांगदेवास अनन्य शरण जाऊन त्यानें त्याचा अनुग्रह घेतला आणि समाधान पावला. सर्व प्रपंच मिथ्या आहे, असा त्याचा निश्चय होतांच तो विदेही होऊन ब्रह्मानंदानें डोलूं लागला. बायको बरोबर होती तरी त्याला तिची काळजी वाटेनाशी झाली. चराचर सर्व आत्मवत् भासूं लागलें. असो.

चांगदेव आणि त्याच्या बरोबर असलेले यात्रेकरी आनंदानें भगवद्भजन करीत गात व नाचत पंथ क्रमण करीत असतां यादवरावाच्या स्त्रीच्या गर्भास नवमास पूर्ण भरले. कोणी मायबहीण जवळ नाहीं, चालवेना, यादवराव जो यात्रेच्या बरोबर चालला होता, तो मागेंही पाहीना. अशी स्थिति असतां, एके दिवशीं एकाएकीं तिचें पोट दुखूं लागलें. तोंपर्यंत ती महीनदीच्या तीरावरील ओसाड अरण्यापर्यंत आली होती. त्या ठिकाणीं जेव्हां तिचें पोट अतिशय दुखूं लागलें, तेव्हां ती तशीच तळमळत भुईवर पडून राहिली. शेवटीं जेव्हां उपाय नाहींसा झाला, तेव्हां तिनें चांगदेवाचा धांवा आरंभिला. तेव्हां तिचे ते शब्द जगद्व्यापक व भक्तवत्सल जो परमात्मा गोपाल कृष्ण, त्याच्या कानीं पडले आणि तो जगदात्मा स्त्रीचें दिव्य रूप धारण करून त्या

यादवरावाच्या स्त्रीजवळ प्रगट झाला. पांढरें पातळ व चोळी अंगांत असून, बेताचेच पण दिव्य अलंकार जिनें धारण केले आहेत, अशी ती स्त्री पाहतांच यादवरावाच्या स्त्रीला संतोष वाटला आणि "बाई, तूं कोणीकडून आलीस?" असें ती तिला विचारूं लागली. तेव्हां त्या स्त्रीनें तिला सांगितलें:—"बाई, मला चांगदेवानें पाठविलें आहे. माझें नांव कृष्णाबाई. तुझा प्रसूतकाळ सन्निध आला, ह्मणून मी आलें आहें; तर आतां अगदीं भिऊं नको, तुझी सगळी व्यवस्था व सोय मी करीन." असें सांगन त्या भगवंतानें योगमायेचें चिंतन करून त्या ठिकाणीं नगर निर्माण केलें व त्या स्त्रीचा हात धरून तिला एका मंदिरांत नेलें आणि सांगितलें:—"मुली, आपल्या मनांतील गोष्ट सांगण्याबद्दल मजपाशीं अगदीं संकोच बाळगूं नको. तूं या परदेशांत एकटी पहिलटकरीण, तुझ्या मायेची मायबहीण कोणीच तुझ्याजवळ नाहीं, हें जाणूनच मी धांवत आलें आहें; आतां अगदीं भिऊं नको." याप्रमाणें त्या कृष्णाबाईचें भाषण ऐकतांच, यादवरावाच्या स्त्रीला फारच संतोष वाटला आणि "बाई, तुझे हे उपकार माझ्यानें जन्मांतरींही फिटणार नाहींत असें मला वाटतें," असें बोलून तिनें तिच्या चरणावर मस्तक ठेविलें. तों तिचा प्रसूतकाळ जवळ आला. तेव्हां नेत्रपातें लवतें न लवतें तों ती प्रसूत झाली. उत्तम व सर्व शुभलक्षणयुक्त असा पुत्र झाला. तो पुत्र पाहतांच भगवंतालाही संतोष वाटला. त्यानें आपल्या हातानें ती बाळंतपणाची खटपट केली. मुलाचें नाल छेदन करून त्यास न्हाऊं घातलें. तों ती बाळंतीण म्हणूं लागली:—"कृष्णाबाई, तुह्मी एकट्याच हे श्रम करीत आहां, दुसरी कोणी सुईणही बोलाविली नाहीं, त्यामुळे व तुह्मी फारच कष्ट करीत आहां त्यांकडे पाहून मला अतिशय विस्मय वाटत आहे." असें ऐकतांच कृष्णाबाईनें सांगितलें:—"बाई, तुझी हातीं पायीं सुटका झाली हें पाहूनच माझे सर्व श्रम परिहार झाले आहेत." असो. भगवंतानें तिला औषध, पाणी, पथ्य, इत्यादि कोणतेंही उणें वाटेल असें केलें नाहीं. पांचवी, सहावी करून सटवीचें पूजन

केलें आणि बाळंतिणीस दहा दिवस झाल्यावर तिलाही आपल्या हातानें न्हाऊं घातलें. याप्रकारेंकरून त्या लाघवी भगवंतानें एक महिना त्या यादवरावाच्या स्त्रीचें बाळंतपण केलें; पण ही गोष्ट त्या स्त्रीशिवाय दुसऱ्या कोणालाही कळली नाहीं.

एक महिना होत आहे तों बरोबरच्या मंडळीसह चांगदेव द्वारकेस गेले. त्यांनीं प्रथम गोमतीचें स्नान केलें आणि मग देवालयांत प्रवेश करून द्वारकानाथाचें दर्शन घेतलें. नंतर तो चांगदेव जेव्हां भगवंताचें ध्यान करूं लागला, तेव्हां त्या मूर्तींत भगवंत नाहीं असें त्याच्या ध्यानांत आलें व आश्चर्य वाटलें. नंतर पुन: ध्यान करून जेव्हां तो योगेश्वर चांगदेव पाहूं लागला, तेव्हां सर्व प्रकार त्याच्या ध्यानांत आला. जगन्माता रुक्मिणी त्यास म्हणाली:– "केशवदासा, आज एक महिना झाला, भगवान् कृष्णाबाईचें रूप धरून यादवरावाच्या स्त्रीचें बाळंतपण करण्यासाठीं गेले आहेत. आम्हांसह अष्टमहासिद्धि त्यांच्या दासी असतां, ते स्वत: असे कष्ट करितात, याला काय ह्मणावें हें कळत नाहीं." असें ऐकतांच केशवदास त्या जगन्मातेस म्हणाले:– "स्वत: परिश्रम करून भक्तकार्य करण्यास झटावें, हा त्यांचा धर्म, माते तूं जाणतच आहेस. मागील सर्व चरित्रांचा विचार करून पाहशील तर मी कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्या भगवंताचा स्वभावच जर असा आहे, तर त्याला कोणाचा कांहीं उपाय आहे असें नाहीं." याप्रमाणें चांगदेवानें भाषण करितांच रुक्मिणी विस्मित झाली आणि त्यास म्हणाली:– "आतां जसा तुला कळेल तसा उपाय करून भगवंतास घेऊन ये किंवा पाठवून दे. इतकेंच सांगणें आहे. ते महीनदीच्या तीरावर स्त्रीरूपानें यादवपत्नीचें बाळंतपण करीत आहेत." असें ऐकतांच त्या विश्वमातेस वंदन करून चांगदेव तेथून निघाला, तो ब्रह्मारण्यांत महीनदीच्या तीरावर आला. तों दुरूनच योगमायाविनिर्मित नूतन नगरी त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां तर त्याच्या मनाला फारच विस्मय झाला. नंतर तेथील लोकांस कृष्णाबाईचा

शोध विचारितां त्यांनीं जें मंदीर दाखविलें, त्यांत चांगदेवानें प्रवेश केला. तों आंगण्यांतच त्यास कृष्णाबाई भेटली. तरी मायालाघवी भगवंतानें त्याला ओळख लागूं दिली नाहीं. चांगदेवानें तिला पाहिलें खरें, पण मनांत संशय उभा राहिल्यामुळें त्यानें तिला नमस्कारही केला नाहीं. चांगदेव जेव्हां त्या मंदिरांत गेला, तेव्हां ती बाळंतीण उठून पुढें आली. तिनें आपला पुत्र आणून त्याच्या पायांवर घातला आणि आनंदानें सर्व वर्तमान सांगितलें. "स्वामींनीं ऐन प्रसंगीं कृष्णाबाईस पाठवून माझें रक्षण केलें," असें जेव्हां शेवटीं ती बोलली, तेव्हां चांगदेवानें तिला—"आतां ती कृष्णाबाई कोठें आहे?" असें विचारलें. तेव्हां तिनें सांगितलें:—"आपण मंदिरांत आलां, तेव्हां ती बाई बाहेर उभी होती." हे शब्द जेव्हां त्यानें ऐकिले तेव्हां तो आपल्या मनांत भगवंताचें लाघव समजला आणि आपल्या मनांत म्हणूं लागला:—"आमच्यासाठीं भगवंतास कष्ट करावे लागले हें कांहीं चांगलें झालें नाहीं. आह्मीं जर यादवरावास बरोबर घेतलें नसतें, तर भगवंताला असे कष्ट कशाला करावे लागले असते?" असो!

नंतर चांगदेव मातेसहित त्या तान्ह्या बालकास बरोबर घेऊन परत द्वारकेस आला आणि देवालयांत जाऊन व भगवंताचें दर्शन घेऊन त्यास म्हणाला:—"देवा, तुझी कृति व गति फार विचित्र आहे. अनाथबंधु हें तुझें नांव माझ्या प्रत्ययास पूर्ण आलें." असें बोलून त्यानें भगवंताचें पूजन केलें व यादवरावास बोलावून त्याची स्त्री व पुत्र त्यास भेटविला. "पुनः कधींही हिचा त्याग करूं नको," असें त्याला निक्षून सांगतांच त्यानें तें मान्य केलें. "या तुझ्या पुत्राच्या वंशांत कुलदीपक भगवद्भक्त संतति उत्पन्न होईल," असा चांगदेवानें वर देतांच यादवरावास अतिशय संतोष वाटला. नंतर चार मास द्वारकेंत राहून, देवाचा निरोप घेऊन चांगदेव परिवारासह परतले ते गोदातीरीं पुण्यस्तंभास येऊन आपल्या इष्टमित्रादिकांस भेटले, तेव्हां त्यांसही संतोष वाटला. चांगदेव द्वारकेहून परत आल्यावर चोहों

मुलखीं त्यांची कीर्ति विख्यात झाली आणि सर्व लोक मनापासून त्याची स्तुति करूं लागले.

चांगकेशवदास द्वारकेची यात्रा करून परत आल्यावर सात दिवसांनीं त्यास पंढरपुराकडील विपरीत वर्तमान कळलें. तें असें कीं, "बेदरच्या यवन बादशहानें पंढरीक्षेत्रांत येऊन तें सर्व क्षेत्र लुटलें, ब्राह्मणांचा अतिशय छळ केला, व हिंदुधर्माचा उच्छेद करावा अशा हेतूनें भगवद्भक्त वैष्णवांस तो माळ घालूं देत नाहीं. कोणी भजन कीर्तन करील तर त्यास घोर दंड व यातना करीत आहे. बडव्यांनीं सामपत्र लिहून देऊन श्रीपांडुरंगाची मूर्ति तळघरांत आच्छादन करून लपवून ठेविली आहे. कोणी त्या देवाचें नांवही घेत नाहीं. त्या यवन भूपतीनें देवाचें महा मंदीर बाटवून मोडून त्याची मशीद केली आहे. अब्रूदार, सज्जन व भलेभले लोक यवनांच्या भयानें पंढरीक्षेत्र सोडून पळून गेले आहेत. या गोष्टीला आज सात महिने होऊन गेले आहेत." याप्रमाणें वर्तमान ऐकतां क्षणीं चांगदेवाच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला. अंगावर रोमांच उभे राहिले आणि कंठ दाटून आल्याकारणानें मुखांतून शब्द बाहेर उमटेना. तेव्हां तो आपल्या मनांत म्हणाला :–"कलीच्या भयानें भगवान् रुक्मिणीकांत भय पावला व तळघरांत जाऊन लपून बसला आहे. पण 'दर्शन मात्रेंकरून जड मूढ जनांचा उद्धार करीन,' असा जो त्यानें पुंडलिकास वर दिला आहे तो असत्य होणार कीं काय?" असें मनांत आणून तो पुनः म्हणाला :–"हे करुणाकरा, महाप्रतापा, धीर गंभीरा रुक्मिणीकांता, तुझी सत्कीर्ति माझ्या स्मरणांत चांगल्या प्रकारानें आहे. इंद्रादि सुरगण, ब्रह्मा, शिव इत्यादिकांस शंखासुरानें जर्जर केलें असतां, त्वां मच्छ–रूप धरून वेदोद्धार केला आणि त्या दुर्वृत्त शंखाचा वध केलास, त्याचप्रमाणें कच्छप–रूपानें पृष्ठभागीं मंदराचल धारण करून चतुर्दश रत्नांच्या लाभानें विबुध गणांला संतोष उत्पन्न केलास. हिरण्याक्ष पृथ्वीची घडी करून नेत असतां वराह–वेष धारण करून दंष्ट्राग्रीं पृथ्वी धारण केलीस व त्या

खलाचा वध केलास. महा भक्त प्ऱ्हाद यास हिरण्यकश्यपानें छळितांच, त्या भक्तवचनास्तव नृसिंह–रूपानें स्तंभांतून प्रगट झालास व हिरण्यकश्यपास विदारण करून टाकलेंस. इंद्राच्या संतोषास्तव बटु वामन होऊन बलीस पाताळीं घातलेंस. सहस्रार्जुनानें रेणुकेला छळिलें असें ऐकतांच, हातांत परशु धारण करून त्या सहस्रार्जुनाचा निःपात केलास आणि एकवीस वेळ पृथ्वी निःक्षत्रिय करून ब्राह्मणांस दान दिलीस. रामावतार घेऊन रावणाचा वध केलास; सीतेसह देवतांस बंदींतून सोडविलेंस व महाभक्त जो बिभीषण, त्यास चिरंजीव करून लंकाधिपत्य दिलेंस. वसुदेव देवकी कंसाच्या बंदिशाळेंत असतां, तेथें श्रीकृष्णावतार धारण करून गोकुळांत नंदसदनीं जाऊन बालक्रीडा करीत असतां सहज लीलेनें अघ, बक, केशी इत्यादिकांचा वध करून, शेवटीं कंस चाणूरादिकांसही देहांत दंड करून मुक्त केलेंस. पुढें द्वारकेंत आल्यावर पांडवपालन व भूभार हरण करून तिला सुखी केलेंस. या प्रकारचा तुझा पराक्रम वेद, शास्त्रें व पुराणें वर्णन करीत असतां यावेळीं तो कां प्रत्ययास येत नाहीं? या भूमंडलावर तुझ्याशिवाय आमचा त्राता तरी कोणता योजून ठेवला आहेस? देवा, आतां या दासानुदासाचा विशेष अंत न पाहतां एकवेळ धांवत येऊन सर्व शंका निवारण कर." याप्रमाणें भगवंताचा धांवा करितांच, तो अनाद्यनंत भगवान् त्याच्या ध्यानांत प्रगट झाला व प्रथम त्यानें त्यास अभय देऊन शोक निवृत्त केलें आणि मग सांगितलें:–" हे महा भक्ता चांगाकेशवदासा, खरोखर पाहतां मी अचल, अढळ व अविनाश असतां तुमच्यासारख्या प्रेमळ भक्तांच्या इच्छेस्तव साकार व सगुण रूप धारण करितों. माझ्या इच्छेनें क्षणांत मी अनंत रूपें धारण करीत असतों व जें कधीं कोणाच्या कल्पनेंतही येणार नाहीं तें केवळ अद्भुत कर्म करण्याची शक्ति सदोदित बाळगून राहतों. असा हा प्रकार जर सत्य आहे, तर त्या बापड्या यवनांनीं माझें काय करावयाचें आहे बरें? तूं क्षणभर विचार करून पहा, म्हणजे मी म्हणतों हें तुझ्याही ध्यानांत येईल. व्यर्थ खंति करीत

बसूं नको. कृत, त्रेत व द्वापार यांत मीं मोठमोठे पराक्रम केले आणि कलिप्रवृत्ति होतांच, बौद्धरूप धारण करून माझे पराक्रम माझ्या सर्व भक्तांनीं करावे म्हणून राखून ठेविले आहेत. तुह्मीं जर कांहीं अघटित कृत्य करण्याचें मनांत आणलें, तर त्यास साह्य करणारा मी आहेंच. तर चिंताक्रांत होऊन न बसतां हें गोदातीर सोडून तूर्त बेदरास जा. तेथें जें अघटित चरित्र होईल तें सर्व लोक पाहतील व तुला यशप्राप्ति होईल." असें सांगून तो भगवान् त्या चांगाकेशवदासाच्या हृदयांतच गुप्त झाला व केशवदासानें विस्मितांतःकरण होऊन आपले नेत्र उघडले.

अविंधांनीं पंढरीनाथाचें देवालय मोडून त्याची तेथेंच मशीद केली आहे. तर त्या देवालयाचा जीर्णोद्धार करावा. असें मनांत आणून चांगदेवानें आपले सर्व शिष्यसांप्रदायी लोक जवळ बोलाविले आणि त्यांस तें सर्व वर्तमान कळविलें आणि "आतां वेळ न लावतां बेदरास चला, म्हणजे भगवंताच्या कृपाबलानें कांहीं तरी अद्भुत चमत्कार दृष्टीस पडेल," असें स्पष्ट सांगितलें. तेव्हां ते सज्जनवृंद विलंब न करितां प्रवासाची तयारी करून विठ्ठल–नाम घोषपूर्वक भजन करीत पुण्यस्तंभ क्षेत्राहून बेदराच्या मार्गानें निघाले.

चांगाकेशवदास महा सिद्ध योगी आहे, अशी कीर्ति याच्या आधींच लोकांत पसरली होती. तोच साधुजवळ आला आहे, असें ऐकतांच गांवोगांवचे लोक पूजासंभारासह उपायनें बरोबर घेऊन त्या भगवद्भक्त मंडळीस सामोरे येत असत. कित्येक शिधासामुग्री देऊन आपापले मानसिक हेतु पूर्ण करून घेत असत. याप्रमाणें आनंदेंकरून बेदराचा मार्ग क्रमण करीत असतां मार्गांत एक अद्भुत चमत्कार झाला.

एका गांवांत जंगम लोकांचा महंत आपल्या शिष्यसांप्रदायिकांसह रहात असे. तो नाना प्रकारचे साबरी मंत्र शिकून कपट विद्येंत निपुण झाला होता. त्याशिवाय त्याच्या गुरूनें त्याला एक आसन भारून दिलें होतें.

कोणी सत्पुरुष भेटीस आला असतां त्याला त्या जंगमांच्या महंतानें तें आसन बसावयास द्यावें. तो पुरुष त्या आसनावर बसला, म्हणजे त्या आसनानें एकाएकीं उसळी मारून त्या बसणारास उलथून पाडावें आणि या कपटी जंगमांच्या महंतानें शिष्यांसह खदखदां हसून त्या सत्पुरुषाचा उपमर्द करावा. याप्रमाणें त्यानें पुष्कळ लोकांचा छळ केल्याकारणानें भगवान् चंद्रमौळीस त्याचा कोप आला होता. म्हणूनच त्यानें चांगाकेशवदासास त्या मार्गानें जाण्याची बुद्धि दिली. असो. त्या जंगम महंताचें नांव मल्लिकार्जुन, महाशैव, ज्यानें कपट विद्याबलानें अनेक वैष्णवांचा व साधूंचा छळ केला होता; त्यानें एकाएकीं वर्तमान ऐकलें कीं, महा सिद्ध वैष्णव चांगाकेशवदास आपल्या शिष्यसांप्रदायिकांस बरोबर घेऊन बेदरास निघाला आहे व तो आपल्या गांवावरून जाणार आहे. कदाचित् आपल्या गांवांत त्याचा एखादा मुक्कामही होईल. याप्रमाणें साद्यंत वर्तमान ऐकतांच त्या जंगमाला अतिशय संताप आला. त्याच्या मठांत एक कुत्रा बाळगलेला होता, त्याचें नांव त्यानें मुद्दाम चांगदेव ठेविलें. असो. आमच्या चांगाकेशवदास नामक सिद्ध वैष्णवानें, त्या जंगमाच्या मनांतील सर्व विचार, त्याच्या गांवाजवळ येतांक्षणीं जाणले आणि मुद्दाम त्याच्या अभिमानाचें खंडण करावें म्हणून ते आपल्या सर्व शिष्यमंडळीसह त्या जंगमाचे घरीं आले. टाळ, विणे, मृदंग, इत्यादि वाद्य-गजरासह हरिनामघोष कानीं येतांच, त्या अघ्याच्या चित्तांत संताप उत्पन्न झाला. चांगदेव जवळ आले तरी साबरी मंत्र-बळानें फुगलेला तो जंगम त्याला नमस्कार करीना. तरीही दुर्जनास आदरानें मारावें, असें मनांत आणून चांगदेवानें आपण होऊन त्याला पहिल्यानें नमन केलें. तेव्हां त्या दुराचाऱ्यानें आपल्या हातानें त्यांस बसावयास तें भारलेलें आसन पुढें करून दिलें व "बसावें यावर" असें आपल्या मुखानें सांगितलें. पण चांगदेव तें सर्व कपट चांगल्या प्रकारानें जाणत होता, म्हणून त्यानें तें आसन पुढें येत आहे तों त्यावर विभूति फुंकली, तों असा चमत्कार झाला कीं, तें भुईवर

न पडतां वरच्यावर आधांत्रीं राहून धड धड धड जळूं लागलें. तो विपरीत प्रकार पाहतांच, तो जंगम दुःखव्याप्त होत्साता भुईवर गडबड लोळूं लागला व "या आसनाच्या संग्रहामुळें आजपर्यंत लोकांत महत्व संपादन करून राहिलों, आतां काय करावें? हें आसन जळून गेलें, तर आतां उदरनिर्वाह तरी कसा करावा?" असें बोलत विलाप करूं लागला. तरी 'चांगदेवाला शरण गेल्याशिवाय कांहीं व्यवस्था लागत नाहीं,' असें लौकरच त्याच्या ध्यानांत आलें व तो अत्यंत विनयानें त्यास म्हणाला :-" महाराज, हें माझें गुरु-प्रसादाचें आसन आहे; तर कृपा करून हें जाळून टाकूं नये." याप्रमाणें बोलत असतां तो जेव्हां अगदीं गर्वहत झाला असें चांगदेवानें पाहिलें, तेव्हां पुनः विभूति फुंकून तें आसन भूमीवर पाडलें आणि त्यास अग्नि लागला होता तोही नाहींसा केला.

नंतर तो अय्या चांगदेवास म्हणाला:-" महाराज, आतांचा वेळ येथें राहून माझा आश्रम पावन करण्यासाठीं येथें स्वयंपाक करावा आणि देवाला नैवेद्य समर्पण करून मग पुढें मार्गक्रमण करावें." असें ऐकतांच चांगदेवानें पुढील कर्तव्यार्थ जाणून तें कबूल केलें. तेव्हां जंगमानें आपल्या शिष्यांस आज्ञा करून शिष्यसांप्रदायिकांसह चांगदेवास शिधा साहित्य देवविलें. त्यानें ज्या कुत्र्याचें नांव मुद्दाम चांगदेव ठेविलें होतें त्यास शिष्यांकडून एका तळघरांत नेऊन कोंडून ठेवविलें. असो. "आपणही आमच्या बरोबर नैवेद्य समर्पण करण्याची तयारी करावी." असें चांगदेवानें अय्याला सांगितलें असतां त्यानेंही तें कबूल केलें. दोहींकडील पाकसिद्धि होतांच आचाऱ्यांनीं पानें वाढण्याची व्यवस्था केली. चांगदेवानें वैश्वदेव करून नैवेद्य वाढण्याची आज्ञा केली. चांगदेवाच्या पंक्तीस हजारों यात्रेकरी आणि त्या अय्याचे पंक्तीसही हजार पांचशें जंगम बसणारे होते. पंक्ति बसल्यावर व चांगदेवानें देवास नैवेद्य समर्पण केल्यावर त्या अय्याला सांगितलें:-"अय्या, आमचा वैश्वदेव आणि नैवेद्य-समर्पण-कर्म सर्व झालें आहे.

आतां आपण दंडांतील महादेव सोडून पूजा करावी आणि त्याला नैवेद्य समर्पण करावा, ह्मणजे सर्वांस भोजनास आरंभ करण्यास ठीक पडेल." असें ऐकतांच "ठीक आहे" असें बोलून तो अय्या व त्याचे शिष्य आपापल्या दंडांतील फडकीं सोडून पाहतात तों त्यांतून एकाच्याही दंडांत शिवलिंग नाहीं. तो प्रकार पाहतांच त्या जंगममंडळीला आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्या आपल्या मल्लिकार्जुन गुरूजवळ येऊन त्याला तें सर्व वर्तमान कळविलें. "आम्हांवर कोप करून कैलासनाथ गुप्त झाला," असें जो तो म्हणूं लागला. हजारों जंगमांपैकीं एकाच्याही दंडांतील शिवलिंग जाग्यावर नाहीं, हा प्रकार आहे तरी काय? असें ते जंगम आपल्या गुरूस विचारूं लागले. तेव्हां तो त्यांस म्हणाला:—"तुमच्यापासून शिव गेला असतां तुह्मीं जीव कसा ठेविलात?" असें ऐकून एक जंगम त्या अय्यास म्हणाला:—"गुरुमहाराज, आधीं आपण आपला दंड सोडून आपलें तरी शिवलिंग जागच्याजागीं आहे कीं नाहीं हें पहा आणि मग आम्हांला प्रायश्चित्त घेण्याची आज्ञा करा." असें ऐकतांच त्यानें "माझ्या दंडांतील शिवलिंग नाहींसें होणार नाहीं," असें मोठ्या गर्वानें म्हणत आपला दंड बांधलेला होता तो सोडला, तेव्हां त्याचेंही शिवलिंग नाहींसें झालें आहे, असें त्याला कळलें आणि त्यामुळें फारच वाईट वाटलें. असा प्रकार झाल्यावर त्यानें चांगदेवाजवळ येऊन त्याला विनयानें असें सांगितलें:—"महाराज, आपण आपल्या मंडळीसह आनंदानें भोजन करावें. भगवान् पार्वतीरमण आमच्यावर क्रुद्ध होऊन आमचा सर्वांचा त्याग करून गेला आहे. त्याचा शोध केल्यावांचून आम्हांस अन्न ग्रहण करितां येत नाहीं, हें आमचें लिंगाइतांचें व्रत आपणांस विदित आहेच." असें ऐकतांच चांगदेव त्यास ह्मणाले:—"तुमच्या नित्यकृत्यांत कांहीं तरी अंतर पडलें असावें, ह्मणून तो शूळपाणी कोपला व गुप्त झाला असावा. मठांतील कोणी जीवजंतु उपोषित टेऊं नये. याबद्दल तुमची चौकशी असली पाहिजे. चांगाकुत्रा जो नित्य तुमच्या दारांत बसत असे, त्याला आज तुम्हीं तळघरांत कां

लपविलें आहे वरें? तोच चोर आहे, त्यानेंच तुमचीं सर्वांचीं शिवलिंगें गिळून टाकलीं असावीं असें वाटतें. यासाठीं त्याला तेथून सोडून या ठिकाणीं घेऊन या, ह्मणजे सर्वांच्या लिंगांचा शोध लागेल. कारण हें सर्व जग लिंगरूपच आहे." असें ऐकतांच "हा साधु अंतर्साक्ष आहे," असें ते सर्व जंगम आपल्याशीं म्हणू लागले. असो. त्यांनीं तळघरांतून तो चांगाश्वान सोडून तेथें आणला. तेव्हां चांगदेव त्याच्या समोर जाऊन त्यास म्हणाले:—"अरे, शिष्यांसहित हा महंत शिवलिंगाविरहित झाला आहे. यांचीं लिंगें गिळण्यांत तुला लाभ काय आहे वरें? तर तीं सर्व यांचीं यांना देऊन टाक." असें ऐकतांच तो कुत्रा तोंड वर करून भडाभड सर्व शिवलिंगें ओकूं लागला. तेव्हां आश्चर्यचकित होऊन सर्वांनीं आपापलीं लिंगें ओळखून घेतलीं. ते सर्व जंगम लज्जित होत्साते चांगदेवास शरण गेले आणि "आज आमचे सर्वांचे गर्व छेदन केलेस," असें त्यास ह्मणूं लागले. असो. सर्वांनीं आपापल्या नियमाप्रमाणें पूजा केली आणि पात्रें वाढून तयार होतीं, त्यांवर बसून देवास नैवेद्य समर्पण करून सर्व भोजनास बसले. सर्वांचीं भोजनें झाल्यावर कर व मुखशुद्धि उपरांत त्या जंगमाच्या महंतानें त्या सर्व मंडळीची पूजा केली. नंतर चांगदेवानें त्यास "सर्वांभूतीं समान वृत्तीनें वागावें. कोणाचाही छळ किंवा उपमर्द करूं नये," असा उपदेश करून त्याचा निरोप घेतला आणि यवनभूपतीचा गर्व खंडन करण्यासाठीं वेदरास जाण्याचा मार्ग धरून वैष्णव मंडळीसह तो महा भक्त चांगदेव विठ्ठलनामघोष करीत तेथून निघाला.

नंतर सर्वांसह आनंदानें मार्गक्रमण करीत एके दिवशीं दोन प्रहरच्या वेळीं चांगदेव शिष्यमंडळीसह वेदरास आला. तेथें येतांच एका सरोवरावर उतरून सर्वांनीं स्नानसंध्यादिक नित्य कर्मे करून थोडथोडा उपहार केला आणि मग आनंदानें त्यांनीं भजन व कीर्तन करण्यास आरंभ केला. दिंड्या व पताका उभ्या करून टाळ, मृदंग, वीणे, इत्यादिक वाद्यें वाजूं लागलीं

आणि भगवन्नामाचा घोष जेव्हां चालू झाला, तेव्हां तो प्रकार पाहण्यासाठीं व भजन ऐकण्यासाठीं वेदरांतील आबालवृद्ध सहस्रावधि लोक त्या भक्त-मंडळीच्या सभोंवतीं येऊन उभे राहिले. नादब्रह्मरस अपरंपार वाहूं लागल्या-मुळें सर्वांच्या चित्तवृत्ति उल्लसित होऊन राहिल्या. तों राजाश्रित जोशी परम भाविक वैष्णव होता, त्यास "शिष्यवर्गासह चांगदेव येऊन भजन करीत आहे" अशी बातमी समजली. तेव्हां त्यानेंही धांवत येऊन तेजःपुंज चांगा-केशवदास यास पाहतांच नमन केलें. नंतर एक प्रहर कीर्तन होत होतें, तोंपर्यंत तो जोशी स्वस्थ ऐकत बसला होता. कीर्तन समाप्तीची मंगलारती होऊन लोकांस खिरापत वाटल्यावर जेव्हां चांगदेव आनंदानें स्वस्थ बसले, तेव्हां तो राजाश्रित जोशी त्यांस म्हणाला:-"महाराज, मी विनंति करितों ती कृपा करून श्रवण करावी. या बेदर पट्टणांतील राजा, अविंध अति कुल-क्षण वेदधर्माचा द्वेष करणारा आहे. त्यानें धर्मोच्छेद व्हावा म्हणून कित्येक मोठमोठालीं देवालयें भ्रष्ट करून मोडलीं व तेथें मशिदी करून ठेवल्या आहेत. हरिकथा किंवा पुराणश्रवण करणारास तो अघोर दंड करीत असतो. पंढ-रींतील श्रीपांडुरंगाचें देवालय मोडून तेथेंही त्या दुर्मतीनें मशीद केली, त्याच्या-पुढें कोणाचाही कांहीं उपाय चालत नाहीं. निरुपाय जाणून पुजाऱ्यांनीं विठोबाची मूर्ति लपवून ठेविली आहे, हें आपणांस विदित असेलच; तर अशा त्या दुर्वृत्त चांडाळाच्या राज्यांत आपण शिष्यमंडळीसह आलां हें कांहीं उचित झालें नाहीं. हें वर्तमान त्या राजाला समजतांच तो विटंबना करील. यवनांच्या भयानें येथें कोणी मृदंग किंवा ढोल वाजवीत नाहींत. असें असतां तुमचें हें दंभ जर त्याच्या दृष्टीस पडलें, तर त्याच्या संतापास पारावार उरणार नाही. तुम्हीं या शहराजवळ आलेत तेव्हांच तुम्हांला अटकाव झाला असता; पण हल्लीं त्या यवनभूपतीस एक दुःख झालें आहे. त्यामुळें अजून तुमच्याकडे त्यांपैकीं कोणाचें लक्ष्य पोंचलें नाहीं." असें ऐकतांच चांग-देवानें त्या जोशाला विचारलें:-"त्या अविंध नृपतीस असें काय दुःख उत्पन्न

झालें आहे, तें आम्हांला तरी सांगा, म्हणजे त्या संबंधानें सुचल्यास कांहीं विचार करूं." जोशी म्हणाला:–"बादशहाची एक आवडती स्त्री होती, तिला एके दिवशीं अकस्मात् सर्पदंश झाला. तेव्हां पुष्कळ मांत्रिक धन्वंतरी इत्यादिक बोलावून आणून त्यांजकडून अनेक उपाय करविले. पण कोणत्याही उपायानें गुण दृष्टीस न पडतां तिचा प्राण गेला. तेव्हां निरुपाय झाल्यावर व तिचें तें प्रेत चेतनारहित होऊन पडल्यावर तिचें पोट चिरलें आणि त्यांत सुगंधि द्रव्यें भरून अद्याप तें प्रेत जसेंच्या तसें ठेविलें आहे. तरी उद्यां तें प्रेत मेण्यांत घालून तिला करबल्यास पाठविण्याचा विचार आहे व त्यामुळें बादशहा अत्यंत दुःखी व चिंतातुर होऊन बसलेला आहे." याप्रमाणें त्या जोशानें सांगितलें असतां चांगदेव त्यास म्हणाले:–"असें आहे तर तुम्ही आतांच त्या यवनभूपतीकडे जाऊन त्यास असें सांगावें कीं, आमच्या धर्मांतील एक फकीर आपल्या मंडळीसह येथें तुमच्या राज्यांत आलेला आहे, तो राणीचें जें प्रेत पडलें आहे, तें पुनः सजीव करून देईल. मात्र तो सांगेल त्याप्रमाणें तुम्ही त्याचें ऐकिलें पाहिजे. अहो जोशीबुवा, श्रीपांडुरंगानें कृपा करून स्वतः आपल्या मुखानें मला संजीवनी मंत्र सांगितला आहे, त्याचा आज सर्वांसमक्ष अनुभव आणून देतों. जा, चिंता करूं नका." असें ऐकतांच तो जोशी अत्यानंदानें बादशहाकडे धांवत गेला आणि त्यानें चांगदेवाची प्रशंसा करून त्यानें जसें सांगितलें होतें, तसेंच त्या बादशहाजवळ सांगितलें. तें ऐकतांच त्या यवन नरपतीस अतिशय आनंद झाला आणि तो जोशास म्हणाला:–"असें आहे तर त्याला लौकर आमच्याजवळ घेऊन या. त्यानें जर आमच्या बिबीला जिवंत करून उठविलें, तर तो जें मागेल तें देऊन त्याला संतोषित करूं. त्यांत तिळमात्र अंतर पडणार नाहीं." असें ऐकतांच जोशानें चांगदेवाजवळ येऊन तें वर्तमान त्याला सांगितलें आणि शिष्यमंडळीसह तो त्यास आपल्या बादशहाकडे घेऊन गेला.

बादशहानें चांगदेवास पाहतांच त्याचा चांगला सन्मान केला. तरी "हा हिंदु फकीर आहे," असें मनांत आणून त्यास नमस्कार केला नाहीं. त्याशिवाय "याचें हें दांभिक ढोंग फार मोठें दिसत आहे. हा माझ्या स्त्रीचें पडलेलें निर्जीव प्रेत कसें उठवील तें कांहीं कळत नाहीं," असेंही त्यानें मनांत आणलें. पण तें चांगदेवास कोणी न सांगतां अक्षरशः समजलें. "हा दुर्मति यवन अहंकारानें उन्मत्त होऊन नमन करीत नाहीं, तर याचा अहंकार समूळ नाहींसा होऊन हा आपेंआप सर्वत्र नम्रपणा धारण करील, अशी व्यवस्था केली पाहिजे," असें चांगदेवानें मनांत आणलें आणि आधांत्रीं आकाशाकडे हात करून त्यानें मूठभर विभूति त्या हातांत उत्पन्न केली आणि सर्व मंडळीच्या कपाळीं थोडथोडी लावून बाकीची चोहोंकडे उधळली, तों असा चमत्कार झाला कीं, चांगदेवाचें रूप बदललें आहे असें तेथें बसलेल्या यवनमंडळीस वाटूं लागलें. तेथें जे भाविक हिंदु होते, त्यांस चांगदेव महाभक्त वैष्णव दिसत होते व ते त्यांस पूज्य मानीतच होते. पण जे मोठमोठाले मुसलमान सरदार व मानकरी बसले होते, त्या सर्वांस चांगदेव पीर पैगंबराप्रमाणें दिसूं लागले. तेव्हां 'हें आपलें कुलदैवत होय' असें मनांत आणून बादशहासह सर्व यवन त्यांस लोटांगण घालूं लागले. सर्वांच्या मनांतील अहंकार नाहींसा झाला.

नंतर चांगदेव बादशहास म्हणाले :–"तुझा सद्भाव पाहून मी तुला प्रसन्न झालों आहें; तर तुझ्या मनांत जी इच्छा असेल ती मजपासून पूर्ण करून घे." असें त्या योगेश्वरानें सांगतांच तो बादशहा त्यास हात जोडून म्हणाला :– "महाराज, सर्पदंश झाल्यामुळें माझी स्त्री मरण पावली आहे, तर कृपा करून तिला जिवंत करावें, अशी या दीनाची प्रार्थना आहे." असें ऐकतांच चांगदेवास पंढरीनाथानें जो संजीवनी मंत्र सांगितला होता, त्यानें विभूति अभिमंत्रण करून चांगदेवानें बादशहास दिली आणि "ही त्या प्रेताचे कपाळीं लावून सर्वांगास चर्चन कर आणि काय चमत्कार होईल तो पहा," असें

सांगितलें. तें ऐकतांच बादशहा स्वतः ती विभूति हातांत घेऊन अंतःपुरांत गेला आणि त्यानें आपल्या हातानें आपल्या त्या स्त्रीच्या कपाळीं लावून सर्वांगास चोळली; त्याबरोबर झोंपेंतून जागृत झाल्याप्रमाणें तें प्रेत खडबडून उठून बसलें. पण भ्रमिष्ट, नीट बोलेना! त्यामुळें जरी ती जिवंत झाल्याबद्दल बादशहास आनंद झाला होता, तरी ती भ्रमांत असल्याकारणानें त्याला वाईट वाटूं लागलें; ह्मणून त्यानें पुनः चांगदेवाजवळ येऊन त्याला तें वर्तमान सांगितलें. तेव्हां त्यानें पुनः त्याला सांगितलें कीं, "आणखी एक वेळ तिजपाशीं जा आणि 'तुझी जी इच्छा असेल ती सांग; ती मी सर्व परिपूर्ण करीन,' असें म्हण आणि ती सांगेल त्याप्रमाणें कर म्हणजे ती पूर्ण शुद्धींत येईल व तुला आनंदित करील." असें ऐकतांच तो पुनः मंदिरांत गेला आणि चांगदेवानें जसें सांगितलें होतें, तसेंच त्यानें आपल्या त्या प्रिय स्त्रीस विचारलें. तेव्हां तिनें पूर्ण सावधान वृत्तीनें त्याला सांगितलें:—"खुदावंत, ज्या हिंदु फकिरानें माझे देहाला सोडून गेलेले प्राण पुनः परतविले, त्यास अनन्यभावें शरण जा आणि तो सांगेल त्याप्रमाणें त्याची इच्छा पूर्ण कर म्हणजे मी जिवंत राहीन." असें ऐकतांच बादशहानें तो सांगेल त्याप्रमाणें वागण्याबद्दल तिला वचन दिलें आणि पुनः चांगदेवाजवळ येऊन शुद्ध भावनेनें त्यास नमस्कार केला आणि आनंदानें सांगितलें:—"महाराज, आपल्या कृपेनें माझी स्त्री आतां चांगली सावध झाली आहे. तर जें आपल्या मनांत असेल तें मला सांगावें आणि मजकडून माझ्या शक्तीप्रमाणें सेवा करून घ्यावी, अशी माझी विज्ञापना आहे. आपण केवळ ईश्वरी अंश आहां हें मला पूर्णपणें कळून आलें आहे. तर मनांत संकोच न धरितां जें वाटेल तें सांगावें." असें बोलून बादशहानें चांगदेवाच्यापुढें सोनें, चांदी, हिरे, मोत्यें, पाच, पुष्कराज, नील, गोमेद इत्यादि रत्नांच्या राशी करून ठेवल्या आणि "हें सर्व आपणांस अर्पण केलें आहे. याशिवाय जें मनांत असेल तें सांगावें," असें मोठ्या नम्रतेनें हात जोडून सांगितलें. तेव्हां त्या द्रव्य व रत्नराशींकडे पाहून व हास्यवदन करून

चांगदेवानें त्याला सांगितलें:-" राजा, आम्ही निरपेक्ष वैष्णव सुवर्ण व मृत्तिका सारख्या मोलाची मानीत असतों. ईश्वरकृपेनें आम्हांस सर्व सिद्धि अनुकूल असल्यामुळें आम्हांस कोणत्याही गोष्टीची न्यूनता पडत नाहीं. आतां मनांत असेल तें सांगावें अशी इच्छा दर्शवितोस, ह्मणून सांगतों कीं, पुरातन क्षेत्र जें पंढरपूर, त्या क्षेत्रांत प्रत्यक्ष भगवान् इंदिरारमण भक्तोद्धारास्तव वास करीत आहे. तेथील बडवे त्याचे मुजावर (पुजारी) आहेत. त्यांचा त्वां नानाप्रकारें छळ केलास, देवाला स्थानभ्रष्ट करून त्याच्या पवित्र स्थानावर मशीद बांधलीस आणि हिंदु किंवा वैदिक धर्माचा उच्छेद करण्याचें मनांत आणलेंस, हें कांहीं योग्य केलें नाहींस. यासाठीं प्रथम आपल्या पंढरपुरांतील ठाणेदारास हुकूम लिहून पाठीव कीं, जें पंढरीनाथाचें देवालय मोडून मशीद केली आहे, तें शिखर पुन: पहिल्याप्रमाणें बांधवून बडव्यांस अभय देऊन त्यांत पंढरीनाथाची स्थापना करवावी आणि पुन: यवनांनीं पंढरीक्षेत्रास उपद्रव करूं नये. असा बंदोबस्त करून आपल्या शिक्क्यामोर्तबासह तो हुकूम माझ्या हवालीं कर." असें ऐकतांच बादशहानें चांगदेवाच्या आज्ञेप्रमाणें आपल्या पंढरपूरच्या ठाणेदारास हुकूम लिहून तो सहीशिक्क्यानिशीं चांगदेवाच्या हवालीं केला आणि पुन: देवाचें शिखर रचण्यासाठीं चारशें कामदार त्याच्या बरोबर देऊन त्यांची पंढरीस रवानगी केली. तेव्हां चांगदेवानें सर्वांच्या कपाळीं विभूति लावून त्या सर्वांस दोन प्रहराच्या आंत पंढरपुरास आणलें. चांगदेव पुन: मशीद मोडून देवालय करण्याचा व त्यांत देवाची स्थापना करण्याचा बादशाही परवाना घेऊन आला आहे. हें वर्तमान क्षेत्रांत चोहोंकडे प्रसिद्ध होतांच, चिंतातुर असलेल्या क्षेत्रवासी ब्राह्मणांस व पुजाऱ्यांस आनंद झाला व ते मोठ्या संतोषानें चांगदेवाची भेट घेण्यासाठीं येऊं लागले.

नंतर बेदराहून चारशें कामदार आणले होते, त्यांसह दोन हजार माणसें कामावर लावून, प्रत्येक मनुष्यास मूठभर होन रोज मजुरी देऊन, चांगदेवानें एका वर्षांत मशीद मोडून यंत्राकार पंढरीनाथाचें देवालय तयार करविलें

आणि सुमुहूर्त पाहून कार्तिकी दशमीच्या दिवशीं त्या देवाधिदेवास तळघरां-तून बाहेर आणून मोठ्या समारंभानें सिंहासनावर बसविलें. तो आनंदो-त्साह किती म्हणून वर्णन करावा? सर्व भाविक भक्तमंडळी आनंदानें जयजय-कार करीत आहे, अशा आनंदगजरांत देवाची महापूजा करून त्यास वस्त्रें व अलंकार लेववीले, तेव्हां सर्वांस अतिशय आनंद झाला आणि जो तो चांगदेवाचें सुयश वर्णन करून 'धन्य धन्य चांगाकेशवदास' असें म्हणूं लागला. पंढरीनाथास सिंहासनारूढ करीत असतां टाळ, विणे व मृदंगनादामुळें आकाश नादित होऊन राहिलें. विमानचारी सुरगण आनंदानें पुष्पवर्षाव करूं लागले. ब्राह्मण वेदघोष करूं लागले व सर्वत्र आनंद झालेला सर्वांच्या अनुभवास येऊं लागला. सत्यभामा, राही, रखुमाई, इत्यादिकांचेंही पूजन करून चांगदेवानें देवस्थापनेच्या सांगतेस्तव ब्राह्मणसंतर्पण करून त्यांस विडे व दक्षिणा देऊन तृप्त केलें. सायंकाळीं क्षेत्रांतील सुवासिनींनीं देवालयांत हळदीकुंकुमाचा थाट करून आपला महदानंद सर्वांच्या प्रत्ययास आणला. या प्रकारेंकरून पंढरीनाथाच्या देवालयाचा जीर्णोद्धार करून चांगदेवानें भगवंतास पुनः आणून सिंहासनावर बसविल्यानंतर "आतां फार दिवस या मृत्यु-लोकांत न राहतां समाधि घेऊन मुक्त व्हावें हें चांगलें," असें मनांत आणलें.

नंतर एके दिवशीं राउळांत जाऊन त्यानें भगवंतास नमस्कार केला आणि "देवा, मला समाधिस्थ होण्यास कोणतें स्थळ निश्चित केलें आहेस तें सांग." असें विचारलें. तेव्हां भगवंतानें त्याला सांगितलें :—"गोदातीरीं पुण्यस्तंभ-क्षेत्रच तुला समाधिस्थ होण्यास योग्य आहे. प्रतिवर्षी आषाढ शुद्ध एकाद-शीस मी तेथें येत जाईन. त्वां आपल्या वंशजास कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरीस येण्याची पद्धति लावून ठेवावीस. आषाढी दशमीस जे गोदातीरीं पुण्यस्तंभक्षेत्रीं जातील त्यांस पंढरी केल्याचें श्रेय येईल, असा माझा आशी-र्वाद आहे." याप्रमाणें भगवंतानें वर देतांच चांगदेवाच्या मनाला संतोष वाटला.

नंतर दोन शिष्यांस हाक मारून चांगदेवानें त्यांजकडून कीर्तन करविलें. वरदपुत्र भातलवंड्या यास बोलावून "प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीचे दिवशीं अन्नशांति करावी," अशी आज्ञा केली. तें व्रत त्याच्या वंशिकांत अद्याप चालत आहे. त्या भातलवंड्याचे वंशज जोगाईच्या अंब्यांत रहात असतात. असो. देवालयाच्या सभोंवती ओंवऱ्या तयार होत तोंपर्यंत चांगदेव पंढरीसच राहिला होता. त्या ओंवऱ्या तयार झाल्यावर भगवंताची आज्ञा व निरोप घेऊन चांगदेव तेथून निघाला तो सद्गदांतःकरणानें पंढरी व पंढरीनाथ यांचें स्मरण करीत पुण्यस्तंभास आला. त्याला समाधि देण्यासाठीं पुण्यस्तंभास येण्याचें भगवंतानें त्याच्या इच्छेस्तव कबूल केलें. पुण्यस्तंभास येतांच मठांत जाऊन त्यानें केशवराजास नमस्कार केला. चांगदेव परत आला हें पाहतांच पुण्यस्तंभनिवासी आबालवृद्ध आनंदित झाले.

चांगदेवास केशव आणि विठोबा या नांवांचे दोन पुत्र होते. त्यांतील वडील जो केशव, त्यास त्यानें एके दिवशीं जवळ बोलावून त्यास उपदेश केला. भगवंतानें जो षडक्षरी मंत्र सांगितला होता तो त्याला सांगून "आम्हीं समाधिस्थ झाल्यावर त्वां विठोबास मंत्रोपदेश करावा," असें त्याला सांगून ठेवलें आणि सर्व उपासनापद्धतीही त्याला शिकविली. त्याचप्रमाणें "प्रतिवार्षिक कार्तिकीस पंढरीची वारी करीत असावें," असेंही त्याला सांगून ठेवलें. याप्रकारें पुत्रास बोध करून त्यानें आपल्या समाधीचा दिवस शके बाराशें सत्तेचाळीस, क्रोधन संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध सप्तमी, भानुवार, पुष्य नक्षत्र व सिद्धियोग हा नेमला. त्या दिवशीं केशवराजाची षोडशोपचार पूजा करून प्रीतीनें त्याला नमस्कार करून व त्याची आज्ञा घेऊन तो योगेश्वर चांगा- केशवदास आनंदानें ग्रामवासी भक्तमंडळीसह भजन करीत समाधींत बसण्यासाठीं निघाला.

तो महायोगी केशवदास चांगा समाधि घेणार असें ऐकतांच, चोहोंकडून सहस्रावधि यात्रेकरी त्याच्या दर्शनास आले होते. त्या सर्वांसह सोमती-

र्थावर जाऊन त्यानें स्नान केलें आणि सोमेश्वराचें पूजन करून 'जनीं जनार्दनच भरला आहे, त्या विरहित रिक्त स्थल मुळींच नाहीं,' असा निश्चय ज्याच्या मनांत बाणला आहे, असा तो केशवदास अश्वत्थ वृक्षाखालीं पद्मासन घालून बसला आणि श्रीपांडुरंग मूर्तीचें हृदयांत चिंतन करितांच ती सगुण व साकार मूर्ति प्रगट झालेली पाहतांच, मानसपूजेनें त्या वैकुंठपतीला संतोषित केल्यावर आत्मा ब्रह्मांडीं नेऊन तो स्वदेहास विसरला. तेव्हां सर्व वैष्णव नामघोषपूर्वक जयजयकार करूं लागले. सर्वांनीं कीर्तन करून भगवंतास ओंवाळिलें आणि शेवटचें समाधिपूजन करून चांगाकेशवदासाचें यश वर्णन करीत सर्व आपापल्या घरीं गेले. त्यानंतर त्या समाधीचें दर्शन घेण्यासाठीं नित्य सहस्रावधि यात्रा येऊं लागली आणि त्या सिद्ध पुरुषाच्या नांवाचें महिमानही उत्तरोत्तर विशेष वाढलें. प्रतिवर्षीं आषाढीस तेथें यात्रा भरूं लागली व नित्य भजन व हरिजागर होत राहिला. या प्रकारेंकरून चांगाकेशवदास समाधिस्थ झाल्यास बारा वर्षें पूर्ण भरून गेल्यावर एक अद्भुत चमत्कार सर्व लोकांच्या प्रत्ययास आला, तो असा:—

चांगदेवाच्या ज्येष्ठ पुत्राच्या मनांत त्याच्या कनिष्ठ पुत्राविषयीं द्वेष उत्पन्न झाला. 'जें महंतपणाचें महत्व तें मला एकट्यालाच असावें,' असें त्याच्या मनांत भरून राहिलें. "आम्ही समाधिस्थ झाल्यावर आपल्या कनिष्ठ बंधूस अनुग्रह दे" असें जें वडिलांनीं सांगितलें होतें, तें त्याच्या चित्तास आवडेना. बारा वर्षे होऊन गेल्यावर "मला उपदेश करावा" असें जरी विठोबा त्यास ह्मणूं लागला, तरी तो ऐकेना. "षडाक्षरी मंत्र घेण्याचा अधिकार तुझ्यांत अजून आला नाहीं. मी वडील बंधु गादीवर आहें, तोंपर्यंत तूं भाजीभाकर खाऊन आनंदानें रहा," असें तो त्याला सांगूं लागला. पण विठोबास तें रुचेना. तो फारच चिंतातुर झाला. त्यांत वडील बंधु त्याचा द्वेष करून त्यास वैऱ्याप्रमाणें लेखूं लागला, तेव्हां तर त्याला फारच वाईट वाटलें. काय उपाय करावा हेंही सुचेना. तेव्हां शेवटीं ज्या ठिकाणीं चांगदेव समाधिस्थ

होऊन बसले होते, त्या ठिकाणीं जाऊन आपल्या वडिलांच्या समाधीजवळ तो अन्नोदक वर्ज करून एक सारखा तीन दिवस अहोरात्र बसून राहिला. तेव्हां तिसऱ्या रात्रीं चांगदेवानें अकस्मात् प्रगट होऊन त्यास दर्शन दिलें. हातांत वेतस-कुंचा घेऊन तो योगेश्वर प्रगट झालेला जेव्हां त्यानें पाहिला, तेव्हां त्यास फारच संतोष वाटला. त्यानें जेव्हां त्या आपल्या पुत्रास "तुला जें पाहिजे असेल तें मागून घे," असें सांगितलें, तेव्हां त्यानें त्या प्रेमळ पित्याच्या चरणीं मस्तक ठेवून, "स्वामि, मजवर अनुग्रह करून मला कृतार्थ करावें," असें सांगितलें. तें ऐकतांच चांगदेवानें त्यास अभय देऊन सांगितलें:-"बाळा, तूं चिंता करूं नको. आपल्या घरीं जा. तुजवर अनुग्रह करून सर्व सांप्रदायपद्धति सांगून मग आह्मी पुनः समाधिस्थ होऊं." असें ऐकतांच विठोबा आनंदानें आपल्या घरीं आला. तरी त्यानें स्वस्थ न राहतां सूर्योदयाच्या सुमारास दिंड्या, पताका इत्यादि सर्व समारंभ जमविला.

नंतर दशमीचे दिवशीं त्या समारंभासह आनंदानें भजन करीत चांगदेवाच्या समाधीजवळ जों येतात, तों प्रत्यक्ष चांगदेव बसलेले सर्वांच्या दृष्टीस पडले. त्यामुळें सर्वांस अतिशय आश्चर्य वाटलें. चांगदेव पुनः प्रगट झाले, हें वर्तमान गांवांत प्रगट होतांच, सहस्रावधि लोक त्याच्या दर्शनास्तव धांवत आले. तों विठोबानें त्यांस सुखासनीं बसवून भजन करीत आनंदगजरानें मिरवत मिरवत घरीं आणलें. चांगदेवानें घरीं येतांच क्रोधानें वडील पुत्रास शाप दिला आणि सांगितलें :-"मूर्खा, माझी अवज्ञा करण्यास प्रवृत्त झालास, तर शाप देऊन तुझा मीच निर्वंश करीन." असें बोलून चांगदेवानें आपल्या धाकट्या पुत्रावर कृपा करून त्याला षडक्षरी मंत्राचा उपदेश केला आणि पुढील भविष्याविषयीं मनांत विचार करून तेंही त्याला सांगून ठेविलें. तें असें कीं, "बालका विठोबा, तुझ्या वंशपरंपरेनें भगवद्भक्त उत्पन्न होऊन ते आमचें हें व्रत चालवितील. सहा पुरुष होत तोंपर्यंत येथें अशीच यात्रा जमेल आणि अद्भुत महिमा वाढेल हें तूं आपल्या ध्यानांत ठेव. पुढें जो

सातवा पुरुष होईल तो अभक्त, केशवराजाचें पूजन करणार नाहीं. त्याचप्रमाणें यवनांच्या उपद्रवामुळें समाधि छिन्न भिन्न होऊन जाईल. लोकांतील भक्ति कमी होईल. कोणी यात्रेस येणार नाहीं. इतका प्रकार झाल्यावर मी पुनः जीर्णोद्धारार्थ तुझ्या वंशीं अवतार घेईन." याप्रमाणें भविष्यार्थ सांगून तो महायोगी चांगदेव पुनः समाधिस्थ झाला. हें कौतुक पाहून सर्व लोक आश्चर्य करूं लागले. असो. पुढें त्या विठोबास पुत्र झाला, त्याचें नांव त्यानें चांगदेव ठेविलें. त्यानें भक्तिमार्ग चांगला वाढविला. त्या चांगदेवाचा पुत्र पिलाजी गोसावी, त्याचा पुत्र नरहरि गोसावी, नरहरीचा जनार्दन, या सर्वांनीं आपापल्या वडिलांचें व्रत चालविलें. जनार्दनाचे उदरीं सात पुत्र झाले. त्यांत मुधोजी या नांवाचा जो होता, त्यास पांच पुत्र झाले व ते आपापला संसार करूं लागले. तरी त्या पांचांत जो ज्येष्ठ पुत्र गोपाळ, त्याचे वेळीं धर्मलोप झाला व चांगदेवानें जें भविष्य सांगितलें होतें तें प्रत्ययास आलें. मग आपल्या त्याच सद्वंशांत चांगदेवानें पुनः अवतार घेतला. तेव्हां त्याचें नांव कोनेरी ठेविलें. त्यानें भक्तीचा पुनः जीर्णोद्धार केला. चांगदेवाच्या समाधीचें स्थापन करून त्यानें अश्वत्थ वृक्ष लाविलें व समाधिस्थानीं वृंदावन बांधून मठही स्थापन केला. त्याचप्रमाणें आषाढीची यात्राही त्यानें पुनः चालू केली. तो कार्तिकीला पंढरीसही जाऊं लागला. महिपति भक्तलीलामृत ग्रंथकार म्हणतो:—"तो भक्तिज्ञान वैराग्याचा पुतळा मी आपल्या डोळ्यांनीं पाहिला आहे." असो. त्या कोनेरी गोसाव्याचा पुत्र शामजी गोसावी, त्यानें पदपदांतरयुक्त जें चांगदेवाचें चरित्र लिहून ठेविलें होतें, तें पाहूनच हें चरित्र भक्तलीलामृतांत लिहिलें आहे व त्यावरूनच हें गाथायुक्त चरित्र लिहिण्यांत आलें. हें त्या भगवंताच्या चरणीं अत्यंत लीनपणें अर्पण केलें आहे.

**श्रीकृष्णार्पणमस्तु.**

# पोतदारांची नीतिपर व मनोरंजक पुस्तकमाला.

| | रु. | आ. |
|---|---|---|
| **करुणराघव**—हें संस्कृत उत्तररामचरित्राच्या आधारानें कादंबरीच्या पद्धतीवर मराठींत लिहिलें आहे. पृष्ठें २६० ... | १ | ० |
| **ललितवत्सराज** ( पूर्वार्ध )—हें संस्कृत रत्नावली नाटिकेच्या आधारानें सदरप्रमाणें लिहिलें आहे. पृष्ठें १३० ... ... | ० | ८ |
| **ललितवत्सराज** ( उत्तरार्ध )—हें संस्कृत प्रियदर्शिका नाटिकेच्या आधारानें सदरप्रमाणें लिहिलें आहे. पृष्ठें १३० ... | ० | ८ |
| **चारुदत्त आणि वसंतसेना**—हें संस्कृत मृच्छकटिकाच्या आधारानें सदरप्रमाणें मराठींत लिहिलें आहे. पृष्ठें ३०० ... | १ | ० |
| **प्रणयिमाधव**—हें संस्कृत मालतीमाधवाचे आधारानें कादंबरीसारखें मराठींत लिहिलें आहे. पृष्ठें ३०० ... ... | १ | ० |
| **आर्यचाणक्य**—हें संस्कृत मुद्राराक्षस नाटकाच्या आधारानें सदरप्रमाणें मराठींत लिहिलें आहे. पृष्ठें ३०० ... ... | १ | ० |
| **विदग्धपुरूरवा**—हें संस्कृत विक्रमोर्वशीच्या आधारानें कादंबरीसारखें मराठींत लिहिलें आहे. पृष्ठें २०० ... ... | ० | १४ |
| **राजा अग्निमित्र**—हें संस्कृत मालविकाग्निमित्र नाटकाच्या आधारानें सदरप्रमाणें लिहिलें आहे. पृष्ठें २२० ... ... | १ | ० |
| **शिवदिग्विजय अथवा तरुण शिवाजी नाटक** ... ... | १ | ० |
| **सुंदरी आणि वसंतसेन**—भाग १ पृष्ठें ५० ... ... | ० | ४ |
| **सुंदरी आणि वसंतसेन** भाग २ पृष्ठें ८० ... ... | ० | ६ |
| **सुंदरी आणि वसंतसेन** भाग ३ पृष्ठें १४० ... ... | ० | १० |
| **सद्गुणीसगुणा** (स्त्रियांस वाचण्याजोगें.) पृष्ठें ६० ... ... | ० | ४ |
| **गोदावरी** अथवा **दुर्दैवी सून.** पृष्ठें १३० ... ... | ० | १२ |

| | रु. | आ. |
|---|---|---|
| **भुवनसुंदरी**—( नवीन कल्पित कादंबरी. ) पृष्ठें २७५ ... | १ | ० |
| **शहाणा गोविंदराव**—( एका सुखी कुटुंबाची हकीकत ) ... | ० | ३ |
| **संगीत ययातिनाटक**—किर्लोसकरांचे चालीवर ... ... | ० | ८ |
| **मनोहर नाटक**—पृष्ठें १८०. (दुःखपर्यवसायी) ... ... | ० | १२ |
| **सुंदराबाई** ( एक चटकदार लहानशी गोष्ट. ) ... ... | ० | १ |
| **चातुर्यरत्नावलि** भाग १, २, ३, ४, प्रत्येकाची ... ... | ० | ८॥ |

## ऐतिहासिक व शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| **राष्ट्रभाषा** ( सर्व हिंदुस्थानची एकभाषा करणें यावर निबंध. ) | ० | ३ |
| **वैद्यविज्ञान**—( वैद्यकीसंबंधीं नवीन पुस्तक ... ... | १ | ० |
| **बापू गोखले यांचें चरित्र**—३ री आवृत्ति ... ... | ० | १२ |
| **अन्न आणि पाणी**—अत्यंत उपयोगी पुस्तक ... ... | ० | ८ |
| **विद्येविषयीं चार शब्द** ( नवीन निबंध. ) ... ... | ० | १॥ |

## पूजा व सार्थकथा.

| | | |
|---|---|---|
| **सत्यनारायणपूजा** सटिप्पणी सार्थकथा च ... ... | ० | ४ |
| **वटसावित्रीपूजा** सटिप्पणी सार्थकथा च... ... ... | ० | ६ |
| **हरितालिकापूजा** सटिप्पणी सार्थकथा च... ... ... | ० | ४ |
| **सिद्धिविनायक ( गणेश ) पूजा** सटिप्पणी सार्थकथा च ... | ० | ५ |
| **ऋषिपंचमीपूजा** सटिप्पणी सार्थकथा च... ... ... | ० | ५ |
| **अनंतचतुर्दशीपूजा** सटिप्पणी सार्थकथा च ... ... | ० | ६ |
| **सत्यविनायकपूजा** सटिप्पणी सार्थकथा च ... ... | ० | ७ |

## किरकोळ धर्मसंबंधीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| **आरतीसंग्रह** ( आरती संख्या ३१० ) ... ... ... | ० | १२ |
| **कृष्णलीलामृत** प्राकृत ओंवीबद्ध श्रीधरकृत ... ... | ० | ४ |

| | | रु. | आ. |
|---|---|---|---|
| **एकादशीमाहात्म्य** ओंवीबद्ध अध्याय ३ ... ... | ... | ० | ३ |
| **रुद्राची पोथी** मोठें अक्षर ... ... ... | ... | ० | २ |
| **भूपाळ्यासंग्रह** ( एकंदर भूपाळ्यांची संख्या ८६ )... | ... | ० | २ |
| **बालहितोपदेशिका** सुधारलेली २ री आवृत्ति ... | ... | ० | ३॥ |
| **शब्दरूपावली** अव्यय व समासविचार एकत्र ... | ... | ० | १॥ |
| **शनिमाहात्म्य** मोठ्या सांच्याचें व जाड अक्षराचें ... | ... | ० | १॥ |

## ऋग्वेदी नित्यब्रह्मकर्म ( विषय ४० ).

या पुस्तकांत ऋग्वेदी ब्राह्मणांस नित्य उपयोगाचे व अति आवश्यकतेचे असे खालीं लिहिलेले ४० विषय घातले असून स्थळविशेषीं विशेष माहितीकरितां खालीं टिप्पणीरूपानें निर्णयसिंध्वादि अनेक ग्रंथांचीं वचनें दिलीं आहेत. विषय येणप्रमाणें :—१ प्रातःस्मरण. २ भूमिप्रार्थना. ३ पुरीषोत्सर्गविधि. ४ मूत्रोत्सर्गविधि. ५ आचमनविधि. ६ दंतधावनविधि. ७ सर्वसाधारणसंकल्प (देशकाल स्मरण इ०). ८ नद्यादिस्नानविधि. ९ उष्णोदकस्नानविधि. १० गौणस्नानप्रकार. ११ वस्त्रधारण. १२ भस्मधारणविधि. १३ प्रातःसंध्या. १४ आसनविधि. १५ लघुन्यास. १६ पुरुषसूक्त. १७ वैष्णवसूक्त. १८ पंचायतनदेवतास्थापनक्रम. १९ पूजनीयदेवतासंख्यानिर्णय. २० तुलसीग्रहणनिषिद्धदिन. २१ तुलसीग्रहणमंत्र. २२ देवपूजा. २३ रुद्र. २४ श्रीसूक्त. २५ गणपतिअथर्वशीर्ष. २६ सौरसूक्त. २७ तृचाकल्पनमस्कार. २८ द्वादशनमस्कार. २९ माध्यान्हसंध्या. ३० ब्रह्मयज्ञ. ३१ वैश्वदेव. ३२ त्रिसुपर्ण. ३३ भोजनविधि. ३४ सायंसंध्या. ३५ सायंदेवपूजा. ३६ देवे. ३७ रुद्रादिद्वादशगायत्री. ३८ शयनविधि. ३९ दर्शश्राद्धसंकल्प. ४० यज्ञोपवीतमंत्र. हें पुस्तक रायल द्वादशपत्री सांच्याचें असून जाड व ग्लेज कागदावर सुंदर टैपानें छापून विक्रीस तयार आहे. सुट्या पोथीची किंमत ८ आणे. रेशमी १२ आणे. टपाल खर्च २ आणे.

**वासुदेव मोरेश्वर पोतदार**, कांदेवाडी, मुंबई.